# मानवी जीवनात गुरूचे स्थान

- श्री. माधवराव भागवत
वर्तक नगर, ठाणे.

मानवी जीवन हे विविध घटनांनी व प्रसंगांनी भरलेले आहे. अशा घटना व प्रसंगांतून माणूस ज्ञान व अनुभव प्राप्त करतो. त्या ज्ञान व अनुभवाच्या जोरावर तो सारासार विचार करू लागतो. त्याचप्रमाणे माणसाचा जीवनात अनेकांशी संबंध येतो व त्यातूनच प्रेम, माया, आपुलकी, घसवट निर्माण होते आणि संबंध दृढ व वृद्धिंगत होतात. त्यातूनच पुढे वेगवेगळी नाती निर्माण होतात. काही नाती स्वत:ची असतात, जसे - आई, वडील, भाऊ, बहीण, काका, मामा, मावशी, आत्या, आजी, आजोबा व त्यांचे नातेसंबंध अतूट असतात. काही नाती सहवास व घनिष्ट संबंध, आपुलकी, घसवट, घरोबा यातून निर्माण होतात, त्यांचे संबंध काही काळापुरतेच असतात, पण त्या सर्वांना मानवी जीवनात त्यावेळी, त्या काळी स्थान असतेच. त्यातूनच त्याचे मानवी जीवन विकसित होत असते.

मानवी जीवन असे विकसित होत असतानाच त्याची मानवी जीवनाकडे पाहाण्याची दृष्टीही विकसित होते. त्याची दृष्टी विशाल बनते, ती संकुचित राहात नाही. त्यातूनच त्याला मनन, चिंतन, लेखन, वाचन वगैरेची सवय जडते. त्यामुळे ज्या समाजात आपण वावरतो, त्या समाजाचेही आपण काही देणे लागतो, म्हणून समाजाकरितासुद्धा आपणास काही केले पाहिजे, कारण समाजानेही आपल्याकरिता केलेले आहे, अशातूनच सामाजिक, आध्यात्मिक कार्य तो करू लागतो. त्यातूनच पुढे धार्मिक, आध्यात्मिक संस्था उदय पावतात. त्यात तो कार्यरत राहतो. अशा कार्यातूनच त्याचे मन विशाल, विकसित, संवेदनशील बनते.

प्रत्येक व्यक्ती व घटना ही त्या मनुष्याला काही-ना-काही शिकवतच असते. त्यानुसार त्याची जीवनात उत्तरोत्तर प्रगतीच होत असते. या प्रबोधनातूनच त्याची ज्ञानलालसा वाढत जाते, वृद्धिंगत होते. हे सगळे त्याचे 'गुरू'च होत. प्रत्येक गुरू त्याला देतच असतो. अशा गुरूंनी दिलेल्या ज्ञानामुळेच त्याचे 'ज्ञानभांडार' अधिक समृद्ध होते. त्याला यामुळे कळून चुकते की या विश्वात ज्ञान अगाध आहे. ते सर्व ज्ञान कुणालाच ज्ञात नाही, म्हणूनच ते अनंत व अगाध, तसेच अज्ञात आहे. म्हणूनच म्हटले आहे की प्रत्येक मनुष्य हा जन्मभर विद्यार्थीच आहे व तो तसा आहे म्हणूनच जीवनात उत्तरोत्तर प्रगती करू शकतो.

ज्या घटना घडतात, प्रसंग घडतात, त्यातील सगळेच प्रसंग व घटना तो लक्षात ठेवीत नाही व लक्षात राहातही नाही. काही घटना व प्रसंग मात्र त्याच्या चिरकाल लक्षात राहातात. त्यामुळेच तो अंतराचा शोध घेतो, 'अंतर्मुख' होतो, बनतो. त्याचे विचारचक्र जोरात फिरू लागते व तो अनंताचा वेध घेतो. इथेच त्याच्या जीवनाला कलाटणी मिळते, जीवन आमूलाग्र बदलते. आता त्याची अशी परिस्थिती होते की कळते पण वळत नाही, अन् कळल्याशिवाय तर चालत नाही. उदा. - लाडकी पत्नी किंवा मुलाचा अकस्मात, अनपेक्षित असा झालेला देहांत. सर्वकाही असून आपण आपल्या प्रिय पत्नी, मुलाला वाचवू शकलो नाही, स्वत: डॉक्टर असून आपल्या ज्ञानाचा, अक्कलहुशारीचा काहीच उपयोग झाला नाही, आपण हतबल झालो. रोज कुणी-ना-कुणी मरतच असतो, सरणावर त्याचे प्रेत जळत असते, पण ते पाहूनही आपण कधी अंतर्मुख होत नाही, कारण ते दु:ख खोल, आतपर्यंत, चिरकाल जाणवत नाही, क्षणिक असते. त्यामुळे आपणाला शहाणपण सुचत नाही. काही माणसांना असाध्य अशा भयंकर व्याधी होतात.

आपल्या हातात जर काही नाही, तर कुणाच्या हातात आहे. म्हणजे आपण सर्व 'कळसूत्री बाहुली' आहोत, आपणाला हालविणारा, नाचविणारा दुसराच आहे, अन् त्याच्याच हातात दोरी आहे, हालविता, नाचविता धनी तोच आहे. मग तो कोण आहे, याचा विचार तो करू लागतो. मग त्या सर्वशक्तिमान अशा शक्तीचे ज्ञान मला झाले पाहिजे, मग ते मला कोण करून देईल, मला ते आत्मज्ञान कोण करून देईल, मला काय केले पाहिजे, अन् मग त्याला कळते की गुरुप्राप्ती झाली व गुरुकृपा झाली तरच हे शक्य आहे. या जगात आत्मज्ञान, परमात्म्याचे नाम हेच फक्त सर्वश्रेष्ठ आहे, शाश्वत आहे, बाकी सर्व अशाश्वत आहे.

समाजाशी संबंध आल्यावर मित्र, मैत्रिणी, सहकारी, हितचिंतक, सामाजिक मित्र, राजकीय मित्र, हे त्याला वेळोवेळी शिकवतच असतात, मार्गदर्शन करीतच असतात. अशी शिकवण देणारेही 'गुरू'च होत. त्यामुळेच त्याच्या जीवनाची जडणघडण होत असते. या सर्वांत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात ते म्हणजे आई अन् वडील. ते त्याच्यावर बालपणापासून चांगले संस्कार करीत असतात. ते त्याला साधू, संत, राष्ट्रपुरुष यांच्या कथा वाचून

दाखवितात. कसे वागावे, कसे बोलावे, याचे मार्गदर्शन करतात. ते त्याला 'वीरकथा' सांगतात. बालपणातच त्याच्याकडून नित्यकर्म, पाठांतर व वाचन, लेखन करवून घेतात. बालपणी त्याची स्मरणशक्ती तीव्र असते, म्हणून जे वाचले, ऐकले, पाठ केले ते त्याच्या चिरकाल स्मरणात राहते. त्यामुळे ते त्याला संस्कारक्षम व चांगल्या व्यक्तिमत्वाचा बनवतात. म्हणजे तेही त्याचे 'गुरू' होत.

अशातऱ्हेने तो संस्कारसंपन्न व ज्ञानसंपन्न व व्यक्तिमत्वसंपन्न होतो, अनुभवसंपन्न होतो. त्याची जीवनाची बैठक पक्की होते. अशा या परिपक्व, पक्क्या जीवनबैठकीवर तो उंच उंच भराऱ्या मारतो. त्याच्या इच्छा, आकांक्षा, अपेक्षा सतत वाढतच असतात, अन् तो गगनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याच्या काही इच्छा, आकांक्षा पुऱ्याही होतात, काही अपुऱ्याच राहतात, पण त्याची 'गरूडझेप' चालूच असते. अशातऱ्हेने तो पुढेपुढे झेपावत असताना काही धोक्याची ठिकाणेही लागतात. त्यामुळे त्याच्या जीवनध्येयांना, जीवननिष्ठांना कलाटणीच मिळण्याची अथवा जीवन उद्ध्वस्त होण्याचीही भीती असते. अशा वेळी, अशा ठिकाणी त्याला मार्गदर्शन करणारा, सावरणारा 'कुणीतरी' लागतो. त्याची मन:स्थिती दोलायमान, द्विधा झालेली असते. त्याला विचार करण्याची ताकद, कुवत नसते, शक्ती नसते. कारण कुप्रलोभनांना तो बळी पडलेला असतो. असा सावरणारा म्हणजेही 'गुरू'च होय.

जीवनाचा असा शोध व बोध घेतल्यावर त्याला 'गुरू'ची महती व आवश्यकता पटते व तो 'गुरू'च्या शोधाला लागतो. त्यालच त्याच्या पूर्वीच वाचनात आलेला श्रीकृष्ण व उद्धव यांचा मित्रसंवाद आठवतो, जेणेकरून 'गुरू' केलाच पाहिजे या ठाम विचाराप्रत तो येतो. तो संवाद असा - **श्रीकृष्ण** – उद्धवा, 'गुरू' करावा। कांही एक मार्ग धरावा। जीवा शिवा विश्रांती। **उद्धव** – उद्धव म्हणे बा, ऋषीकेशी। प्रत्यक्ष मला भेटलाशी। आता 'गुरू' करावा कोणा कार्याशी। सांग मजप्रती आता। **श्रीकृष्ण** – जैसे लवणाविणे रूची अन्ने। नेली असे बा भोजने। तैसे साधुसमागमावाचूनि सर्व शून्य जाणावे ॥१॥ उस गाळूनि काढिती रस। बाहेर टाकिती चिपाट्या, बाकस। तैसा माझ्या 'नामाचा' गोड रस। साधुसंतांनी नेला असे ॥२॥ श्रीकृष्ण म्हणतात, बा उद्धवा, मी प्रत्यक्ष परमेश्वर आहे, तुझा जीवलग मित्रही आहे, पण ज्यावेळी ईश्वरही मानवी काया धारण करतो, तेव्हा मानवी संकेत त्याला पाळावेच लागतात. मलाही गुरू सांदिपनींचे शिष्यत्व पत्करावेच लागले, त्यांची सेवा करावीच लागली, त्यांची कृपा संपादन करावीच लागली. गुरू केल्याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीच. गुरूप्राप्ती, गुरूसेवा, गुरूकृपा याशिवाय कुणाला आत्मज्ञान प्राप्त झालेले नाही, होणारही नाही, तेव्हा तुला गुरू करावाच लागेल.

असा जीवनाचा शोध घेत असताना, त्याला असे कळून चुकते की तो जो कुणी, बोलविता, हालविता धनी आहे, त्याची ओळख व ज्ञान झाले पाहिजे. त्याची ओळख म्हणजे त्या महाशक्तीची, शाश्वताची ओळख, परमात्म्याचीच ओळख, त्याचे ज्ञान म्हणजेच परमात्म्याचे ज्ञान होय, मग आत्माही परमात्मा आहे, असे जर आहे, तर त्या परमात्म्याचे ज्ञान व ओळख होणे 'आद्यकर्तव्य' आहे, नव्हे तेच जीवनाचे मुख्य ध्येय आहे, पण हे सर्व एका 'गुरूशिवाय' दुसऱ्या कुणाला शक्य नाही.

एकदा असा त्याला शोध व बोध झाल्यावर तो 'गुरूशोधार्थ' वणवण फिरतो. त्यासाठी त्याला खूप कष्ट सोसावे लागतात. तरी तो त्याची तमा बाळगत नाही, उन, पाऊस, थंडी, वारा हे सर्व सहन करून तो आपली अलभ्य अशी मानवकाया झिजवतो. इथेही त्याला धोक्याची स्थळे लागतात. सद्‌गुरू मिळणे, मोक्षगुरू मिळणे ही अत्यंत अवघड अशी कामगिरी आहे. कारण आजकाल 'गुरूत्व' घेण्याची प्रत्येकाचीच धडपड चाललेली आहे. त्यामुळे गल्लोगल्ली गुरू मिळतात, पण ते 'भोंदू गुरू' असतात. अशा गुरूमुळे त्या गुरूचे व आपलेही अपरिमित असे नुकसान होते. आता गुरू अडक्याला तीन व पायलीला पन्नास मिळतात, पण त्यांचा काहीही उपयोग नसतो, त्यामुळे फसगतच होते व पश्चातापाचीच पाळी येते. एकदा का गुरूत्व घेतले की शिष्याची सर्व जबाबदारी गुरूवर येऊन पडते, हे त्या भोंदू गुरूंना कळत नाही, मग शिष्याची सर्व जबाबदारी स्वत:वर घेऊन, त्याचे जन्ममरणाचे फेरे चुकविणारा, सर्वज्ञान प्रदान करून त्याला स्वरूपीं विलीन करून घेणारा, त्याला मोक्षप्राप्ति करून देणारा जो तो सद्‌गुरू 'मोक्षगुरू' होय.

सद्‌गुरू, मोक्षगुरू मिळणे म्हणजे पूर्वजन्मीचे पुण्य म्हणावे लागेल. या सर्वांतून तावून-सुलाखून निघाल्यावर त्याला 'गुरूप्राप्ती' होते, तो 'गुरूची सेवा' करतो, 'गुरूकृपा' संपादन करतो, तो अंतरंग शिष्य बनतो. गुरू त्याला आपले सर्व ज्ञान देतो, स्वस्वरूपात विलीन करतो. द्वैत राहतच नाही. तो ज्ञानसंपन्न, म्हणजे आत्मज्ञानसंपन्न होतो, मग त्याला अशक्य असे काहीच राहत नाही. तो ईशस्वरूप होतो, नराचा नारायण होतो, गुरूकार्याचा प्रसार व प्रचार करतो. असे हे मानवी जीवनात गुरूचे अढळ, अटळ, अनन्यसाधारण स्थान आहे. म्हणूनच म्हणतात - **गुरूर्ब्रह्मा, गुरूर्विष्णू, गुरूर्देवो महेश्वर:। गुरू साक्षात् परब्रह्म। तस्मै श्रीगुरवे नम: ॥१॥**

---

# साक्षात्कारी संत गुरूदेव रानडे

**- श्री. र. श्री. पुजारी**
सदाशिव पेठ, पुणे.

अहमदनगर जिल्ह्यातील शिरडी हे नगण्य खेडे श्री बाबांमुळे प्रसिद्धीस आले, तीर्थक्षेत्र बनले. श्री गजानन महाराजांमुळे शेगाव, श्री गोंदवलेकर महाराजांमुळे गोंदवले, श्री स्वामी स्वरूपानंदांमुळे पावस मान्यता पावले. अशा खेड्यांपैकी विजापूर जिल्ह्यातील निंबाळ हे खेडे आधुनिक काळातील महान साक्षात्कारी संत गुरूदेव प्रा. रा. द. रानडे यांच्यामुळे प्रसिद्धीस आले, निरक्षरांपासून विद्वान, तत्वज्ञ पंडितांपर्यंत सर्व साधकांचे माहेरघर झाले.

बालवयात तोळामासा प्रकृती असलेला रामभाऊ हा एक दुबळा मुलगा. त्याच्या प्रकृतीची चिंता ही त्याच्या मातोश्रींची नित्याची बाब. अखेर तत्कालीन साक्षात्कारी संत श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्याकडे त्या माऊलीने धाव घेतली. तेव्हा भाऊसाहेब महाराजांनी अभय दिले. ते म्हणाले,

''हा मुलगा साठ वर्षांवर जगेल.''

सद्गुरूंचा हा आशीर्वाद पुढे प्रत्यक्षात उतरला. गुरूदेव रानडे एकाहत्तर वर्षे जगले. राजयक्ष्मा ही दुर्धर व्याधी पाचवीस पुजलेली असूनही मृत्यू त्यांच्यावर झडप घालू शकला नाही ! त्यामुळे त्यांच्याकरवी जे कार्य सद्गुरूंना करवून घ्यायचे होते ते पुरे झाले.

वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी गुरूदेव रानडे यांनी श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्याकडून अनुग्रह घेतला, म्हणजे नाम घेतले. मॅट्रिकच्या परीक्षेत पहिली जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे गुरूदेव रानड्यांची आपल्या सद्गुरूंवरील श्रद्धा दृढ झाली. पुढे पुणे येथील शैक्षणिक जीवनात उत्तरोत्तर उत्कृष्ट यश मिळत गेल्यामुळे सद्गुरूंच्या कृपेचा चढता-वाढता प्रत्यय त्यांना येत गेला. त्यामुळे सद्गुरूंच्या मार्गाचे ते निष्ठावंत पाईक झाले. सद्गुरूंचे चरण अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी उपासिले.

गुरूदेवांनी डेक्कन महाविद्यालय या नामांकित शिक्षणसंस्थेमध्ये विद्वान इंग्रज प्राध्यापकांच्या हाताखाली शिक्षण घेतले. अध्ययनातील गुरूदेवांची असामान्य गती पाहून प्राध्यापकांनी त्यांना मित्रवत् मानले. आपल्या थिऑसॉफी पंथाचे त्यांना अध्वर्यु करावे यासाठी डॉ. ॲनी बेझंट यांची भेटही त्यांना करविली, परंतु गुरूमार्गावरील अविचल श्रद्धेमुळे ती सर्व आमिषे गुरूदेवांनी झुगारून दिली.

फर्ग्युसन महाविद्यालयात तत्वज्ञानाचे प्राध्यापक आणि आजीव सदस्य म्हणूनही गुरूदेवांनी काही वर्षे काम केले. परंतु ध्येयनिष्ठेमुळे त्यांनी अखेर राजीनामा दिला.

नोकरीतील अनिश्चिती; मातोश्री, प्रथम पत्नी आणि पुत्र यांच्या मृत्यूंमुळे कोसळलेल्या कौटुंबिक आपत्ती; मनासारखी न होणारी नामसाधना इत्यादी कारणांमुळे आणि विद्वत्तेमुळे प्राप्त झालेल्या मानसन्मानातही जीव न रमल्यामुळे गुरूदेवांनी सद्गुरूंकडे पुन: पुन्हा धाव घेतली, त्यांच्या सहवासाचा आश्रय घेतला. सद्गुरू हेच आपले मायबाप या भावनेने त्यांची अनन्य शरणागती पत्करली.

कर्नाटकात निंबरगी महाराजांपासून चालत आलेल्या या संप्रदायात साक्षात्कारी सद्गुरूंपासून प्राप्त झालेल्या बीजनामास अनन्यसाधारण महत्त्व आहे. नाम हाच देव, नाम हेच तीर्थ, नाम हेच व्रत इतकी नामावर येथे श्रद्धा आहे. बीजनामाचे श्वासावर केलेले अखंड स्मरण हाच साक्षात्काराचा अत्यंत सरळ, सोपा आणि हमखास मार्ग आहे अशी या संप्रदायाची स्वानुभवसिद्ध धारणा आहे.

शेतात पेरावयाच्या उत्कृष्ट बीजाप्रमाणे जे नाम हजारो नामबीजे निर्माण करील तेच बीजनाम असे या संप्रदायातील अनुयायी मानतात. बीजनामामागे गुरूशक्ती गौप्यरूपाने वास करीत असल्यामुळे साधकाने घेतलेले नाम कालांतराने सुफल होते व आत्म्याचा साक्षात्कार होतो असा हा नाममार्ग आहे. या मार्गासच शास्त्रशुद्ध पाया निर्माण करून त्यास 'शास्त्र' या पदवीस गुरूदेवांनी पोचविले.

श्रद्धेने, सातत्याने बीजनामाच्या श्वासाबरोबर नित्य आठ-नऊ तास स्मरण केल्यामुळे आत्म्याचा साक्षात्कार होऊ शकतो ही गोष्ट गुरूदेवांनी अनुभविली. राजयक्ष्म्यासारख्या विकाराचा केवळ नामाच्या धोशामुळे मागमूससुद्धा उरत नाही ही गोष्टही त्यांनी सिद्ध केली.

महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर भारतातील प्राचीन संतांनी याच नामसाधनेचा आश्रय केल्यामुळे ते परमपदास कसे पोचले हे गुरूदेवांनी या संतांच्या ईश्वरविषयक काव्यातील स्वानुभवांच्या आधारे सिद्ध करून दाखविले. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, जनाबाई, चोखामेळा, कान्होपात्रा, नामदेव इत्यादी साक्षात्कारी संतांनी आपल्या काव्यात नोंदविलेल्या आध्यात्मिक अनुभवांच्या खुणा 'ज्ञानेश्वर वचनामृत', 'एकनाथ वचनामृत', 'तुकाराम वचनामृत', 'रामदास वचनामृत' अशा ग्रंथांद्वारा साधकांच्या नजरेस आणल्या. या खुणा पाहून, वाट पुसत पुसत पुढे जाण्याचा सल्ला साधकांना त्यांनी दिला.

बीजनामाच्या श्रद्धायुक्त अनुसंधानामुळे बिंदु, कला, मोती, प्रकाश, शेष इत्यादी डोळ्यांसमोर दिसू लागतात; हाच 'अनुभव' वाढल्यानंतर लक्षावधी दिव्य नेत्र, विविध रंगरूपांनी नटलेला विश्वात्मक परमात्मा, कोट्यावधी तारकांनी भरलेले आकाश ही सर्व डोळे उघडे असताना किंवा मिटल्यावरही दिसू शकतात; त्यामुळे परम शांती आणि अननुभूत शाश्वतचा आनंद यांची प्राप्ती होते, असे गुरूदेव सांगतात. रूप, रस, गंध, नाद आणि स्पर्श या पंचतत्वांमुळे वरीलप्रमाणे रूपात्मक, त्याशिवाय रसात्मक, गंधात्मक, नादात्मक आणि स्पर्शात्मक अनुभवही येऊ शकतात. अर्थात नामधारकाची नैतिक बैठकही येथे महत्त्वाची.

अखंड सुरू असलेल्या अनाहत नादाच्या अनुसंधानामुळे श्री शैल्य पर्वतावर आपणास आत्मसाक्षात्कार झाला असे आद्य श्री शंकराचार्यही 'योगतारावली' या आपल्या स्तोत्रात नोंदवितात.

या नामसाधनेला पोषक असे कीर्तन, भजन, प्रवचन, पोथीवाचन इत्यादी गोष्टींना गुरूदेव 'सगुणाची उपासना' असे म्हणतात. नामसाधनेला ते 'निर्गुणाची उपासना' समजतात. वरील सगुणोपासनेमुळे साक्षात् ईश्वराचे अस्तित्व साधकांना जाणवले तरच ती खरी सगुणोपासना असे गुरूदेव म्हणतात.

पूजापाठ, व्रत-वैकल्ये, अन्नसंतर्पण, दान ह्या गोष्टींचा आणि आध्यात्मिक साधनेचा काहीही संबंध नाही, असे गुरूदेव सांगतात. ह्या गोष्टी ते पुण्यसंचय करणाऱ्या मानतात. पुण्यसंचयामुळे केवळ ऐहिक सुखांचा लाभ होतो; पण नामसाधनेमुळे आत्मपदाबरोबरच चांगल्या ऐहिकाचाही लाभ पदरी पडतो असे ते सांगतात.

भक्ती हेच गुरूदेव जगातील सर्वश्रेष्ठ मूल्य समजतात. भक्तीची परिसीमा म्हणजे साक्षात्कार असे ते म्हणतात. साधकाचा प्रत्येक व्यवहार भक्तीकडे नेणारा असावा असे ते सांगतात. ज्या कीर्तन-भजन-प्रवचन-गायनात ईश्वराचे अस्तित्व जाणवेल तेच खरे संकीर्तन, असे ते मानतात.

नामसाधनेमुळे वासना हळूहळू क्षीण होत जातात. दुर्गुणत्याग घडल्यामुळे सद्गुणांचा विकास सुरू होतो. जगातील सर्व सद्गुणांची जननी भक्तीच होय असे गुरुदेव आवर्जून सांगतात.

विद्या, कला, समाजसेवा यांचे लक्ष्य मूळ स्त्रोत जो ईश्वर, त्याच्याकडे वळण्याऐवजी भिन्न दिशांनी तो वाहू लागला तर तो गढूळ होण्याची शक्यता आहे, अहंकारामुळे विषयांकडे वळण्याचीही शक्यता आहे, असा इशारा गुरूदेव देतात.

जगाचे कल्याण आत्मासाक्षात्काराच्या सनातन मार्गाने वाटचाल करताना केलेल्या विशुद्ध कर्मामुळेच होईल, असे गुरुदेव शेवटी सांगतात.

श्री साईनाथांनीही हाच संदेश गुरूभक्तीच्याद्वारे दिलेला आहे.

---

# अनसूयातीर्थ

प्रतापनगर (बडोदे) पश्चिम रेल्वेलाईनवरून डभोईमार्गे सोळा कि.मी. अंतरावर चांदोद नावाचे क्षेत्र आहे. त्या ठिकाणी नर्मदा नदीचे विस्तीर्ण पात्र आहे. समोरच पूर्व बाजूस 'करनाळी क्षेत्र' आहे. करनाळी नि नर्मदेच्यामधून 'ओर' नदी वाहते, त्या ठिकाणी 'ओर' संगम आहे. हा संगम पवित्र असल्याने तेथे मृत व्यक्तींच्या अस्थी विसर्जन करतात.

चांदोद क्षेत्राच्या पश्चिमेस तीन कि.मी. अंतरावर नर्मदा नदीच्या तीरावर 'शिनोर' नामक गाव आहे. शिनोरपासून 'अनसूयातीर्थ - क्षेत्र दत्तस्थान' आठ कि.मी.वर नर्मदेच्या तीरावरच आहे. त्या ठिकाणी महासती साध्वी दत्तात्रेयमाता अनसूया यांचे मंदिर आहे.

हे स्थान अत्यंत पवित्र, निसर्गसुंदर आणि रमणीय आहे. अनसूया-मंदिरा-जवळची माती निष्ठापूर्वक लावली असता मोठमोठे रोग बरे होतात, असे भाविक भक्तांचे अनुभव आहेत. तसेच, अनसूयादेवी नवसास पावते अशी जनश्रद्धा आहे. गंगासमाप्तीला अनसूयाक्षेत्री मोठी यात्रा भरते. प्रति रविवार, मंगळवार, शुक्रवार या दिवशी दर्शनासाठी लोकांची अतिशय गर्दी होते.

येथे एक प्रसिद्ध रुग्णालय आहे. रोगी बरे होण्यासाठी त्याची ख्याती आहे. विशेषत: रक्तपिती हा रोग. रूग्णांवर येथे विनामूल्य उपचार केले जातात.

(आधार - श्री दत्तात्रेय ज्ञानकोश, प्रा. डॉ. प्र. न. जोशी)

संग्राहक - **श्री. सुहास हरी जोशी**
शिरूर, घोडनदी, पुणे.

## निवेदन


'श्री साईलीला' द्वैमासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाचे निवेदन.

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| २. प्रकाशनाचा कालावधी | - | द्वैमासिक |
| ३. मुद्रकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ४. प्रकाशकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर-मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ५. संपादकाचे नाव | - | द. म. सुकथनकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे, त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागदार यांची नावे व पत्ते | - | श्री साईबाबा संस्थान, शिरडी (धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, द. म. सुकथनकर यानुसार असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**द. म. सुकथनकर**
(प्रकाशकाची सही)
अध्यक्ष,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

# महान संत सद्गुरू वामनबाबा



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज म्हणतात : इवलेसे रोप लावियेले द्वारी। त्याचा वेलु गेला गगनावरी। मोगरा फुलला मोगरा फुलला। फुले वेचितासी बहर कलियासी आला॥

या अभंगाप्रमाणे बीज दिसायला लहान असते, परंतु त्याचाच पुढे वृक्ष होतो. बीज जमिनीत लावल्यानंतर त्या बीजाला पाणी घातले की त्याचे रोप बनते. रोपाचे झाडात रूपांतर होते. त्या झाडाला फुले व फळे लागतात. तेच झाड जगावर प्रेम करते, उन्हातून जाणाऱ्या वाटसरूंना सावली देते, फुले देते व फळेही देते. हा वृक्ष जातीभेद, पंक्तिभेद, उच्च-नीच, लहान-थोर असा भेद करीत नाही. तो सर्वांना समान लेखतो. तो लावणाऱ्यावर व तोडणाऱ्यावरही प्रेम करतो. त्याला एकच माहीत असते, जगावर प्रेम करणे. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीत म्हणतात : जो खांडावया घांव घाली। की लावणी जयाने केली। वृक्ष दे सावली। दोघा जैसा॥

फुलाचेही तसेच आहे. फुलाजवळसुद्धा भेदभाव नाही. ते सर्वांना आपल्या सुवासाने आनंदी बनविते. आपल्या सुवासाने दुसऱ्यांचे मन सुगंधित करण्याचे काम फुल करीत असते. त्याचप्रमाणे, किंबहुना त्याहीपुढे जावून संत मानवाचे जीवन सुगंधित करीत असतात. त्यांचे जीवन बदलून टाकतात. त्यांच्यात चैतन्य निर्माण करतात.

संतांची परंपरा अतिशय थोर आहे. त्यांची कृपा प्राप्त होण्यासाठी तशाचप्रकारचा थोर पुत्र जन्माला यावा लागतो. मराठीत एक म्हण आहे : पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिन्ही लोकी झेंडा॥ संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे : एकोपि गुणवान पुत्रो निर्गुश्चशते रवि। एकचंद्र स्तमो हन्तिनच तारा सहस्वशः॥

रानात शेकडो फुलझाडे असतात. त्या शेकडो फुलझाडांपैकी एखाद्या फुलझाडाला जरी सुवासिक फुले असली तरी त्यांच्या सुगंधाने संपूर्ण परिसर सुगंधित होऊन जातो. त्याचप्रमाणे घराण्यात एक जरी सद्गुणी मुलगा असेल, तर तो कुळाचे नाव उज्ज्वल करतो. ज्याप्रमाणे आकाशात शेकडो तारे व कोट्यावधी चांदण्या असतात, पण त्यांचा प्रकाश पडत नाही, एकच चंद्र संपूर्ण पृथ्वी प्रकाशमान करतो, त्याचप्रमाणे नीतिमान मुलगा कुळाला प्रकाशमान करतो.

उज्ज्वल भवितव्यासाठी (भगवंताच्या प्राप्तीसाठी) संतांचे पाय धरले पाहिजेत. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात : हरि प्राप्तीसी उपाय। धरावे संतांचे ते पाय॥

संतांची परंपरा महान आहे. त्या परंपरेचे संपूर्ण वर्णन करणे लेखणीला अशक्य आहे. मराठीत एक म्हण आहे :

आकाशाचा कागद, समुद्राची शाई व पर्वताची लेखणी केली तरी आईचे मातृप्रेम लिहिता येणार नाही.

आईवडील आपल्याला जन्म देतात. आपला सांभाळ करतात. परंतु मायेच्या भवसागरातून ते आपल्याला सोडवू शकत नाहीत. भवसागर सुखरूप पार करावयाचा असेल, तर संतांचीच भेट झाली पाहिजे. संतभेट होण्यासाठी पुण्याची आवश्यकता असते. ते जर आपल्याजवळ असेल तरच संतसमागम घडतो.

तिळे तिळे पुण्य साचा पडे। ते हे बहुता जन्मी जोडे। नाम तुझे वाचेसि आतुडे। समागम घडे संतांचा॥

भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे : यदा यदा हि धर्मस्य। ग्लानिर्भवती भारत। धर्मसंस्थापनार्थाय। संभवामी युगे युगे॥

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात : अवतार तुम्हा धराया कारणे। उद्धाराया जन जड जीवा॥

जेव्हा धर्माला ग्लानी येते, दुष्टांचे वर्चस्व वाढते, धर्म अधोगतीला जाण्याची वेळ येते, तेव्हा धर्माच्या रक्षणासाठी मी अवतार घेऊन दुष्टांचा संहार करतो, असे श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेत सांगितले आहे. संत अवतार घेतात, परंतु ते भगवंतासारखे दुष्टांना मारीत नाहीत, तर त्यांना सदुपदेश करून त्यांच्या दुष्ट प्रवृत्तीवर मात करतात, त्यांना सुष्ट करून सोडतात. संत हे श्रांत जीवांचे विश्रांतिस्थान आहे. त्यासाठी संतांची संगती घडणे आवश्यक आहे. संत ज्ञानेश्वर महाराज नित्यपाठाच्या हरिपाठात म्हणतात :

संतांचे संगती मनोमार्गगती। आकळावा श्रीपती येणे पंथे॥

वेदसुद्धा ग्वाही देतात :

संताविण प्राप्ती नाही। ऐसे वेद देती ग्वाही॥

कारण संत हे भवसिंधूचे तारू असून संतांमुळेच भवसागर तरता येतो. संतश्रेष्ठ एकनाथ महाराज आपल्या एका अभंगात म्हणतात : संत हे भवसिंधुचे तारू। येणे उतरू पैल पारु॥

संतांच्या उपकाराचे वर्णन करता येत नाही. न फिटणारे उपकार संत करीत असतात. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात :

केले उपकार सांगो काय। बाप न करी ऐसी माय। धर्मे त्यांच्या देखियेले पाय। दिले अभयदान गा ॥

नीतिशुद्ध आचरण व चांगले कर्म केल्यास मनुष्य नराचा नारायण होतो, असे संतश्रेष्ठ कबीर महाराज म्हणतात :

पशु का बनत पनिया। नर का कुछ ना होय। नर एक बार करणी करे। तो नर का नारायण होय ॥

प्रत्येक मानवी प्राण्यात चैतन्याचा कण हा असतोच. तो फुंकर मारून जागृत करावा लागतो. सोनार जसा अग्नीवर फुंकर मारून सोने अग्नीत टाकतो व सोने प्रकाशमान बनवितो, जशी ओली लाकडे जळताना त्याच्यातून धूर निघतो, तसेच आपले जीवन विषयरसाने ओले झालेले आहे. सद्गुरू शिष्यावर कृपेचा वरदहस्त ठेवतात. कृपा, दया, करूणा, प्रेम, शौर्य व वीरत्वाचे थेंब टाकून आपल्या स्वार्थी व दुबळ्या भावांना आत्मिक भावात परावर्तीत करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून ते आपल्याला आपले वाटतात. ज्याप्रमाणे कारागीर आपले सर्व कसब पणाला लावून मूर्ती तयार करतात व मूर्तीला देवत्व आणतात, त्याचप्रमाणे संत मानवाच्या हृदयातील सुप्त सत्वगुणांना उत्तेजित करून मानवाचे जीवन सुफल करतात. अशा थोर संतांच्या उपकाराचे वर्णन संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात करतात : काय सांगू आता संतांचे उपकार। मज निरंतर जागविती ॥

अशा थोर संत-महात्म्यांच्या चरणांवर आपला प्राण जरी अर्पण केला, तरी त्यांच्या उपकाराची परतफेड करता येणार नाही.

काय यास होऊ उतराई। ठेविता हा पायी जीव थोडा ॥

कर्तव्य हे परम-पवित्र असते आणि त्यास वाहून घेणे परमेश्वराचे सर्वोच पूजन आहे. अज्ञानरूपी अंध:कारातून बाहेर येण्यासाठी संतांची आवश्यकता आहे. एक संस्कृत सुभाषित आहे :

''तमसो मा ज्योतिर्गमय। असतो मा सत्गमय। मृतोर्मा अमृतं गमय ॥''

''अरे, अंध:कारातून बाहेर या ! हा पहा प्रकाश ! हे पहा अनंत सत्य ! हे पहा चिरजीवन !'' असे हाकारे संत करीत असतात. मानवी समाजाला क्षुद्र जीवनाच्या अंध:कारमय बोगद्यातून प्रकाशाने भरलेल्या अनंत जीवनात आणून सोडण्यासाठी संतांची नितांत आवश्यकता आहे. मानवाला ज्ञानरूपी प्रकाशात आणण्याचे महान कार्य संत करीत असतात.

आपण सर्वच संतांची चरित्रे पाहिली तर असे आढळून येईल की, सर्वच संत-महात्म्यांना अनेक संकटांशी सामना करावा लागला. लोकनिंदेला तोंड द्यावे लागले. अतिशय बिकट परिस्थितीत संतांनी देवाला आपलासा करून भागवत धर्माचा ध्वज भक्कमपणे उभा केला.

आयुष्याचा भविष्यकाळ सूर्यप्रकाशा-सारखा उज्ज्वल व्हावयाचा असल्यास त्याचा पूर्वकाळ संकट-परंपरेने युक्त असून त्या परंपरेच्या कसोटीला तो पूर्णपणे उतरून शंभर नंबरी ठरावा लागतो. असाच अनुभव महात्म्यांच्या चरित्रांकडे पाहिल्यास येतो.

**महाराष्ट्राची भूमी ही त्यागाची भूमी आहे, भक्तीची भूमी आहे. 'हिंदवी स्वराज्याची' स्थापना करणारे 'छत्रपती शिवाजी महाराज' येथेच जन्माला आले. संतश्रेष्ठ 'रामदास स्वामी' व संतश्रेष्ठ 'तुकाराम महाराज' यांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी शिवाजी महाराजांना अनमोल साहाय्य केले. येथे संतांची मालिकाच निर्माण झाली. महाराष्ट्रातील संत अनेक जाती-धर्मातील असूनसुद्धा भावभक्तीने त्यांनी भगवंताला आपलासा केला व जाती-धर्मविरहित समानतेचा 'भागवत धर्म' उभा केला. भागवत धर्माची स्थापना करून महाराष्ट्रातील या संतांनी महाराष्ट्रावरच नाही, तर संपूर्ण भारतवासियांवर फार मोठे न फिटणारे उपकार केले आहेत.**

'रायगड' जिल्हा (पूर्वीचे या जिल्ह्याचे नाव 'कुलाबा') येथे अनेक सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्रे आहेत. या जिल्ह्याने इतिहास घडविला. या जिल्ह्यात अनेक सुपुत्र जन्माला आले. रायगड जिल्हा ही एक कर्मभूमी आहे. त्यागाची भूमी आहे. या जिल्ह्याने देशाच्या सेवेसाठी अनेक नररत्नांचा त्याग केला आहे. अशी ही परम पवित्र भूमी आहे.

अनेक पिढ्या भगवंताची भक्ती केल्यानंतर त्या घराण्यात अवतारी पुरुष जन्माला येतो. 'पनवेल' तालुक्यात 'अभय अरण्य' हे एक निसर्गरम्य ठिकाण आहे. तेथील वातावरण अतिशय आल्हाददायक आहे. त्या ठिकाणी गेल्यावर मनाला प्रसन्नता वाटते. अशा निसर्गरम्य परिसरात 'कल्हे' नावाच्या खेडेगावात पुण्यवान आईबापांच्या पोटी माहे पौष, सोमवार, वद्य अष्टमी, शके १७८७ या दिवशी पुत्ररत्न जन्माला आले. मुलाचा जन्म भोलेनाथाच्या वारी झाला. ज्याप्रमाणे भोलेनाथ शंकर वैराग्यशील होते, त्याचप्रमाणे हे बालकसुद्धा पुढे वैराग्यशील झाले, हे त्यांच्या पुढील चरित्रावरून आपणास दिसून येईल. मराठीत एक म्हण आहे : 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.' पायावरून मुलाची परीक्षा करता येते. पुत्ररत्न झाल्याचे पाहून सर्वांना आनंद झाला. मोठ्या प्रेमाने मुलाचे नाव 'वामन' असे ठेवण्यात आले. कमळाचा उगम चिखलातून होतो, पण चिखलाचा स्पर्श त्या कमळाला होत नाही. ते पाण्यापासूनसुद्धा वर राहते. कमळात अनेक गुण आहेत. कमळाला भारतीय संस्कृतीची उपमा दिलेली आहे. भारतीय संस्कृतीचे प्रतीक म्हणजे 'कमळ' होय ! भारतीय संस्कृतीत जीवनातल्या आदर्श व उत्तमोत्तम वस्तूंची उपमा कमळाला दिलेली आहे. उत्तमोत्तम विचार प्रकट करण्याचे 'कमळ' हे चिन्ह आहे. कमळ स्वच्छ व पवित्र असूनसुद्धा अलिप्त असते. पवित्रता व अलिप्तता अशी दुहेरी शक्ती कमळात आहे. देवाच्या निरनिराळ्या अवयवांना कमळाची उपमा दिलेली आहे. (१) नेत्र-कमळ, (२) पद-कमळ, (३) कर-कमळ, (४) मुख-कमळ, (५) नाभी-कमळ, (६) हृदय-कमळ, (७) शिर-कमळ इत्यादी उपमा देऊन आमच्या हृदयात एकभाव प्रकट केला आहे की, सर्वत्र सौंदर्य व पावित्र्याबरोबरच अलिप्तता आहे. कमळ देवाच्या पूजेला वाहिले जाते, तसेच ते आपल्या सुगंधाने दुसऱ्यांचे जीवन सुगंधित

करते. त्याचप्रमाणे 'कल्हे' या गावी जन्माला येऊन 'वामनरूपी कमळाने' अनेकांचे जीवन सुगंधित केले.

दैवाची गती फार विचित्र असते. दैवाच्या गतीप्रमाणेच भोग भोगावे लागतात. प्रारब्धाचे भोग देवादिकांनाही भोगल्याशिवाय सुटत नाहीत. आपण जर संतवाङ्मय पाहिले, तर संकटातून एकही संत सुटल्याचे दिसत नाही. परंतु सोने कसाला लावले जाते, त्याचवेळी त्याचे सोनेपण समजते, त्याचप्रमाणे संतसुद्धा भक्तिरूपी मुशीत गेल्यानंतरच 'संत' या पदाला पोहचले. सोने जितके जास्त तापविले जाते, तितके त्याला तेज चढते, त्याचप्रमाणे संकटरूपी अग्नीवर टेवून देव भक्तांची परीक्षा घेत असतो. संतांवर जितकी संकटे अधिक, त्याचप्रमाणात त्यांची प्रसिद्धी वाढत जाते. आपण संतश्रेष्ठ सद्गुरू 'वामनबाबा' यांचे चरित्र पाहिले तर त्यांच्या जीवनाची सुरुवात संकटांतून झाली असल्याचे आपणास दिसून येईल.

सूर्याच्या किरणांनी जशी कमळे फुलतात, तशी आई-बापांच्या कृत्यांनी मुलांच्या जीवनकळ्या फुलतात. आईवडिलांचे सुसंस्कार वामनबाबा यांच्यावर झाले. त्यांचे जीवन चांगल्या वातावरणात जावू लागले. आनंदीमय जीवन जगत असताना 'वामनबाबा' यांच्यावर मोठा आघात झाला. त्यांच्या वयाच्या ७-८ व्या वर्षी काळाने त्यांच्या आई-वडिलांवर झडप घातली. ज्यांचे कृपाछत्र डोक्यावर होते, असे आईवडील काळाच्या भक्षस्थानी पडले. ते आईवडिलांच्या प्रेमाला कायमचे मुकले. ते पोरके झाले. एका हिंदी शाहीराने म्हटले आहे : 'जिसका दुनिया में कोई नहीं। उसका खुदा होता है।' जे पोरके होतात, अशांचा सांभाळ भगवंत कुणाच्यातरी रूपाने करीत असतो. संतश्रेष्ठ एकनाथ महाराज आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात अनुभवाद्वारे म्हणतात :

आवडीने भावे हरिनाम घेसी। तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥१॥ नको खेद करू कोणत्या गोष्टीचा। पती तो लक्ष्मीचा जाणतसे ॥२॥ सकळ जीवांचा करितो सांभाळ। तुज मोकलिल ऐसे नाही ॥३॥ जैसी स्थिती आहे तैशापरी राहे। कौतुक तू पाहे संचिताचे ॥४॥ एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा। हरिकृपे त्याचा नाश झाला ॥५॥

वामनबाबा यांच्या बहिणीची सासूरवाडी 'ब्राह्मण करोळा' हे खेडेगाव उल्हासनगर तालुक्यात, ठाणे जिल्ह्यात श्री मलंगगडाच्या परिसरात आहे. बहिणीने भावाला आसरा दिला. बहीण भावास घेऊन आपल्या राहत्या घरी आली. भावाचे पालन-पोषण करू लागली. संत तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात :

ये दशे चरित्र केले नारायणे। रांगता गोधने राखिताहे ॥

कृष्ण भगवंतांनी गोकुळात असताना लहानपणी गायी राखण्याचे काम केले. त्याचप्रमाणे लहानपणी बहिणीकडे असताना 'वामनबाबा' न कंटाळता गाई-म्हशी राखण्याचे काम करीत असत. ऊन, वारा व पाऊस यांना न जुमानता त्या भागात प्रसिद्ध असलेल्या 'गायमुखाच्या डोंगरीवर' ते गायी चारायला घेवून जात असत. ज्याप्रमाणे कृष्ण भगवंताने आपल्याभोवती सवंगडी जमा केले होते, त्याचप्रमाणे वामनबाबा यांनीसुद्धा सवंगडी जमा केले होते. गायी राखण्याचे काम करावे लागत असल्यामुळे वामनबाबा यांना शिक्षण घेता आले नाही. परंतु रानात धुळीवर अक्षरे काढून ते सवंगड्यांबरोबर शिक्षण घेत असत. त्यांच्यात चिकाटी व जिद्द फार मोठी होती. त्यांच्यात असलेल्या चिकाटी व जिद्द ह्या दोन गोष्टींचा फायदा त्यांना पुढील काळात झाला. यामुळेच ते 'महात्मा' या पदाला पोहोचले.

वामनबाबा यांची वृत्ती समाधानी असे. ते नेहमी आनंदी असत. अशा रीतीने जीवन कंठीत असताना त्यांच्यावर दुसरा आघात झाला. बहिणीचे जे छत्र त्यांच्यावर होते, ते छत्रसुद्धा काळाने हरण केले. वामनबाबा खऱ्या अर्थाने अनाथ झाले. म्हणतात ना, अनाथांचा नाथ पांडुरंग।

त्यांच्या मेहुण्यांनी वयाच्या १७-१८व्या वर्षी त्यांचे लग्न लावून दिले.

पुढे कालांतराने वामनबाबा गवताच्या बैलगाड्या घेऊन ते गवत तळोजा येथील मुरबी बंदरात नेत असत. वामनबाबा फार उद्योगी होते. पडेल ते काम ते ईमानदारीने व विश्वासाने करीत असत. त्यांची हुशारी व काम करण्याची हातोटी पाहून मचव्यातील मालकाने त्यांच्यावर विश्वास टाकला. मुरबी बंदरातून गवत मचव्यातून मुंबईस पोहोचविण्याचे काम वामनबाबा करू लागले. त्या काळी मुंबईतील श्रीमंत समजले जाणारे कै. कुशाबा काळे यांच्याकडे भायखळा (मुंबई) येथील बंदरात गवत उतरविले जात असे. वामनबाबा गवताचा हिशेब घेऊन परत तळोजा येथे येत असत. अशाप्रकारचा उद्योग करता करता वामनबाबांच्या जीवनात अतिशय भाग्याचा दिवस उजाडला. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात : उजळले भाग्य आता अवघी चिंता वारली। संतदर्शने हा लाभ पद्मनाभ जोडिला ॥

मानवाच्या जीवनात अनेक प्रसंग भाग्याचे येतात. भाग्योदयप्रसंगी मानवप्राणी आनंदी होत असतो, सुखी होत असतो. परंतु आनंद व सुख क्षणभंगूर असते. जर एकदा का संतभेट झाली की, अखंड परमानंदाची प्राप्ती होते. असाच परमानंद वामनबाबांच्या जीवनात आला. त्यांना सद्गुरूची प्राप्ती झाली.

प्रत्येक मानवाला गुरू हा असतोच. अनेक क्षेत्रात मार्गदर्शन करणारे अनेक गुरू भेटतात. परंतु त्या सर्वांचे क्षेत्र मर्यादित असते. सद्गुरू भेटणे दुर्लभ व एकदा का सद्गुरूची भेट झाली तर सामान्यातला सामान्य माणूसही परमपदाला पोहोचतो. नाथ भागवतात संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांनी गुरु व सद्गुरूबद्दल फार सुंदर विवेचन केले आहे.

मंत्रतंत्र उपदेशी ते। घरोघरी गुरु आहेत आयते ॥ जो शिष्यासी दाखवी सद्वस्तुते। श्रीकृष्ण त्याते सद्गुरू मानिती ॥

साधकाला गुरूंच्या पायाजवळ जावून गुरु-उपदेश घ्यावा लागतो. काही काही साधकांना तर गुरुदीक्षेसाठी फार कष्ट सहन करावे लागतात. परंतु काही साधक

याबाबतीत फार भाग्यवान असतात. ज्याप्रमाणे लोहचुंबक लोखंडाला आपल्याकडे आकर्षित करून घेते त्याचप्रमाणे पुण्यवान साधकाकडे सद्गुरू आकर्षिले जातात. अशा साधकांचा शोध घेत घेत सद्गुरू त्यांच्यापर्यंत येऊन पोहोचतात. याबाबत संत-वाङ्मयात अनेक उदाहरणे आलेली आहेत. 'नवनाथ कथासार' या ग्रंथात एक कथा आहे. बद्रिकाश्रमात तपश्चर्या करीत असलेल्या 'मच्छिंद्रनाथांच्या' स्वत: भेटीस जावून 'दत्तमहाराजांनी' त्यांना 'नाथसंप्रदायाची दीक्षा' दिली. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांना स्वप्नात गुरुने आपले नाव सांगून 'चैतन्य संप्रदाय' व 'रामकृष्णहरि' हा षडाक्षरी मंत्र सांगितला. विदर्भातील सुप्रसिद्ध संत 'गाडगे महाराज' हे परीट समाजातील. त्यांचे पूर्वीचे नाव 'ढेबूजी.' काही लोक त्यांना 'गोधडे महाराज'ही म्हणत असत. स्वत: सद्गुरू त्यांच्याजवळ गेले व त्यांना संसारापासून अलिप्त केले. यावरून साधकाच्या मागच्या जन्मातील संचित जर चांगले असेल तर अशा साधकाकडे स्वत: सद्गुरू जावून त्याच्या हातून जगाच्या कल्याणाचे महान कार्य करून घेतात असे दिसून येते. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात :

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारे ॥

सद्गुरूंचे अनेक शिष्य असतात. परंतु एखाद्या शिष्याच्या हातूनच जगाच्या कल्याणाचे महान कार्य केले जाते. पश्चिम बंगाल येथील 'सुप्रसिद्ध संत रामकृष्ण परमहंस' यांचे अनेक शिष्य होते. काही शिष्य विद्यापारंगत होते; वकील होते, डॉक्टर होते, प्राध्यापक होते. समाजातील सर्वच थरातील लोक त्यांचे शिष्य होते. 'रामकृष्ण परमहंसांच्या' अनेक शिष्यांपैकी 'स्वामी विवेकानंद' एक सत्‌शिष्य होते. स्वामी विवेकानंदांवर रामकृष्ण परमहंसांचे अतिशय प्रेम होते. त्यांनी त्यांच्यावर पूर्ण कृपा केली. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात :

अधिकार तैसा करू उपदेश। साहे ओझे त्यास तैसे देऊ ॥

पुढील भविष्य जाणून स्वामी विवेकानंदांना सद्गुरू रामकृष्ण परमहंस यांनी परिपूर्ण केले. पुढे शिकागो (अमेरिका) येथे भरलेल्या सर्वधर्मपरिषदेत आपल्या वकृत्वाने स्वामीजींनी जमलेल्या सर्व श्रोत्यांची मने जिंकली व 'हिंदू धर्माची पताका' तेथे लावली. शिवाय हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व मान्य करायला भाग पाडले. ज्याप्रमाणे 'स्वामी विवेकानंदांना' 'सद्गुरू रामकृष्ण परमहंस' हे सद्गुरू भेटले त्याचप्रमाणे संतश्रेष्ठ वामनबाबा यांना 'रामकृष्ण परमहंस' या सद्गुरुंची प्राप्ति झाली.

सद्गुरूंचा महिमा अगाध आहे. त्यांचा महिमा वर्णन करणे अतिशय कठीण ! परिस लोखंडाचे सोन्यात रूपांतर करते, पण स्वत: मात्र सोने होऊ शकत नाही. सद्गुरु स्वत: सोन्यासारखे तेजस्वी असतात व आपल्या कृपादृष्टीने शिष्याला सुवर्णासारखे तेजस्वी करतात. आपणासारिखे करिती तात्काळ।

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात :

लोह परिसाची न साहे उपमा। सद्गुरू महिमा अगाधचि ॥

सद्गुरूंची भेट झाल्यानंतर 'वामनबाबा' यांचे संपूर्ण जीवनचरित्र बदलले. 'रामकृष्ण परमहंस' हे संन्यास घेण्यापूर्वी संसारी होते. कालांतराने त्यांनी संसाराचा त्याग केला व संन्यासाची 'दीक्षा' घेतली. नंतर त्यांनी 'बारा ज्योतिर्लिंगांपैकी' एक 'ज्योतिर्लिंग' असलेल्या, जेथून उगम पावून असंख्य भाविकांना परम पवित्र करीत करीत, लाखो लोकांचे जीवन समृद्ध करणाऱ्या 'भीमा' नदीचे उगमस्थान, निसर्गरम्य ठिकाण, अनेक ऋषीमुनी व संत-महात्म्यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या ठिकाणी बारा वर्षे तपश्चर्या केली. ते ठिकाण म्हणजेच 'भीमाशंकर' होय. संन्यास मार्गात अतिशय उच्च पदाला पोहोचलेल्या महात्म्यांना 'परमहंस' असे म्हणतात. 'रामकृष्ण परमहंस' हे खऱ्या अर्थाने 'परमहंस' होते. तपाचे माहात्म्य खूप मोठे आहे. म्हणून ज्ञानेश्वर महाराज आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात म्हणतात : तपाचे सामर्थ्य तपिन्निला अमूप। चिरंजीव कल्प वैकुंठी नांदे ॥

त्यानंतर 'रामकृष्ण परमहंस' हे तीर्थाटनासाठी बाहेर पडले. ते फिरत फिरत 'श्री मलंग गड' या परिसरात आले. दैवाच्या संकेताप्रमाणे वामनबाबा व रामकृष्ण परमहंस यांची भेट झाली. रामकृष्ण परमहंस यांनी आपला वरदहस्त त्यांच्या मस्तकावर ठेवला. सद्गुरूंच्या कृपाहस्ताने तात्काळ वामनबाबांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. सद्गुरूंनी त्यांच्यावर पूर्ण कृपादृष्टी केली. रामकृष्ण परमहंस हे शिष्य जमविण्याच्या मागे लागले नाहीत. हाताच्या बोटावर मोजता येतील, इतक्याच शिष्यांना त्यांनी 'अनुग्रह' दिला. त्या सर्व शिष्यांत 'वामनबाबा' त्यांचे आवडते शिष्य होते. त्यांच्यावर त्यांच्या सद्गुरूंचे अतिशय प्रेम होते. ते त्यांच्यावर पुत्रवत प्रेम करीत असत.

हेचि थोर भक्ति आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची ॥

खऱ्या अर्थाने भगवंताची प्राप्ती होण्यासाठी संसाराची आशा सोडावी लागते. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात म्हणतात :

असोनि संसारीं जिव्हे वेगु करीं। वेदशास्त्र उभारी बाह्य सदा ॥३॥ ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा। द्वारकेचा राणा पांडवा घरी ॥४॥

कालांतराने सद्गुरूने त्यांना घराचा त्याग करावयास सांगितले. इतकेच नाही तर त्यांची आपल्यावर निष्ठा आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी प्रयत्न सुरू केले. जर संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे चरित्र पाहिले, तर भक्तिमार्गात आल्यानंतर त्यांनी आपला संसार जनतेकडून लुटविला. स्वत:चा संसार दुसऱ्यांकडून लुटविणारे हे एकच संत. त्याचप्रमाणे,

संताचिया पायी हा माझा विश्वास। सर्वभावे दास झालो त्यांचा ॥

या न्यायाने सद्गुरूंची आज्ञा होताच, मागचा-पुढचा विचार न करता 'सद्गुरू वामनबाबा' यांनी आपला संसार

लोकांकडून लुटविला. किती ही सद्‌गुरूंवर निष्ठा ! त्यानंतर आपल्या शिष्याची परीक्षा घेण्यासाठी रामकृष्णांनी त्यांना आज्ञा केली, 'ब्राह्मण करवला' येथील मारूतीच्या मंदिरात वास्तव्य करण्यास त्यांना सांगितले. सद्‌गुरूंची आज्ञा प्रमाण मानून वामनबाबांनी मारूतीच्या मंदिरात राहण्याचा विचार केला. कारण पत्नीसह मारुतीच्या मंदिरात वास्तव्य करणे साधीसुधी, सहज बाब नव्हती. ते एकप्रकारचे अग्निदिव्यच होते. 'वामनबाबा' सद्‌गुरूंनी घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यांना एकच माहीत होते, सर्वप्रकारच्या सुखाची सामुग्री फक्त संतांच्या किंवा सद्‌गुरूंच्या पायाजवळ असते.

हेचि एक संताठायी । लाभ पायी उत्तम ॥

संत एकनाथ महाराज एका अभंगात सद्‌गुरू महिमेबाबत म्हणतात :

गुरू माता गुरू पिता । गुरू आमची कुळदेवता ॥१॥ थोर पडता सांकडे । गुप्त रक्षी मागेपुढे ॥२॥ काया वाचा आणि मन । गुरुचरणीचं अर्पण ॥३॥ एका जनार्दनी शरण । गुरु एक जनार्दन ॥४॥

मारूतीच्या मंदिरात वास्तव्य करण्यास गेल्यानंतर आपली उपजीविका कशी चालेल, याचा त्यांनी विचारच केला नाही. म्हणतात ना, ''देवाची करणी व नारळात पाणी''. कुणालाही न सांगता त्यांची उदर-निर्वाहाची सोय होऊ लागली. संतश्रेष्ठ एकनाथ महाराज आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात म्हणतात :

पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा। दास सद्‌गुरूचा तोचि जाणे ॥

ज्याच्याजवळ पूर्वजन्मीच्या सुकृताची (पुण्याची) ठेव आहे, ज्याने सद्‌गुरूने सांगितल्याप्रमाणे परिपूर्ण अभ्यास केला आहे, व जो खऱ्या अर्थाने सद्‌गुरूंचा एकनिष्ठेने दास आहे, त्यालाच खरेखुरे भक्तीचे वर्म समजते.

चातुर्मास सुरू झाल्यानंतर 'रामकृष्ण परमहंस' यांनी भक्तीचे अधिष्ठान मजबूत होण्यासाठी वामनबाबांकडून चातुर्मासात मौनव्रत धारण करण्यास सांगितले. संतश्रेष्ठ रामदास स्वामी म्हणतात :

प्रयत्न आहेत चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे ॥

याप्रमाणे वामनबाबांनी मौनव्रत धारण करून सद्‌गुरूने दिलेल्या गुरुमंत्राचे अखंड नामस्मरण करण्यास सुरुवात केली. चातुर्मास सुरू करताच बाबांच्या पायाला गळू झाला. त्या गळूमुळे त्यांना मरणप्राय यातना होऊ लागल्या. रात्रीच्या वेळी झोपसुद्धा लागेनाशी झाली. त्यामुळे संपूर्ण चातुर्मासात त्यांच्याकडून अखंड नामस्मरण घडू लागले. संतश्रेष्ठ एकनाथ महाराज आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात म्हणतात :

आवडीने भावे हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥१॥ नको खेद करू कोणत्या गोष्टीचा । पती तो लक्ष्मीचा जाणतसे ॥२॥ सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसे नाही ॥३॥ जैसी स्थिती आहे तैशापरी राहे । कौतुक तूं पाहे संचिताचे ॥४॥ एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा । हरिकृपे त्याचा नाश झाला ॥५॥२३॥

याप्रमाणे संपूर्ण चातुर्मास संपल्यावर बाबांनी मौनव्रताची सांगता केली. त्याचदिवशी पायाला झालेला गळू बरा झाला. वामनबाबा यांनी आपल्या सद्‌गुरूंची एकनिष्ठेने सेवा केली. काया, वाचा व मनाने ते आपल्या सद्‌गुरूंची सेवा करीत असत. साधुच्या सेवेचे, संगतीचे मर्म आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात ज्ञानेश्वर महाराज सांगतात :

योगयाग विधि येणे नाहे सिद्धि । वायाचि उपाधि दंभधर्म ॥१॥ भावेवीण देव न कळे नि:संदेह । गुरुवीण अनुभव कैसा कळे ॥२॥ तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त । गुजेवीण हित कोण सांगे ॥३॥ ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात । साधूचे संगती तरणोपाय ॥४॥५॥

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात म्हणतात :

स्वहिताकारणे संगती साधूची । भावे भक्ति हरीची भेटी तेणे ॥१॥ हरि तेथे संत संत तेथे हरि । ऐसे वेद चारी बोलताती ॥२॥

वामनबाबा सद्‌गुरूंच्या आज्ञेप्रमाणे बारा वर्षे मारुतीच्या मंदिरात राहिले. ते आता खऱ्या रूपाने नावरूपाला आले होते. त्यांच्यामागे सद्‌गुरूंची पूर्ण कृपा व तपश्चर्येची शक्ती उभी राहिली होती. ज्याप्रमाणे भगवंताला वामनरूपी अवतार घेऊन जगाच्या कल्याणासाठी बळी राजाला पाताळात घालावे लागले त्याप्रमाणे वामनबाबा यांनी दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना सुष्ट करण्याचे महान कार्य हाती घेतले. व्यसनाधीन झालेल्यांना व्यसनातून मुक्त केले. दु:खी, पीडित व संसारात चिंताग्रस्त असलेल्या लोकांना सहारा दिला, दिलासा दिला. कारण त्यांचे नावच 'वामन' असे होते; वा+मन = वामन, म्हणजे ज्यांच्या मनात कुठल्याही प्रकारची वासना नाही, असे वासनारहित मन असलेले 'थोर महात्मा', म्हणजेच 'सद्‌गुरू वामनबाबा' होय ! वामनबाबांची मूर्तीही वामनासारखीच बटु होती. वामनबाबांचे अंत:करण पाण्यासारखे शुद्ध व निर्मळ होते. ते समदृष्टीने सर्वांकडे पाहात असत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीत म्हणतात :

गायीची तृष्णा होऊनी हरूं । व्याघ्रा विष होऊनी मारूं । हे नेणेची आपपरूं । तोय जैसे ॥

वामनबाबा यांच्याकडे 'गुरूदीक्षा' घेण्यासाठी अनेक भाविक साधक 'ब्राह्मण करवळा' येथे येऊ लागले. तेथे असताना अनेक लोकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. 'वाकळण' येथील ब्राह्मण समाजातील त्या भागात सुपरिचित असलेले कै. धोंडू नाना जोशी हे वारंवार येत असत. त्यांच्या अनेक सत्‌शिष्यांपैकी कै. दादू पाटील, तळोजे, सुप्रसिद्ध भजनसम्राट श्री. तुळशीरामबुवा दीक्षित, सुप्रसिद्ध कीर्तनकार गुरूवर्य श्री. सावळाराम महाराज म्हात्रे, कोपर, डोंबिवली, ता. कल्याण, जि. ठाणे, हे होत.

कालांतराने वामनबाबा 'सिद्धी करवळ्यास' राहण्यास गेले. त्या ठिकाणी त्यांचे एक सत्‌शिष्य कै. दादू पाटील यांनी त्यांना राहण्यास एक घर दिले. तेथे

गेल्यावर माघ वद्य दशमी, एकादशी व द्वादशीचा कार्यक्रम सुरू करण्यात आला. सदरच्या कार्यक्रमास लोकांनी सढळ हातांनी मदत करण्यास सुरुवात केली. नामांकित कीर्तनकार व भजन मंडळी कार्यक्रमास येऊ लागली. ह्या तीन दिवसांच्या कार्यक्रमास १५०० ते २००० भाविक भक्त हजेरी लावण्यासाठी येत असत. त्या ठिकाणी बाबा १२ वर्षे राहिले.

त्यानंतर कै. दादू पाटील त्यांना तळोजे येथे राहण्यास घेऊन गेले. तळोजे येथे वास्तव्य करण्यासाठी गेल्यानंतरही बाबांकडे येणाऱ्या भाविक भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली.

भगवान श्रीकृष्णाचे चरित्र पाहिले, तर गोकुळातील समस्त प्रजेचे त्यांच्यावर अतिशय प्रेम होते. कंसाच्या निमंत्रणावरून भगवान श्रीकृष्ण 'गोकुळ' सोडून 'मथुरे'त गेले, ते परत गोकुळात आले नाहीत. 'मथुरा' सोडून 'द्वारके'स रहावयास गेले, परत मथुरेस आले नाहीत. वामनबाबांचे चरित्रही असेच आहे. आपले जन्मगाव 'कल्हे' सोडून 'ब्राह्मण करवल्या'स राहण्यास आले, परत 'कल्हे' येथे गेले नाहीत. 'सिद्धी करवल्यास' राहण्यास गेले, परत 'ब्राह्मण करवल्या'स गेले नाहीत. 'सिद्धी करवळा' सोडून 'तळोजे' येथे राहण्यास गेले, परत 'सिद्धी करवल्या'स गेले नाहीत. पूर्वी वास्तव्य केलेल्या ठिकाणी गेल्यास त्या ठिकाणाची आसक्ती निर्माण होईल, ती होऊ नये, हाच मुख्य उद्देश त्यांचा असला पाहिजे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज म्हणतात : जो संसारात राहून संसारापासून विरक्त असतो, त्याच्या घरी प्रत्यक्ष भगवंताचा वास असतो, मूर्तिमंत भगवंत त्याच्या घरी नांदत असतो. वामनबाबा संसारी असूनही खऱ्या अर्थाने ते महान संन्यासी होते. एकदा संन्यास घेतला की, संन्याशाला संन्यास धर्माचे तंतोतंत पालन करावे लागते. कुठल्याही गोष्टीवर आसक्ती ठेवावयाची नसते. संन्याशाने कुठल्याही गोष्टीचा संग्रह करावयाचा नसतो. संन्यास धर्माचे मर्म श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीत म्हणतात :

मी आणि माझी आठवण। हे विसरले जयाचे अंत:करण। तो संन्यासी जाण। पार्था निरंतर ॥

वामनबाबा यांनी संसारावर तुळशीपत्र वाहिले होते व ते खऱ्या अर्थाने संन्यासी जीवन जगत होते.

सहज बोलणे हित उपदेश। करोनी सायास शिकविती ॥

वामनबाबा निर्मळ अंत:करणाचे होते. त्यांची वाणी रसाळ होती. अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ। वामनबाबा यांनी कधी प्रवचन केले नाही, की कधी कीर्तन केले नाही, पण त्यांची वाणी अमृतमय होती. त्यांच्या सहज बोलण्यातूनसुद्धा उपदेश होत असे. अवघड विषयसुद्धा सोप्या भाषेत स्वानुभवावरून सांगण्याची त्यांची हातोटी होती.

वामनबाबांच्या समवेत दोन महान योग्यांचे वास्तव्य होते. ते पिशाच्च वृत्तीने रहात असत. जे ज्ञानी असतात, ते लोकांच्या संसर्गापासून लांब राहण्यासाठी वेड्याचे पांघरूण अंगावर ओढून घेत असतात. कारण वेडे वाटावे असे महात्म्यांचे वागणे असते. त्यांना खरे ओळखणारे फार कमी असतात. ते नामरहित असल्यामुळे एका योग्याला बाबा 'भोळा' म्हणत असत व दुसऱ्याला 'जडभरत' म्हणत असत. बाबांनी ठेवलेली दोन्ही नावे योग्य अशीच होती. कारण भोळा यांचे जीवन व रहाणीमान भोळ्या शंकरासारखेच होते. महाभारतात वर्णन केलेल्या जडभरतासारखे 'जडभरत' यांचे रहाणीमान होते. जडभरत नेहमी विदेही अवस्थेत रहात असत. त्यांना त्यांच्या देहाची स्मृतीच रहात नसे. भोजन करताना गोड, तिखट, आंबट, खारट व कडू यांची चव ते जाणत नसत. ते नेहमी ब्रह्मानंदात डुलत असत. ते कुठेही बसत व कुठल्याही ठिकाणचे पाणी पीत असत. एकदा ते व बाबा रस्त्याने चालले असताना एक भयानक मोठा सर्प अकस्मात जोराने धावत त्यांच्या जवळ आला. सर्पाची व जडभरत यांची दृष्टादृष्ट झाली. सर्प जागेवरच स्तब्ध झाला. सर्पाने तीन वेळा दोघा महात्म्यांना नमस्कार केला व निघून गेला. जडभरत त्यावेळी नुसते हसत उभे होते. त्यावेळी वामनबाबा विदेही अवस्थेत गेले होते.

सद्गुरू वामनबाबा यांचा महिमा ऐकून डोंबिवली व त्या परिसरात असलेल्या खेडेगाव विभागातील अनेकांनी सद्गुरू वामनबाबा यांच्याकडून 'दीक्षा' घेतली. श्री. सावळाराम धागो म्हात्रे यांनी बाबांची महती ऐकून दीक्षा घेतली. त्यांच्या सत्‌शिष्यांपैकी कै. पद्मनाभ शास्त्री पालेय, दादर, मुंबई, हे अतिशय विद्वान होते. तसेच श्री. बाबू मढवी, आयरे, पो. डोंबिवली, ता. कल्याण, जि. ठाणे हे होत. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात :

संतसमागमे धरावी आवडी। करावी तांतडी परमार्थाची ॥

गुरूवर्य सावळाराम महाराज हे बाबांचे एकनिष्ठ शिष्य होते. त्यांनी बाबांनी सांगितल्याप्रमाणे साधना केली. सावळाराम महाराजांवर बाबांचे आत्यंतिक प्रेम होते. एकादशीच्या कार्यक्रमानिमित्त महाराज तळोजे येथे गेले असताना बाबांनी महाराजांना आज्ञा केली, आजपासून तुम्ही कीर्तन-सेवेचा श्रीगणेशा करायचा !

महाराज त्यावेळी चिंताग्रस्त झाले. त्यांच्या छातीत धस्स झाले. कारण यापूर्वी त्यांनी कधीही कीर्तन केले नव्हते. बाबांनी त्यांना सांगितले, मी कधी प्रवचन केले नाही व कधी कीर्तनही केले नाही. परंतु कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना सत्‌मार्गावर आणण्याची जबाबदारी मी तुमच्यावर टाकीत आहे. मला विश्वास आहे की, तुमच्यावर टाकलेली जबाबदारी तुम्ही यशस्वीपणे पार पाडाल. कीर्तनरूपी सेवेतून तुम्ही दीन-दुबळ्या, भवसागरात पिडलेल्या लोकांना ज्ञानाचा बोध करा व कीर्तनरूपी सेवा अखंडित चालू ठेवा. माझी पूर्ण कृपादृष्टी तुमच्यावर आहे. ही सद्गुरूंची कृपा ! कारण संतांचे देणेच जगावेगळे असते. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात :

या या संतांचे देणे। कल्पतरू हुने दुणे ॥

परिसा परिस अगाध देणे। चिंतामणी ठेंगणा॥ या या संतासी भेटता। हरे संसाराची व्यथा॥ पुढता पुढती माथा। अखंडित ठेवीन॥

महाराजांनी बाबांची आज्ञा प्रमाण मानली व कीर्तनरूपी सेवा बाबांसमोर केली. ते सुप्रसिद्ध कीर्तनकार होते. डोंबिवली व आजूबाजूच्या खेडचात कीर्तनरूपी सेवेतून त्यांनी क्रांती घडवून आणली. व्यसनाधीन झालेल्या अनेकांना त्यांनी सत्मार्गावर आणण्याचे महान कार्य केले. ते अनेकांचे श्रद्धास्थान, तसेच प्रेरणास्थान आहेत. अनेक ठिकाणी त्यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने 'हरिनाम सप्ताह' व इतर अनेक धार्मिक कार्यक्रम सुरू झालेले आहेत. कीर्तनरूपी सेवा कशाचीही तमा न बाळगता त्यांनी अखंडपणे चालू ठेवली होती. कारण कीर्तनाचा महिमा अगाध आहे.

कीर्तन चांग कीर्तन चांग। जेणे अंग होय हरिरूप॥

महाराजांनी कीर्तनरूपी सेवेतून 'परमार्थरूपी बीज-रोपण' केले. 'भावाचा' मळा लावला. त्याला 'भक्तीचे' पाणी घातले. 'श्रद्धारूपी' खत त्याला घातले. त्याच्याभोवती 'वैराग्यरूपी' कुंपण घातले. नित्य आनंदरूपी फुलांनी व फळांनी तो बहरू लागला आहे. याला कारण एकच, महाराजांची तपश्चर्या! कीर्तनरूपी सेवेतून समाजप्रबोधनाचे कार्य महाराज अखंडपणे करीत राहिले. विश्रांती अशी त्यांना माहीतच नव्हती. संपूर्ण ठाणे जिल्हा त्यांनी पिंजून काढला. त्यासाठी अनेक संकटांना व कटु प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले. अथक प्रयास करावे लागले. बाबांनी सांगितलेले कार्य त्यांनी अखंडपणे चालू ठेवले. ते कीर्तनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जावून लोकांना सदुपदेश करीत. त्यांचे ध्येय एकच होते, लोकांना सत्मार्गावर आणणे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात:

बुडते हे जग पहावेना डोळा। येतो कळवळा म्हणोनिया॥

अशा कीर्तनरूपी सेवेतून समाजाला सुधारण्यासाठी हातात कंकण बांधणाऱ्या गुरूवर्य महाराजांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम.

वामनबाबा यांना 'हरिपाठाची' अवीट गोडी होती. वारकरी संप्रदायाच्या नियमाप्रमाणे वारकऱ्यांनी दिवसातून एकदा तरी 'हरिपाठ' म्हटला पाहिजे. बाबा आपल्या शिष्यांना नेहमी सांगत असत, हरिपाठ म्हणत असताना हरिपाठाकडे लक्ष ठेवून 'हरिपाठ' म्हणत जा! संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात:

तुका म्हणे लक्ष लक्षोनि अंतरी। तोच वारकरी पंढरीचा॥

आपले बाह्य शरीर स्वच्छ होण्यासाठी स्नानाची आवश्यकता आहे. परंतु अंत:करणाच्या शुद्धीसाठी शुद्ध भावभक्तीची आवश्यकता आहे, नित्य हरिपाठाची आवश्यकता आहे. हरिपाठाचा अगाध महिमा वामनबाबा यांनी जाणला होता. दररोज नित्यनियमाने संध्याकाळी शिष्यमंडळी त्यांच्यासमोर बसून 'हरिपाठ' करीत असत. त्यावेळी बाबा हरिपाठाशी एकरूप होत असत. त्यांचे मन एकाग्र होत असे. त्यांना भावसमाधी लागत असे. हरिपाठात असे कोणते माहात्म्य आहे की, ज्यामुळे बाबा ब्रह्मानंदात लीन होत असत, हे तत्व जाणावयाचे असल्यास संतांनी सांगितलेले हरिपाठाचे मर्म पाहिले पाहिजे. सर्वप्रथम ज्ञानियांचा राजा। ज्ञानोबा माझा॥ असे ज्यांच्याबद्दल बोलले जाते, ते ज्ञानेश्वर महाराज आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात ठिकठिकाणी आत्मप्रचितीद्वारे काय सांगतात ते पाहू या!

ज्ञानदेव पाठ हरि हा वैकुंठ। भरला घनदाट हरि दिसे॥४॥२॥

ज्ञानेश्वर महाराज सांगतात: 'हरीची प्राप्ती' हेच वैकुंठ असून तोच सर्व ठिकाणी व्यापून राहिला आहे.

नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी। कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी॥१॥१४॥

नित्यनियमाने, सत्य संकल्पाने जो हरिपाठ करतो, कली व काळालासुद्धा त्याच्याकडे वक्रदृष्टीने पाहण्याची हिंमत होत नाही.

ज्ञानदेवा चित्ती हरिपाठ नेमा। मागिलिया जन्मा मुक्त झालो॥४॥१५॥

ज्ञानेश्वर महाराज सांगतात: चित्तात साठवून हरिपाठ केल्यामुळे जन्मातून मुक्तता मिळते.

हरिपाठ कीर्ति मुखे जरी गाय। पवित्रची होय देह त्याचा॥१॥१७॥

हरिपाठाची कीर्ति मुखाने जरी गायली तरी साधकाचा देह पवित्र होतो.

मनोमार्गे गेला तो तेथे मुकला। हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य॥३॥१८॥

मनाच्या मार्गाने जाणारा साधक सर्वस्वाला मुकतो, परंतु ज्याचे मन हरिपाठात स्थिर होते, तोच खरा भाग्यवंत!

अनंत जन्माचे तप एक नाम। सर्व मार्ग सुगम हरिपाठ॥२॥ योगयाग क्रिया धर्माधर्म माया। गेले ते विलया हरिपाठी॥३॥१९॥

अनंत जन्मांतील तपाचे फळ म्हणजेच 'नामस्मरण' हेच होय! हरिपाठामुळे सर्व मार्ग सहज साध्य होतात. योगाभ्यास, यज्ञक्रिया, विहित कर्म, धर्म-अधर्म 'हरिपाठात' विलीन होतात.

हरिपाठी गेले ते निवांतचि ठेले। भ्रमर गुंतले सुमनकलिके॥३॥२०॥

भुंगा जसा सुगंधी वासामुळे कमळाच्या कळीमध्ये रमतो, त्याचप्रमाणे जे साधक हरिपाठात स्थिर होतात, अशा साधकांना कायमची विश्रांती मिळते, म्हणजेच ते जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटतात.

ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ। पूर्वजा वैकुंठ मार्ग सोपा॥४॥२१॥

ज्ञानेश्वर महाराज सांगतात: ज्या साधकाचा हरिपाठ परिपूर्ण झाला आहे, अशा साधकाच्या पूर्वजांना वैकुंठाची प्राप्ती सहज होते.

शांतीचा पुतळा म्हणून ज्यांचे वर्णन केले जाते, ते संतश्रेष्ठ एकनाथ महाराज आपल्या नित्यपाठाच्या हरिपाठात आत्मप्रचितीद्वारे सांगतात:

कर्म-उपासना-ज्ञान-मार्गी झाले। हरिपाठी आले सर्व मार्ग॥३॥ नित्य प्रेम

भावे हरिपाठ गाय। हरिकृपा होय तयावरी ॥४॥ झाला हरिपाठ बोलणे येथूनी। एका जनार्दनी हरि बोला ॥५॥२५॥

ज्ञानमार्गामध्ये कर्म व उपासना हे दोनच मार्ग येतात, परंतु 'हरिपाठात' सर्वच मार्ग येतात. नित्यप्रेमाने जो 'हरिपाठ' गातो, त्याच्यावर ईश्वराची कृपा होते. अशाप्रकारे हरिपाठाचे माहात्म्य सांगून हरिपाठ संपविला. संतश्रेष्ठ एकनाथ महाराज मुखाने ''हरि हरि'' बोला असे आवर्जून सांगतात.

ज्ञानेश्वर महाराजांचे जेष्ठ बंधु व थोर सद्गुरू संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ आपल्या नित्यपाठाच्या आत्मप्रचितीद्वारे सांगतात :

निवृत्ति साकार हरिनाम पाठ। नित्यता वैकुंठ हरिपाठ ॥४॥४॥

निवृत्तीनाथांना हरिपाठ हा साकार झाला असून हरिपाठामुळेच ते नित्य वैकुंठात राहतात.

निवृत्ती म्हणे हरिपाठ जपा। जन्मांतर खेपा अंतरती ॥४॥६॥

निवृत्तीनाथ म्हणतात, हरिपाठ नाम जपल्याने जन्मजन्मांतरीच्या येरझाऱ्या थांबतील, म्हणजेच किती वेळा जन्मा यावे। किती व्हावे फजीत ॥

परत जन्म-मरणाच्या फेऱ्यात येणे नाही.

निवृत्ती हरिपाठ नाम हेचि वाट। प्रपंच फुकट दिसे आम्हा ॥४॥१३॥

निवृत्तीनाथ म्हणतात, हरिपाठ नाम हीच भगवंतापर्यंत जाण्याची वाट असून प्रपंच हा व्यर्थ आहे, असे आम्हाला वाटते.

वारकरी संप्रदायात हरिपाठ नित्यनेमाने म्हटलाच पाहिजे, असा नियम आहे. परंतु हरिपाठ म्हणणे वेगळे व हरिपाठ जाणणे वेगळे. ज्याला हरिपाठ समजला, ज्याने हरिपाठाची अविट गोडी चाखली, त्याचा जन्म सफल झाला. कारण 'हरिपाठ' म्हणजेच हरीला पाहून ठसविणे, म्हणजेच हरीला अंत:करणात साठविणे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात : सांठविला हरि जिही हृदय मंदिरीं। त्याची सरली येरझार। झाला सफल व्यापार ॥ कारण ज्याने हरीला आपल्या अंत:करणात साठविले, त्याच्या जन्माचे सार्थक झाले. हरिपाठाचे महान वर्म व मर्म वामनबाबांनी ओळखले होते, जाणले होते.

ब्रह्मानंदी लागली टाळी। कोण देहाते सांभाळी ॥ अशी त्यांची अवस्था होत असे. हरिपाठ ऐकता ऐकता त्यांनी आपली आत्मज्योत प्रभूच्या आत्मज्योतीत विलीन केली.

वामनबाबा यांनी षष्ठीलाच देह का ठेवला ? त्याचे मर्म आपण जाणले पाहिजे. हिंदू धर्माच्या शास्त्राप्रमाणे प्रत्येक तिथीच्या माहात्म्याचे वर्णन पुराणात केले आहे. प्रतिपदा ते पौर्णिमा व अमावास्या ह्या सर्वांना कोणत्या-ना-कोणत्या कथांचा संदर्भ देवून पुराणात वर्णन केले आहे.

षष्ठी या तिथीचे माहात्म्य पुराणात अनेक ठिकाणी वर्णन केले आहे. 'चंपाषष्ठी' 'कपिलाषष्ठी', तसेच संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांची गुरूपरंपरा 'षष्ठी' या तिथीपासून सुरू झाली आहे. एकनाथ महाराजांचे सद्गुरू 'जनार्दन स्वामी' यांना दत्तात्रयांकडून गुरु-उपदेश झाला ती तिथी षष्ठी ! जनार्दन स्वामींकडून एकनाथ महाराजांना 'गुरूदीक्षा' मिळाली, ती तिथी षष्ठी ! एकनाथ महाराजांना 'गुरू दत्तात्रयांचे' दर्शन झाले ती तिथी षष्ठी. जनार्दन स्वामींनी देह ठेवला ती तिथी षष्ठी. नाथमहाराजांनी देह ठेवला ती तिथी म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठी. त्या तिथीला 'नाथ षष्ठी' असेही म्हणतात. इतका 'षष्ठी' या तिथीचा अगाध महिमा आहे. या तिथीचा महिमा संत शिरोमणी वामनबाबा यांनी जाणला होता. म्हणूनच त्यांनी 'षष्ठी' ही तिथी एक मोठे पर्व मानून इहलोकाची यात्रा संपवून परलोकाच्या महायात्रेला 'षष्ठी' या तिथीपासून सुरुवात केली.

सद्गुरू वामनबाबा महान योगी होते. हरिपाठ चालू असताना ते पद्मासन घालून बसले, ते शेवटपर्यंत ! त्यांनी हरिपाठ-समाप्तीच्या वेळी रात्रौ ठीक ८-३० वाजता मंगळवार, फाल्गुन, शुद्ध षष्ठी, शके १८७९ रोजी आपली दिव्य ज्योत परमेश्वराच्या ज्योतीत विलीन केली. फाल्गुन, शुद्ध षष्ठी हा दिवस बाबांची पुण्यतिथी म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. फाल्गुन, शुद्ध षष्ठीच्या दिवशी बाबांच्या संगमरवरी मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

सद्या तळोजा येथे बाबांचा मठ आहे. पूर्वी सदरच्या मठाचे बांधकाम शिष्यांनी वर्गणी काढून केले होते. या मठाचा जीर्णोद्धार बाबांचे सत्शिष्य श्री. आयरे, डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे येथील ह.भ.प. श्री. बाबूमहाराज मढवी यांनी केला आहे. मठाचे नाव बाबा असतानाच 'शांती कुटीर' असे ठेवण्यात आले होते. बाबांजवळ अखंड शांती नांदत होती. म्हणूनच बाबांनी वरील नाव मठाला ठेवले होते. तसेच, येथे येणाऱ्या भाविकांनी शांतीने व समाधानाने रहावे, हाच उद्देश बाबांचा यामागे असला पाहिजे. शिवाय भक्तिमार्गात प्रत्येक साधकाला शांतीची अत्यंत आवश्यकता असते. अखंड स्मरण रहावे म्हणूनच मठाला 'शांती कुटीर' असे नाव दिले असावे.

बाबा हयात असताना शिष्यवर्ग बाबांना दक्षिणा देत असत. बाबा दक्षिणेची रक्कम एका पेटीत टाकीत असत. माघ, शुद्ध दशमीच्या कार्यक्रमासाठी गुरुवर्य ह.भ.प. श्री. सावळाराम महाराज बाबांकडे गेले असताना बाबांनी दक्षिणा असलेली पेटी महाराजांच्या ताब्यात दिली. त्यानंतर काही दिवसांनीच बाबांनी समाधी घेतली. सर्व शिष्यांनी विचार करून त्या रकमेतून श्री गोपाळकृष्णाची संगमरवरी मूर्ती आणून मूर्तीची 'शांती कुटीर'मध्ये प्रतिष्ठापना केली. तळोजा येथे माघ, शुद्ध दशमीचा कार्यक्रम अखंड चालू असतो.

ज्या ठिकाणी राजा जातो व राहतो, तेथे राजधानी वसते. त्या ठिकाणाला राजवैभव प्राप्त होते. परंतु राजधानी कायम स्वरूपाची नसते, राजधानीचा नाश होत असतो. परंतु संत ज्या ठिकाणी वास्तव्य करतात, त्या ठिकाणी तीर्थक्षेत्रच निर्माण होते. त्या ठिकाणचे माहात्म्य अधिक मोठ्या प्रमाणात वाढत जाते. कारण सकल तीर्थे संतांच्या पायांजवळ वास करीत असतात. संत हे चालते-बोलते तीर्थक्षेत्रच असतात. आज तळोजा हे एक तीर्थक्षेत्रच बनले आहे.

**- श्री. हरिश्चंद्र काळू म्हात्रे**
डोंबिवली (प.), ठाणे.

# पूर्णत्वाने जगा !

- चकोर आजगांवकर

● अलीकडच्या काळातील एक महान संत, विचारवंत जे. कृष्णमूर्ती यांचे विचार हे सर्वसामान्य माणसाला समजण्यास गूढ वाटतात. तथापि अध्यात्मवाद्यांना त्यांचे नितांत आकर्षण वाटत असते. त्यांच्या विचारांच्या काही शलाकांचे हे चिंतन.

● **प्रेम** – प्रेम हे सत्य आहे. प्रेम याचा अर्थ एकाची दुसऱ्यावर अनुरक्ती एवढा घेतला जातो. तो चूक आहे. प्रेम म्हणजे अशी दिव्य अवस्था आहे, की ज्या अवस्थेमध्ये काळ संपूर्णपणे अलग झालेला आहे. कालचक्र थांबलेले आहे. प्रत्येक क्षण सुंदरपणे जगणे म्हणजे प्रेम. प्रत्येक क्षणाला जगणे म्हणजे प्रेम. प्रेम म्हणजे प्रतिक्षणी जीवन.

● **जीवन** – जगणे याचा अर्थ मनाच्या स्वत:भोवती भ्रमणाऱ्या आत्मकेंद्रित कार्यापासून अलिप्त राहाणे. एरव्ही मन सतत स्वत:ला प्रक्षेपित करीत असते. खऱ्या जीवनाचे उद्दिष्ट स्मरणातील स्मृतिसंचय, ज्ञानाची साठवण इत्यादी संपुष्टात आणणे होय. माणसाने निर्माण केलेला देव, ध्येयवाद, ज्ञान इत्यादी गोष्टी या जीवनातील पळवाटा आहेत. जीवन म्हणजे प्रेम. जीवन म्हणजे सत्य ! कालातीत, मनावाचून जगणे म्हणजेच ईश्वर. खऱ्या जीवनात वा अस्तित्वात मनाचा व मानसिक काळाचा लय झालेला असतो.

● **मन** – मन हे बळजबरीने दडपून शांत होत नाही. मनात जेव्हा सत्याचा उदय होतो, तेव्हा ते स्तब्ध होते. जिवंत मन हे सृजनशील असते. ते अक्रियपणे जागृत असते. विचार, नाती, पूर्वस्मृती, भावी संकल्प यांपासून मुक्त असलेले मन रिकामे नाही, तर सृजनशील असते. त्या शांत स्तब्धतेत शाश्वताचा शोध लागतो. त्या शांत मनात निर्मितीक्षम जिवंतपणा, सृजनशील अस्तित्व प्रकट होते. त्या मुक्त स्थितीतील दक्षतेस 'नित्यावधान' म्हणता येईल. विचाराने विचाराची समाप्ती करता येत नाही. विचारकर्ता जेव्हा अस्तित्वात नसतो तेव्हाच विचार थांबतो. बुद्धीवाद, इच्छांचा खेळ, ईप्सितांचा ध्यास हा मनाला 'अहं'रूपी बळकटी आणतो. मनाचे हे विलास जेव्हा थांबतील तेव्हाच कालातीत, शाश्वत, अपरिमेय सत्य प्रगटते. आपण सत्याच्यामागे जायचे कळते. सत्यच स्वयमेव उदित होत असते.

● **ज्ञान** – एका निष्कर्षाकडून दुसऱ्या निष्कर्षाकडे जाणे या प्रक्रियेस व्यवहारात 'ज्ञान' मानतात. ज्ञान म्हणजे अशा तर्कांची, निष्कर्षांची साठवण नाही. सत्य हे सदैव स्वयंसिद्ध, नित्यनूतन व नित्यजिवंत असते. ती एक ठरीव अवस्था नाही.

● **जीवन-मरण** – जीवन व मरण यांना आपण एकमेकांपासून विभक्त केल्याने दु:खाचा उदय होतो. त्या एकमेव गोष्टी असतील. जीवनमरणाच्या प्रवासामध्ये आपणाला एकटेच जावे लागेल. ज्ञान, अनुभव, स्मृती आपल्याबरोबर येणार नाहीत. मन स्वच्छ करावे लागेल. ज्या समाजरचनेतून देव, धर्म, सुरक्षिततेची भावना, सुखाच्या कल्पना गोळा केल्या असतील त्या त्या कल्पना समाजाला परत कराव्या लागतील. संपूर्ण एकटेपणाने जावे लागेल.

● **पूर्णत्वाने जगणे** – या जगात पूर्णत्वाने जगा ! हे जग अत्यंत सुंदर आहे. आम्ही क्षुद्र मनाने, कोतेपणाने, भयभीतपणे, विभक्तपणे, खंडितपणे जगत असतो. व्यापक, प्रेममय मनाने, हृदयाने जगा ! स्तब्ध मनाने जग पहा ! नामरूपहीन, कालातीत, अखंड, अपरिमेय, सुंदर, जिवंत अस्तित्वाचा शोध तुम्हाला आपोआपच लागेल.

● आपल्याला जीवनाचे मर्म कळावयाचे असेल तर आपण अगदी साधे बनले पाहिजे. राजकारण, महत्त्वाकांक्षा, गर्व, तत्त्ववाद, वासना, भीती यांत गुंतलेले मन साधे, निर्मल, बलवत् बनू शकत नाही. शुद्ध, प्रेममय, व्यापक जाणीव, नित्य अवधान यामुळेच आपण सत्याजवळ जाऊ शकतो. सखोल भावना, उदार, व्यापक बुद्धी यामुळेच सत्यदर्शन घडते. वासनाशून्य तीव्र भाववृत्ती, विचारशून्य व्यापक मन, स्वार्थहेतुशून्य कृती यातून संपूर्ण एकात्म जीवन जगणे शक्य होते.

● एरव्ही मनाचा एक छोटा भाग संपूर्ण मनाला व्यापण्याचा सतत खटाटोप करून मनाला सत्यापासून वंचित ठेवीत असतो. मनाचा सुप्त भाग जागृतीत मनाला नियंत्रित करू शकत नाही. परंतु झोपेत किंवा अनवधानात जेव्हा मनाचा वरचा थर शांत होतो तेव्हा त्याला सुप्त मन आपल्या पूर्वानुभूतीनुसार एका मार्गावर आणीत असते. बाह्यमन बाहेरच्या प्रतिक्रियांप्रमाणे बदलत रहाते. पण अंतर्मन त्याला काबूत राखते. या विचार, अनुमान, निष्कर्ष काढणाऱ्या सुप्त मनाच्या गुलामगिरीतून जाणीव मोकळी करावयाची असते. व्यवहारातून निघणाऱ्या शारीरिक व मानसिक संघर्षातून व्यक्तित्व मुक्त करावयाचे आहे.

● जीवनातील व्यथा, विसंगती, उणीवांपासून दूर पळावयाचे नाही, तर त्यांची प्रक्रिया समजून घ्यावयाची आहे. त्या त्या परिस्थितीतील सौंदर्य व सत्य सरळ सरळ पहावयाचे आहे. त्यातच त्या दु:ख-विसंगतींचे खरेखुरे निराकरण आहे. प्रेम, सुसंगती, विश्वकरुणा, द्वैताचा अभाव यातूनच खरा देव प्रकट होणार आहे. या स्वतंत्र, शांत, उदात्त, उन्मन मनालाच खरे सत्य-शिव सौंदर्य दिसणार आहे.

● जेथे सतत अवधान आहे, तेथे निरामय जीवनही आहे. स्मृती, ज्ञानसंचय यातून रागलोभ निर्माण होतो. या दोन्ही टोकांपासून मुक्त असे सतत निरागस अवधान चालू ठेवा. प्रेमाशिवाय व उदात्त गुणांशिवाय यांत्रिकपणे केले जाणारे ध्यान ही एक फसवणूक होईल. एकाग्रता, धारणा या कृत्रिम क्रिया उपयोगाच्या नाहीत. सहज

(पृष्ठ क्र. ४३ वर)

# साईकृपेचे अनुभव

– श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर
दत्तवाडी, पुणे.



**मा**झे गाव पुणे जिल्ह्यात राजगुरूनगर तालुक्यात तिन्हेवाडी हे आहे. आमच्या घरात आजोबांपासून विठ्ठलाची व दत्ताची भक्ती चालू आहे. वडिलांना मुलगा नव्हता. ज्ञानेश्वरांच्या आशीर्वादाने त्यांना मुलगा झाला, असे ते म्हणत. त्यांनी मुलाला ज्ञानेश्वरांच्या ओटीत घातले व त्याच्या गळ्यात माळ घातली.

तिन्हेवाडीत चौथीपर्यंतच शाळा असल्यामुळे पुढील शिक्षणासाठी मला खेड येथील राजगुरूनगरला जावे लागले. खेडपासून तिन्हेवाडी फार लांब असल्यामुळे वडिलांचे मित्र पोलिस जमादार यांच्या घरी मी राहू लागलो. ते साईभक्त होते. दरगुरूवारी त्यांच्या घरी साईबाबांची आरती होत असे. माझे आईवडील दरगुरूवारी आरतीला येत असत. मलाही अभ्यासाबरोबरच साईबाबांच्या आरतीचा व प्रसादाचा लाभ मिळत असे. त्यामुळे साईभक्तीची गोडी लागली. हळूहळू साईबाबांवर श्रद्धा बसली.

पुढे एकदा गाडगे महाराज यांचे पोलिस लाईनमध्ये कीर्तन झाले. ते ऐकण्याची मला संधी मिळाली. गाडगे महाराजांचा आशीर्वादही मिळाला. नानासाहेब रासने हे निकम यांचे गुरूबंधू होते. ते निकम यांच्या घरी आठ दिवस राहण्यास आले होते. माझ्या आईवडिलांची व त्यांची ओळख झाली.

नानासाहेबांनी आपल्यासोबत मला पुण्याला शिक्षणासाठी पाठविण्याबद्दल माझ्या वडिलांना विचारले. वडील म्हणाले, आम्हाला एक मुलगा व दोन मुली आहेत. तेव्हा नानासाहेब रासने म्हणाले, बाबूराव, साईबाबांवर विश्वास ठेवा ! त्यांच्या कृपेने तुम्हाला गोकुळ अष्टमीला मुलगा होईल. त्याचे नाव कृष्ण ठेवा ! त्याप्रमाणे पुढे योग आला व आई-वडिलांचा साईबाबांवर विश्वास बसत गेला.

माझ्या वडिलांना नानासाहेबांनी १९३८ मध्ये साईबाबांचा फोटो दिला. त्यांनी फोटो घरी नेल्यावर आजूबाजूचे लोक म्हणत की, हा मुसलमानांचा देव आहे. देव्हाऱ्यात कसा काय ठेवता ? त्यावेळी एकदा वडील रात्री झोपले असता साईबाबांनी त्यांना दत्तरूप दाखविले.

एकदा मला तिन्हेवाडीला घरी जाण्याची इच्छा झाली. तसेच, पोळ्याचा सण असल्याने आईने मला बोलाविले होते. मी सात वाजता निघालो. त्या दिवशी अमावास्या होती. अंधार झाल्यामुळे मला भीती वाटू लागली. मी साईबाबांचा धावा करण्यास सुरूवात केली. अचानक आमच्याच वाडीतला वेडा लक्षा मला भेटला. त्यामुळे मला आनंद झाला. त्याचा पोशाख लांब कफनी, टमरेल, हाताला व डोक्याला रूमाल बांधलेला असा होता. या त्याच्या पेहरावामुळे माझ्याबरोबर साईबाबाच चालत आहेत, असं मला वाटू लागलं.

थोडं पुढे गेल्यावर आईवडील हातात कंदील घेऊन मला घेण्यासाठी येत असताना मला दिसले. माझ्यासोबत वेडा लक्षा होता, हे ऐकून आईला संशय आला. त्यावेळी अंधश्रद्धा जास्त होती. अमावास्येचा दिवस असल्याने वेड्या लक्षाबरोबर भूत असणार अशी तिची समजूत झाली. कारण लक्षा मारूतीच्या मंदिरात मूर्तीच्यामागे झोपला होता, हे त्यांनी पाहिलं होतं. आई-वडील माझ्यावर खूप रागावले. त्याचा परिणाम मला थंडी-ताप येण्यात झाला. दुसऱ्या दिवशी निकम यांच्या घरी साईबाबांच्या आरतीला गेल्यावर निकम वडिलांना म्हणाले, बाबूराव, तुम्ही काळजी करू नका. साईबाबा तुमच्या मुलासोबत होते. त्याला भूतबाधा होणार नाही. त्यावर आईवडिलांचा विश्वास बसला. निकम म्हणाले, साईबाबा जुन्या तोफखान्यात प्रकट होतील व लोकांना दर्शन देतील. शिरडीला मुंग्यांसारखी गर्दी होईल. घरोघर बाबांचे फोटो लागतील. शिरडी क्षेत्रात पंढरपूरसारख्या रांगा लागतील.

पुढे निकम यांची भजनी व आरतीची मंडळी शिरडीला जाण्यास निघाली. मलाही त्यांच्यासोबत शिरडीला जाण्याचा योग आला. त्यावेळी संगमनेरचा घाट पाच वाजता बंद होत असे. पाचच्या पुढे एकही गाडी जात नसे. त्यामुळे आम्ही सर्व सकाळीच निघून शिरडीला पोहोचलो. जुन्या शिरडीत साईबाबांचे छोटेसे समाधि-मंदिर होते. द्वारकामाई साधी पत्र्याची पडवी होती. समाधीच्यामागे गरम पाण्याचा बंब होता. बंबातील पाणी घेऊन लोक आंघोळ करीत असत. बंबासमोर ह.भ.प. दासगणू महाराज यांची खोली होती. तेथे त्यांचे भक्त उतरत असत.

काकड आरतीला देव वकील, हरिभाऊ शेळके, दामोलकर, नागेशराव सावंत, नानासाहेब रासने वगैरे मंडळी होती. साईबाबांच्या समाधीला नागेशराव सावंत

आंघोळ घालीत असत. नंतर सर्व आंघोळ घालीत. नानासाहेबांचे बंधू आप्पासाहेब रासने बाबांना गंध लावीत. त्यावेळी बाबांचा फोटो होता. नंतर बाराची आरती होत असे. आरती झाल्यावर आम्ही सर्व मंडळी दीक्षित वाड्यात जेवलो. जेवल्यानंतर ताटावर पैसे ठेवण्याची तेव्हा पद्धत होती. आम्हाला समाधि मंदिराच्या बाजूला खोली मिळाली होती. जेवल्यानंतर तेथे जाऊन विश्रांती घेतली. चार वाजता देव यांचे प्रवचन व ह.भ.प. दासगणू महाराज यांचे कीर्तन होत असे. रात्री नऊ वाजता गावातून बाबांच्या पादुकांची मिरवणूक निघत असे. त्यापूर्वी हलगी वाजवली जात असे. बाबांच्या गुरुस्थानाजवळ सगुण मेरु नाईक राहात होते. त्यांच्या बाकड्यावर बसून सर्व मंडळी भारुड ऐकत. तेथे खूप गर्दी होत असे.

नानासाहेब रासने मला म्हणाले, रघुनाथ, भारूड म्हण ! मी सगुण बाबांच्या मंडळाचे पातळ नेसलो व भारुड म्हणालो,

**विठोबा अमुचा विटेवरी उभा ।**
**जरीचे मंदिर मोत्याचा झुला ॥**
**रखुमाबाई फुगडी खेळे ।**
**जरीचं पातळ भुईवर लोळे ॥**

तसेच विंचू चावला, विंचू चावला हे भारूड म्हटले. माझ्यासोबत गोंदकर बाबा व कानात मोठी बाळी असलेला भालदार भारूड म्हणण्यास होते. नंतर पालखी मंदिरात गेली की आरती होत असे. यावेळी ह.भ.प. दासगणू महाराजांनी एक रुपया व नारळ दिला. तेव्हापासून आजपर्यंत रामनवमी, गुरूपौर्णिमा व विजयादशमी ह्या तिन्ही उत्सवांत श्री साईबाबांनी हजेरी करून घेतली.

सन १९४३ मध्ये माझे वडील स्वर्गवासी झाले व माझ्यावर मोठे संकट कोसळले. त्यामुळे मला पोट भरण्यासाठी पुण्यास जावे लागले. साईबाबा आपल्या पाठीशी कसे उभे असतात याचे हे पुढील उदाहरण. मी पुण्याला जाऊन पोहोचलो. नव्या पुलावरून मंगळवार पेठेत चालत गेलो. तेथे माझे मामा व आजोबा (सुकाळे) राहातात. नव्या पुलावर रासने व निकम यांची भेट झाली. ते मला जुन्या तोफखान्यात रासने यांच्या प्लॉटवर घेऊन गेले. त्या रात्री त्यांच्याच घरी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी नानासाहेब रासने यांच्या दुकानात ३० रु. पगारावर कामाला राहिलो.

त्यावेळी रासने यांचे साईदास मंडळ सदाशिव पेठेत श्री. जोशी यांच्या घरी होते. निकम यांच्या घरी आरती चालत असे. थोड्याच दिवसांत साईबाबांचे मंदिर झाले. मंदिरात गर्दी होऊ लागली. त्यावेळी राजाभाऊ देशपांडे, श्री. बोडके, श्री. मोरे, दास नगरकर, देवळणकर, बबन आढाव, श्री. कदम, रासने वकील, तात्या रासने वगैरे मंडळी येत असत. खडकीवरून शंकर मुदलीयार, लांडगे, तात्या मोरे वगैरे मंडळी येत असत.

नंतर १९४३ साली ओळखीने कामाला लागलो. थोडे दिवस काम केले. नियमाप्रमाणे १९४८ साली मला कामावरून निवृत्त करण्यात आले. साईंची कृपा असल्यावर काही कमी पडत नाही. १९४९ साली तात्या मोरे यांनी सोसायटीत कामाला लावले.

आम्ही सर्व मंडळी रामनवमी, गुरूपौर्णिमा व विजयादशमी ह्या तिन्ही उत्सवांना शिरडीला जात असू. मनमाड पॅसेंजर या गाडीने ४ वाजता शिवाजीनगरला पोचत असू. तेथेच आम्ही सर्व एकत्र जमायचो. दौंड-मनमाड पॅसेंजर या गाडीने कोपरगावला उतरत असू. रात्री गणपतीच्या मंदिरात मुक्काम करून सकाळी सहाला नावेने नदीपलीकडे जात असू. दीक्षित वाडा हे आमचं उतरण्याचं ठिकाण होतं. अशी ही आमची जुनी शिरडी-यात्रा आठवली की मन कसे आनंदाने भरून येते.

त्यावेळच्या माझ्या शिरडीच्या मुक्कामात म्हाळसापती यांचा मुलगा व अब्दुलबाबा आणि शामा देशपांडे यांचे चि. उद्धव यांचे मला आशीर्वाद मिळाले. त्यावेळची शिरडी फार जुनी होती. द्वारकामाई, चावडी, गुरूस्थान, समाधिमंदिर, खंडोबाचे देऊळ अशी ठिकाणे दर्शनासाठी प्रसिद्ध होती व दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. ह.भ.प. दासगणू महाराज, श्री. गजानन दाभोलकर, डॉ. गव्हाणकर, रामबाबा, नारायण बाबा, मेहेर बाबा वगैरे संतांचे दर्शन झाले व आशीर्वादही मिळाला. तसेच, अखिल भारतीय साईभक्त मंडळाचे मद्रासचे नरसिंह महाराज यांचे आशीर्वाद व दर्शनाचा लाभ मिळाला. राधाकृष्ण स्वामी महाराज, श्री. तातु देशपांडे, श्री. जयकर, श्री. चौबळ, इंदूरचे श्री. नाईक, कोल्हापूरचे श्री. कापडी, वगैरे मंडळींचा आशीर्वाद मिळाला.

दासगणू महाराज यांचा आशीर्वाद व साईबाबांची कृपा यामुळे रामनवमी, गुरूपौर्णिमा व विजयादशमी या तिन्ही उत्सवांत साईबाबांची ५० वर्षे सेवा करता आली. साईबाबांच्या कृपेमुळेच सबंध महाराष्ट्रात दौरा झाला. सांस्कृतिक कार्यक्रम झाले. बाळासाहेब सरपोतदार यांनी मराठी चित्रपट क्षेत्रात शिरकाव करू दिल्याने आतापर्यंत ५० मराठी चित्रपटांत काम केले. ही साईबाबांचीच कृपा आहे. उरलेल्या आयुष्यात अशीच सेवा करून घ्यावी, हीच श्री साईचरणी प्रार्थना आहे.

डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर यांच्या कुर्ला येथील घरी साईबाबा पुण्यतिथीला २५ कार्यक्रमांपेक्षा जास्त कार्यक्रम करण्याचे भाग्य लाभले. गिरगाव येथील साईधाम मंदिरात ई.आर. मालपेकर यांच्या सहवासात २५ पेक्षा जास्त कार्यक्रम झाले. नंतर काही दिवस खंड पडला. आता पुन्हा कार्यक्रम सुरू झाले आहेत. डॉ. दाभोलकर यांच्या घरी होळी पौर्णिमेला कार्यक्रम होतात. द्वारकामाई मंदिरात राम देसाई असताना बरेच कार्यक्रम झाले. जेथे साईबाबांची मंदिरं आहेत तेथे साईबाबा आपली सेवा करून घेतात. ३१ ऑगस्ट ते १० सप्टेंबर, १९९२ या कालावधीत पुणे येथे आयोजित केलेल्या पुणे फेस्टिवल, १९९२ या उत्सवातील 'मुजरा लोककलेचा' या कार्यक्रमात मी सहभागी झाल्याबद्दल मला प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. साईबाबांच्या कृपेनेच हे सर्व चालले आहे. मला निवृत्ती नाही. साईबाबांची कृपा व दासगणू महाराजांचा आशीर्वाद यामुळेच भारूडावर थाप पडली. मी कोण काय करणार ? करता करविता तो सर्व 'साई' आहे.

# ॥ श्रीमत् संजीवनी गाथा ॥

– श्री. कृष्णा तेली
कुडाळ, सिंधुदूर्ग.

**पा**वसचे श्री स्वामी स्वरूपानंद यांच्या संजीवनी गाथेतील पदांचा मुमुक्षूजनांना एका दीपस्तंभाप्रमाणे उपयोग झाल्याशिवाय राहात नाही. त्यांनी आपल्या अभंगांत सत्कर्म, नीतिविचार, ईश्वरभक्ती, आत्मज्ञान यांचा सुंदर संगम साधला आहे. स्वामींकडे परमार्थ मार्गदर्शनार्थ लोक येत असत. ते त्यांना जीवनाचा मार्ग उच्च बोधाने संपन्न करून देत व जीवनाच्या अंतरंगाचे दर्शन घडवीत. श्री स्वामींचा निजबोध आत्मस्वरूपी राहून या जीवनात एका दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरला आहे.

''**भक्तांचे अंतरी सांवळा श्रीहरि। सुखे वास करी सर्वकाळ।**'' असे ते म्हणत. ''एका श्रीहरीशिवाय मला काहीच दिसेनासे झाले आहे'', ही अवस्था ते सर्वकाळ काया-वाचा-मनाने नित्यसुखात उपभोगत असत. त्यामुळे ''मी-तू''पण हे कृष्णार्पण होत असे. ''**निर्भय, निश्चिंत, निवांत, निरार्त। रतलेसे चित्त हरिपायी॥**'' आत्मरूपाची खूण ज्यांनी ओळखली ते स्वरुपानंद कायम स्वरूपात 'निजानंदी' राहात. म्हणून ते म्हणत - ''**शरण जाता रमावरा। सर्व सुखे आली घरा!**'' परमेश्वरापाशी शुद्ध मनाने लीन झालो तर सुखाची परिसीमा होते. त्याला या जगाची आसक्तीच राहात नाही. म्हणून भोग-भोक्ता या कल्पनाच तुटून पडतात. मनाची अवस्था कशी असावी याबाबत श्री स्वामी म्हणतात - ''**रामकृष्ण हरि गोविंद। मना लागो हाची छंद!**'' मनाचे चिंतन, कानात पडलेली वाणी, मुखातून आलेले शब्द, व दृष्टीला पडणारे दृष्य हे हरीशिवाय काहीच असणार नाही. ज्यावेळी सर्व जीवच हरिपायी जडला त्यावेळी सर्वत्रैव हरीच दिसेल ही स्वामींची हरिपायी दृढ निष्ठाच दर्शविते. स्वामींनी खोटे पांडित्य करणाऱ्यांची यथार्थ कानउघाडणी केली आहे. परमार्थाबद्दल आदर, स्वानुभव असल्याशिवाय उगाच दांभिकपणे बोलू, लिहू नये. गूळ गोड कसा असतो हे दोन तास सांगत बसण्यापेक्षा तो प्रत्यक्ष खाण्यास दिला तर तो खाणाऱ्याला समजेलच. स्वानुभवाने देव ओळखावा व मगच तो सकल लोकांना सांगावा अशीही स्वामींनी दांभिकतेवर कडवट टीका-टिप्पणी केली आहे.

संसारसुखात रममाण होताना अंतरात हरिपायी दृढश्रद्धा ठेवावी, स्वत:ला क्षुद्र लेखू नये, आत्मविश्वासाने हरिचे चिंतन करावे. त्याचवेळी तो आत्मसुख भोगू शकेल.

''**कोणी भेटो सुष्ट दुष्ट। सदा असावे संतुष्ट।**'' प्रत्यक्ष व्यवहारात अनेक व्यक्तींशी आपली भेट-गाठ होते. सुख-दु:ख, हर्ष-शोक, प्रक्षुब्ध असे मनाचे तरंग उठणारे प्रसंग घडतील, परंतु साधकाने आत्मस्वरूपी अनुसंधान ठेवावे, आपत्तीचा त्रास कधीही मानू नये, असे सांगताना ते विश्वास देतात की,

''**स्वामी म्हणे अंती हरि-नाम एक।
तारील नि:शंक तुजलागी।**''

चित्तशुद्धीचा उपाय स्वामी देताना म्हणतात -

''**चित्तशुद्धीचा उपाय।
सदा चिंतावे हरिपाय॥**''

आपल्या चित्तात सद्‌भाव उठला की परमेश्वर भेटला असे समजावे. ते कसे जमवावे, तर दुसऱ्याचे सुख पाहून सुखी होणे, दुसऱ्याच्या दु:खात दु:ख मानणे, परोपकार जमेल तेवढा करणे, मनातही दुसऱ्याबद्दल दुष्ट विचार न येणे, अंतर्यामी फक्त देवाचाच धावा करावा. 'पोटी अभिमान' जागृत न होऊ देणे हेही तितकेच महत्त्वाचे. मनाला मोक्षाचे साधन म्हणताना श्री स्वामी म्हणतात -

''**युक्ति-प्रयुक्तीने तया गोंजारून।
दाखवावी खूण स्वरूपाची॥**''

साधकाने काय करावे, हे श्री स्वामी आपल्या संजीवनी गाथेत म्हणतात - ''**साधके सर्वदा असावे सावध। भले काम-क्रोध आवरावे॥**'' शांती-सुखाची परिसीमा म्हणजेच गुरुपाऊले! श्री स्वामींनी सद्‌गुरूंना परब्रह्म म्हटले आहे. ''**गुरू तोचि देव ऐसा ठेवी भाव। सद्‌गुरू गौरव काय वानू॥**'' सद्‌गुरूला आत्महित विचारावे, विरक्ती, आत्मस्थिती, ज्ञान, हरिभक्ती, शरणागती व नामाची महती विचारावी. या सर्वांचे यथार्थ दर्शन फक्त सद्‌गुरुच घडवतील. अभक्तांच्या गोष्टी, दुर्जन-संगती, पाखंड-दर्शन टाळावे व संतसंग आचरावा, म्हणजे भक्तिप्रेमाचा उगम होईल. अशाप्रकारे श्री स्वामींचा उपदेश हृदयात ठेऊन जो सद्‌भक्त आचरणात आणेल त्याला परमेश्वरप्राप्ती होईलच!

वैराग्याची खूण सांगताना श्री स्वामींनी सांगितले की, संसाराचे ओझे न वाटून घेता संसारात राहावे. देहात न गुंतता संसार करणे यालाच वैराग्य म्हणावे. भक्तांबद्दल ते म्हणतात, जो देवापासून विभक्त नाही तो भक्त. देहाची आसक्ती न ठेवता विदेही राहणे जमले की शांतीसुख भोगणे सोपे आहे. ''माझे माझे'' म्हणू नये. त्यामुळे चित्तवृत्ती पालटेल. ''**स्वामी म्हणे शोध घेता अंतर्यामी। जिरेल ती उर्मी मीपणाची॥**'' मनाला 'अभेद-भजन'' घडावे ही मनाची अवस्था आणावी. मनाला तुझेच दर्शन घडावे, दुसरी कोणतीच वासना मनाला शिवू नये, अशी जेव्हा स्थिती होईल त्यावेळी मन स्थिरावेल. ''**जेथे जेथे माझे हिंडेल हे मन। तुझेची दर्शन तेथे होवो॥**'' स्वामींनी मनाला श्रीहरिचीच आस लागो, हे वारंवार सांगितले आहे.

श्री स्वामींची बोधप्रद वचने व अभंग श्रवणीय तर आहेतच व मननीयही आहेत. पं. भीमसेन जोशींच्या सुरेल आवाजात स्वामींच्या भजनांची कॅसेट श्री पावसक्षेत्री

(पृष्ठ क्र. ४३ वर)

# यशस्वी जीवनाचा सोपान
# त्राटक साधना

- श्री. गजानन कुलकर्णी
रत्नागिरी.

त्राटक साधना हा नेत्रतेज वाढविण्याचा एक अत्यंत प्रभावी आणि बिनधोक मार्ग आहे. त्राटकाच्या नित्य साधनेमुळे साधकाच्या नेत्रांत एक अतिदिव्य अशी अतिंद्रीय शक्ती निर्माण होते. अशा व्यक्तीने एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यास डोळा भिडवल्यास ती व्यक्ती त्यास पूर्णपणे वश होते. संमोहन शास्त्र म्हणजे मेस्मोरिझममध्ये प्रगती करण्याची ज्यांची इच्छा असेल त्या प्रत्येक साधकाने त्राटकाचा अभ्यास करणे अत्यंत जरुरीचे आहे. प्रत्येक मानवाला चराचर सृष्टीचे ज्ञान स्वतःच्या डोळ्यांमार्फतच होत असते. राग, द्वेष किंवा प्रेम हे भावही प्रथम तिथेच उत्पन्न होतात. याचाच अर्थ मनाचे गठण दृष्टीत पूर्णपणे झालेले असते. तीच दृष्टी या त्राटक साधनेमुळे बलवान बनते, बहिर्मनाला आपल्या काबूत आणून इच्छाशक्तीची अमर्याद वाढ करते; आणि आपले कोणतेही कार्य केवळ बहिर्मनाद्वारे न करता त्याला अंतर्मनाचा स्पर्श घडवून आणून पूर्णत्वास नेते. अंतर्मन हे बहिर्मनापेक्षा कितीतरी पटीने बलवान आहे. म्हणून अंतर्मनात प्रोक्षण झालेला विचार आणि इच्छाशक्तीचा असलेला जबरदस्त प्रभाव यांचा संमिश्र प्रयोग समोरच्या व्यक्तीवर होतो आणि ती व्यक्ती पूर्णपणे वश होते. म्हणूनच मनाची एकाग्रता वाढविण्याच्या क्रियेत त्राटक साधनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. केवळ योग्यांनाच नव्हे तर संसारी माणसालाही आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी त्राटक साधनेची अत्यंत आवश्यकता आहे. त्राटक साधनेने तुमची दृष्टी तुम्ही बलवान केलीत तर खचितच तुमचा प्रभाव प्रत्येक ठिकाणी पडेल आणि तुमचे कोणतेही चांगले काम सहज सुलभ रीतीने पार पडेल यात शंकाच नको. त्राटक साधनेने यशाचा खरा सोपान साधकाच्या हाती येतो. अशा ह्या त्राटक क्रिया आठ प्रकारच्या आहेत. (१) मूर्ती त्राटक, (२) ताम्रवस्त्र त्राटक, (३) बिंदू त्राटक, (४) प्रतिबिंब त्राटक, (५) ज्योती त्राटक, (६) सूर्य त्राटक, (७) तारा त्राटक, (८) अग्नि त्राटक. यापैकी आपणास उपयुक्त अशा काही त्राटक क्रियांचा तपशीलवार विचार आपण या लेखात करणार आहोत.

## मूर्ती त्राटक

या त्राटक साधनेसाठी साधकांनी आपल्या आवडत्या इष्टदेवतेची मूर्ती अगर फोटोची तसबीर निवडावी. साधनेची जागा, आपली बसण्याची जागा प्रथम निश्चित करुन घ्यावी. नंतर आपल्या आसनापासून बरोबर तीन फूटांचे अंतर राखून जमिनीपासून तीन फूट उंचीवर चौरंगावर अथवा भिंतीला ती तसबीर लावावी. साधक आणि मूर्ती यामध्येही तीन फूटांचेच अंतर असावे, जास्त नको. याचे कारण म्हणजे साधकाला मूर्तीसमोर जमिनीवर मांडी घालून ताठपणे ध्यानास बसावयाचे आहे. आपण मांडी घालून जमिनीवर ताठ बसलो की कमरेपासून वरचा भाग साधारण तीन फूटांचा होतो. म्हणजे आपली दृष्टी आणि समोरची मूर्ती ही सरळ एकाच रेषेत यावीत हा त्यामागचा उद्देश आहे. आपल्याला ही त्राटक क्रिया स्थिर डोळ्यांनी, ऱ्हस्व दृष्टीने करावयाची आहे. जर समोरचे चित्र तीन फूटांपेक्षा जास्त अंतरावर असेल तर आपल्या ऱ्हस्व दृष्टीवर ताण पडतो आणि साधना नीट होत नाही. म्हणून अंतर तीन फूटच ठेवावे, जास्त असता कामा नये.

आता तसबीर लावून झाल्यावर अथवा योग्य आसनपीठावर मूर्ती ठेवून झाल्यावर साधकाने समोरच्या आसनावर बसावे आणि एकाग्र चित्ताने सतत २० ते २५ सेकंद त्या मूर्तीकडे टक लावून पहात बसावे. लगेच डोळे मिटून घ्यावेत; आणि उघड्या डोळ्यांनी पाहिलेली मूर्ती मिटल्या डोळ्यांसमोर आणण्याचा प्रयत्न करावा. प्रथम प्रथम क्षण-दोन क्षण ते चित्र डोळ्यांसमोर दिसेल आणि लगेच नाहीसे होईल. असे झाले की लगेच पुन्हा डोळे उघडावेत आणि पुन्हा पहिल्यासारखी साधना सुरू करावी.

दररोज किमान २५ ते ३० वेळा तरी अशाप्रकारे साधना करावी. आपल्याला मनाची एकाग्रता साधण्यासाठी ही साधना करावयाची आहे; म्हणून साधनेची जागा चांगली स्वच्छ आणि निवांत असावी. खोलीतील वातावरण सुगंधी असावे. सुगंधामध्ये नैसर्गिक संमोहन शक्ती आहे. त्यामुळे मनाची एकाग्रता साधण्यास फार मदत होते. म्हणून साधनेला सुरूवात करण्यापूर्वी मंद सुवासाची एकतरी उदबत्ती खोलीत लावून ठेवावी. खोलीच्या भिंतींना निळा रंग असेल तर अतिउत्तम, कारण निळा रंग आकाशतत्वाचा द्योतक आहे. परंतु निळा रंग नसेल तरी अडण्याचे कारण नाही, मात्र पिवळा रंग असता कामा नये. पिवळा रंग पित्तकारक असल्यामुळे साधकाला पित्ताचा त्रास होतो. एकाग्रता साधण्याऐवजी डोळेदुखीचा त्रास उद्‌भवतो. म्हणून एक लक्षात ठेवा, शक्यतो घराला आतून तरी पिवळा रंग लावू नका.

दररोज वरीलप्रमाणे साधना करीत गेल्यास वीस-पंचवीस दिवसांनंतर या अभ्यासाचा परिणाम दिसू लागतो. डोळे मिटल्यानंतर एक मिनिटभर मूर्ती डोळ्यांसमोर तशीच स्थिर राहू लागते.

असा अनुभव येऊ लागला म्हणजे आपली साधना योग्य दिशेने सुरु असून तिला यश येऊ लागले आहे असे समजायला हरकत नाही. या साधनेमुळे 'मन:चक्षू' (The third eye) जागृत होण्यास मदत होते. ही साधना सतत चालू ठेवायला बिलकुल हरकत नाही. आपल्या इष्टदेवतेच्या ध्यानात आपण त्यामुळे अधिक काळ रमू लागतो. आपलं दैवत आपल्यावर प्रसन्न होतं आणि ही साधना वर्षानुवर्षे अशीच सुरू ठेवली, तर ते दैवत काही काळानंतर साधकाशी हितगुजही करू लागतं. ध्यानाची ही उच्च अवस्था आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात ज्या मानसपूजेचे वर्णन केले आहे ती या त्राटक साधनेमुळे साध्य होऊ शकते.

ही साधना पहाटेच्या रम्य वेळीच शक्यतो करावी. कारण रात्रभराच्या पूर्ण विश्रांतीनंतर मन चांगले ताजेतवाने झालेले असते. वातावरणही आल्हाददायक आणि उत्साही असते. अशावेळी केलेली साधना चटकन फलद्रूप होते. आपल्या हिंदुधर्मसंस्कृतीमध्ये मूर्तीपूजेला फार महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले आहे, त्याचे कारण वरील साधनेच्या स्पष्टीकरणाने लक्षात यावे. या साधनेत ध्यान-धारणेचे महत्त्व विशद आहे. हिंदुधर्म तर योगसूत्राने प्रतिष्ठित झालेला आहे; त्या योगाची प्रथमावस्था म्हणजे ही त्राटक साधना आहे. द्रष्ट्यासमोर दृष्य असणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. अवखळ मनाला आवर घालीत सगुण साकाराकडून निराकार निर्गुणाकडे नेणारी ही त्राटक साधना आहे. योगाचा अभ्यास करणाऱ्या साधकांनी आपआपल्यापरीने विचार करावा. संसारी साधकाने आपल्या फायद्यापुरतेच पहावे. आता आपण दुसऱ्या त्राटक साधनेकडे वळू या !

## बिंदू त्राटक

अनेक ग्रंथांतून उल्लेख आलेला असा हा त्राटक प्रकार आहे. परंतु बऱ्याच ठिकाणी या त्राटक साधनेची माहिती सविस्तर प्रमाणात दिली गेली नसल्यामुळे नवीन साधकाला ही साधना कळणे फार कठीण जाते. काही ठिकाणी ह्या क्रिया क्लिष्ट भाषेत दिल्या गेल्यामुळेही घोटाळा होतो आणि त्यामुळे साधकाला साधना करूनही फलश्रुतीचा अनुभव येत नाही. हे त्राटक खालीलप्रमाणे तीन टप्प्यांत करावयाचे आहे.

या साधनेसाठी मंद प्रकाशाची, निरव शांतता असलेली खोली असणे जास्त सोईस्कर असते. या साधनेसाठी आठ ते दहा इंच लांबी-रुंदीचा स्वच्छ, पांढरा, जाड ड्रॉईंग पेपर घेऊन त्याचा बरोबर मध्यबिंदू काढावा. आता या मध्यबिंदूवर कंपास ठेवून बरोबर दोन इंच व्यासाचे वर्तुळ काढावे आणि ते नंतर काळ्या रंगाने रंगवून काढावे. नंतर तो कागद एका जाड पुठ्ठ्यावर चिकटवून किंवा ड्रॉईंग पिनांच्या साहाय्याने ड्रॉईंग बोर्डला घट्ट करून भिंतीला टेकून ठेवावा. अर्थात हे करीत असता जमिनीपासून वर्तुळाची उंची तीन फूटापेक्षा जास्त होणार नाही याकडे लक्ष देणे जरूरीचे आहे. तसेच साधकाची बसण्याची बैठक म्हणजे आसन आणि समोरचे दृष्य यातही तीन फूटाचेच अंतर राखावे, कमी-जास्त होऊ देऊ नये. आता साधनेला बसण्यापूर्वी खोलीतील वातावरण प्रसन्न कसे ठेवता येईल याकडे लक्ष द्या. त्यासाठी मंद सुवासाची उदबत्ती, फुले अथवा मंद वासाच्या सेंटचा उपयोग करा.

खोलीत प्रखर उजेड असता कामा नये. तसेच बाहेरून खोलीत उजेड येणार नाही याची दक्षता घ्या. केवळ समोरचे दृष्य (काळे वर्तुळ) दिसण्याइतकाच मंद प्रकाश असावा. इतके झाल्यावर साधकाने शांतचित्ताने आपल्या आसनावर बसून समोरच्या काळ्या ठिपक्यावर मन एकाग्र करावे. आपण साधनेत असे मग्न झालात की थोड्याच वेळात तुमचे डोळे जड होऊ लागतील किंवा डोळ्यांतून पाणी येऊ लागेल. त्यावेळी क्षणभर डोळे मिटून घ्या. एकदा-दोनदा डोळ्यांची उघडझाप करा; आणि पुन्हा त्या काळ्या वर्तुळावर दृष्टी स्थिर करा. चार-पाच दिवसांत दररोज पंधरा ते वीस मिनिटांच्या या अभ्यासानंतर तुम्हास एक चमत्कार जाणवायला लागेल. त्या काळ्या वर्तुळातून एक प्रकाशमय वर्तुळ बाहेर पडतंय असे तुम्हास दिसू लागेल. हे वर्तुळ मूळच्या काळ्या वर्तुळास पूर्ण झाकून टाकीत आहे आणि त्या जागी स्वत: स्थित होत आहे असाही तुम्हास अनुभव येईल. आता तुमचे लक्ष त्या प्रकाशमय वर्तुळावरच केंद्रित होणे जरुरीचे आहे. काळ्या वर्तुळाच्या जागी प्रकाशमय वर्तुळ दिसू लागणे म्हणजेच बहिर्मनाचे व्यापार लुप्त होऊन साधनेद्वारा आपण अंतर्मनाशी संपर्क साधण्यात यशस्वी झालोय असं समजायला मुळीच हरकत नाही. मात्र ही स्थिती काही क्षणच टिकते आणि पुन्हा ते काळे वर्तुळ दिसू लागते. याचे कारण म्हणजे क्षणभर गप्प बसलेले बहिर्मन पुन्हा जागृत होते आणि आपले प्रताप दाखवू लागते, एकाग्रता भंग करून टाकते, हेच आहे. तरीही साधकाने विचलित होण्याचे कारण नाही. पुन्हा पहिल्यापासून तशीच सुरुवात करावी. दररोज पंधरा ते वीस मिनिटे याप्रमाणे ही साधना सतत एक महिना केली पाहिजे; आणि ती नियमितपणे आणि ठराविक वेळीच केली पाहिजे, हे लक्षात ठेवा. नियमित साधना केलीत तरच अनुभव येतील, प्रगती साधता येईल, अन्यथा नाही, हे लक्षात ठेवा.

आता आपण या साधनेच्या दुसऱ्या टप्प्याकडे वळू या. हा दुसरा टप्पा म्हणजे पहिल्या टप्प्यातली तुमची प्रगती गृहीत धरून केलेली सुधारित आवृत्ती आहे. इथे साहित्य, आसन, मांडणी, वातावरण निर्मिती, आणि उजेड ह्या सर्व बाबी पहिल्या साधनेप्रमाणेच आहेत, फक्त आकृतीमध्ये बदल आहे. मागल्याप्रमाणेच दहा-बारा-आठ इंचाचा जाड ड्रॉईंग पेपर घ्या. त्याचा मध्यबिंदू शोधून त्यावर बरोबर चार इंच व्यासाचे एक पुसट वर्तुळ काढा. आता त्याच मध्यबिंदूवरून या मोठ्या वर्तुळाच्या आत एक इंच व्यासाचे आणखी एक छोटे वर्तुळ काढा आणि ते गडद काळ्या रंगाने रंगवून टाका. आता मध्यभागी असलेले गडद काळे वर्तुळ आणि त्याच्याबाहेर पुसट असणारे मोठे वर्तुळ अशी तुमची आकृती

तयार झाली. आता आपल्याला या छोट्या वर्तुळाच्या बाहेरच्या कडेपासून मोठ्या वर्तुळाच्या आतल्या कडेपर्यंत टेकतील अशा समांतर अंतरावर बरोबर १८ रेषा काढायच्यात. ह्या रेषा मोठ्या वर्तुळाच्या बाहेर मात्र जाता कामा नयेत. ह्या सर्व समांतर रेषांमध्ये एकमेकींत बरोबर २० अंशाचा कोन होईल हे लक्षात ठेवा. ह्या रेषा म्हणजे मधे असलेल्या गोलाची तेजोकिरणेच आहेत. अशाप्रकारे दुसऱ्या टप्प्यातले आपले दृष्य तयार झाले. आता पूर्वीसारखीच तयारी करून साधनेला सुरुवात करा. काही वेळाने तुम्हास असा अनुभव येईल की ते वर्तुळ आणि त्याच्या सभोवतालच्या त्या रेषा प्रकाशमय होत आहेत. परंतु ह्या सर्वच रेषा प्रकाशमय होत नाहीत, तर त्यातल्या काही रेषा पूर्ववत काळ्याच आहेत. पुन्हा थोड्या वेळाने ह्या काळ्या दिसणाऱ्या रेषा प्रकाशमान होतील, तर पूर्वीच्या प्रकाशमय दिसणाऱ्या रेषा पुन्हा काळ्या दिसू लागतील. हा लपंडाव थोडा वेळ आलटून-पालटून घडत राहील. मन एकाग्र होत चालल्याचे ते चिन्ह आहे असं समजायला हरकत नाही. अशाप्रकारच्या काही दिवसांच्या साधनेनंतर हे लपंडाव खेळणारे दृष्यही डोळ्यापुढून नाहीसे होऊन जाईल आणि एक शून्यरूप निर्विकल्प अवस्था प्राप्त होईल. हिलाच तूर्यावस्थेची पहिली पायरी म्हणून योगशास्त्रात संबोधण्यात आले आहे.

आता आपण जाणून घेतलेली दुसऱ्या टप्प्यातली साधना दररोज १५ ते २० मिनिटेच करावी. तसेच एक महिन्यापेक्षा जास्त काळ संसारी माणसाने ही साधना करू नये. कारण ही साधना अशी आहे की एकदा का मनाला या साधनेची गोडी लागली म्हणजे एखाद्या व्यसनी माणसासारखी साधकाची स्थिती होऊन जाते आणि सतत या साधनेच्यामागे साधक लागतो. त्याची वृत्ती निरिच्छ बनत जाते आणि अंगी वैराग्य येऊ लागते. आपल्याला फक्त आपली इच्छाशक्ती प्रबळ करायची आहे आणि तेवढ्यापुरताच या साधनेचा उपयोग करून घ्यायचा आहे. आणि म्हणूनच संसारी माणसाने एक महिन्यापेक्षा अधिक काळ ही साधना करू नये, असे बंधन मी घातले आहे. पुढची जबाबदारी तुमची.

ही साधना करणाऱ्या साधकाने प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात ठेवायची आहे, ती म्हणजे साधना संपल्यानंतर डोळ्यांवर थंडगार पाण्याचे हबके मारावे. घरात फ्रिज असेल तर फ्रिजमधले गार पाणी वापरावे. साधना-काळात दृष्टी एकाग्र झाल्यामुळे डोळ्यांत एकप्रकारचे तेजाचे वलय निर्माण झालेले असते. त्यामुळे डोळ्यांवर लाली चढते किंवा डोळ्यांची आग होते. म्हणून ते लगेच शांत करणे फार जरुरीचे असते.

साधनेच्या ह्या दोन टप्प्यांत, वर वर्णन केल्याप्रमाणे तुम्ही प्रगती साधलीत की यशाचा अर्धा-अधिक बुरुज सर केलात म्हणून समजा. आता आपल्याला तिसऱ्या टप्प्यातल्या साधनेकडे वळायचे आहे. या तिसऱ्या टप्प्यातील साधनेसाठी साहित्य तेच आहे. आकृती सोडली तर अन्य कशातही बदल नाही. आता फक्त कागदाच्या मध्यभागी काढावयाचे वर्तुळ काळ्या वाटाण्याच्या आकाराइतकेच काढावयाचे आहे. ते काळ्या गडद रंगाने कागदाच्या मध्यभागी रंगवून घेऊन तो कागद साधनेसाठी वापरावयाचा आहे. आता आपल्या आसनावर बसून या बारीक काळ्या ठिपक्यावर मन एकाग्र करा. काही क्षणातच तो ठिपका तुमच्या दृष्टीसमोरून नाहीसा होईल आणि पांढरा स्वच्छ कागदच तेवढा दिसेल. या अवस्थेत जास्तीत जास्त वेळ राहण्याचा प्रयत्न करा. काही वेळाने पुन्हा तो काळा ठिपका तुम्हाला दिसू लागेल. असे झाले की पुन्हा मन एकाग्र करा आणि तो काळा ठिपका समोरून घालविण्याचा प्रयत्न करा. याप्रमाणे ही साधनाही दररोज जास्तीत जास्त पंधरा ते वीस मिनिटे याप्रमाणे एक महिनाच करावी आणि नंतर बंद करावी.

या साधनेच्या समाप्तीनंतर तुमच्या मानसिक स्थितीत आमूलाग्र बदल झालेला तुम्हाला निश्चितच जाणवेल. एका नव्या आत्मविश्वासाची जाणीव तुम्हाला झाल्याशिवाय राहणार नाही. या साधनेत आपण तीन टप्प्याने फरक केलेला आहे. पहिल्या टप्प्यात आपले 'ऑब्जेक्ट' मोठे होते, दुसऱ्या टप्प्यात ते निम्मे झाले, तर तिसऱ्या टप्प्यात आपण ते फारच सूक्ष्म केले. याचे कारण तुमच्या लक्षात आले असेलच, ते म्हणजे प्रतीक जितके सूक्ष्म तितके मन जास्त प्रमाणात एकाग्र होण्यास मदत होते. परंतु प्रथम मनाला या कशाचीच जाणीव नसल्याने एकदम तिसऱ्या अवस्थेतील प्रतीक घेऊन साधना करणे योग्य झाले नसते; म्हणून मनाला सवय होण्याच्या दृष्टीने आपण आधी प्रतीक मोठे घेऊन हळूहळू त्यात फरक करीत गेलो; त्यामुळे आपली साधना सोपी झाली आणि सिद्धीही साधता आली. या साधनेच्या अभ्यासामुळे साधकाला विचारसंक्रमण शक्ती (Thought transferance) प्राप्त होते.

'त्राटक साधना' ह्या सिद्धयोग्यांनी, महान तपस्व्यांनी मान्य केलेल्या योगमार्गातल्या उत्कृष्ट साधना आहेत. त्यामुळे या साधनेने कोणताही तोटा होण्याचा धोका अजिबात नाही. नाथपंथाचे महान प्रवर्तक योगसम्राट गोरक्षनाथ यांनी त्यांच्या 'अमनस्क योग' या ग्रंथात पूर्वार्धात या त्राटक योगाचं रहस्य फार विस्तृत प्रमाणात विस्तारून सांगितलं आहे. उत्तरार्ध मात्र पूर्ण अमनस्क योगासाठीच आहे. अमनस्क योग म्हणजे मनानेच मनाला गिळून टाकण्याची क्रिया. त्यासाठी पूर्वाभ्यासात योग्याने त्राटक योग आचरलाच पाहिजे, असे त्यांचे प्रतिपादन आहे. ज्याप्रमाणे जगात व्यवहारी ज्ञानप्राप्तीच्या तीन पायऱ्या आहेत, म्हणजे प्राथमिक शिक्षण, मग माध्यमिक शिक्षण आणि त्यानंतरच महाविद्यालयीन-उच्चमहाविद्यालयीन शिक्षण घेता येते, एकदम महाविद्यालयात जाऊन बसता येत नाही किंवा जाऊन बसले तरी त्याला काहीही कळणार नाही, त्याप्रमाणेच योगमार्गातल्या ह्या पायऱ्या आहेत.

या साधनेनंतर मनाचे बल खूपच वाढते आणि मनी धरलेली चांगली इच्छा मनाच्या या प्रबलतेमुळे चट्‌कन सफलही होते. परंतु कालांतराने जर यात न्यूनता दिसू लागली, म्हणजे बॅटरी डिस्चार्ज झाली, तर पुन्हा ती वरील साधनेद्वारे रिचार्ज करा आणि गेलेली ताकद परत मिळवा, झालं ! आता यानंतर आणखी दोन महत्त्वाच्या आणि उपयुक्त त्राटक साधनांची आपल्याला माहिती करून देऊन हा लेख संपवू या.

## ज्योती त्राटक

या साधनेसाठीही स्वतंत्र खोलीची आणि एकांताची गरज आहे. रात्रीच्या शांत वेळी खोलीचा दरवाजा, खिडकी लावून घ्यावी. आपले आसन भिंतीला टेकून घालावे, म्हणजे साधनेला बसताना पाठ टेकून बसता येईल. आसनापासून तीन फूट अंतरावर एक चौरंग ठेवावा आणि त्यावर मधोमध एक मेणबत्ती लावून ठेवावी; आणि त्या मेणबत्तीच्या ज्योतीकडे एकटक एकाग्र मनाने पहात बसावे. काही वेळातच ती ज्योती अधिक प्रकाशमान होत आहे, तिचं तेज वाढत आहे असे तुम्हाला जाणवेल. काही दिवसांच्या या त्राटकाच्या सततच्या अभ्यासानंतर या ज्योतीमध्ये साधकाला काही व्यक्तींचे चेहरे अगर संपूर्ण व्यक्ती दिसू लागते. ही साधना दररोज १५ ते २० मिनिटांपर्यंत ३ महिने करावी. अगदी सामान्य अवस्थेतील साधकालासुद्धा ह्या तीन महिन्यांच्या काळात दिव्य अनुभव येऊ लागतात. डोळ्यांत अग्निसारखे प्रखर तेज निर्माण होते. या साधनेच्या साधकाने एखादा दृढसंकल्प करून आपली नजर त्या दृष्टीने दृष्यावर रोखून धरली तर ती तात्काळ फलद्रूप झाल्याचा अनुभव येतो. या साधनेमुळे दृष्टीतेज जबरदस्त वाढत असल्यामुळे दुसऱ्यावर दरारा बसविण्याची ताकद साधकाच्या अंगी निर्माण होते. शत्रूही क्षणात हलबल होऊन शरण येतो, मित्र बनतो. संसारी लोकांनी आपल्या जीवनातील अडथळे दूर करण्यासाठी या साधनेचा जरूर उपयोग करावा, मात्र वाईट हेतू धरून ही साधना कधीही करू नये. त्याचे परिणाम वाईटच होतात, हे लक्षात ठेवावे. जीवनात आनंद निर्माण करण्यासाठीच या साधनेचा प्रयोग करावा.

ही साधना करण्यासाठी लागणाऱ्या निवांत जागेची अडचण हा एक आजच्या घडीचा मोठा यक्ष प्रश्न आहे. मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांमधून, विशेषत: मुंबईत एका खोलीत ६-७ माणसे किंवा त्याहूनही जास्त माणसे कोंबलेली दिसतात, अशा ठिकाणी साधनेसाठी स्वतंत्र खोली कशी मिळणार ? अशा वेळी पर्याय म्हणून साधकाने त्याच खोलीत असलेल्या एखाद्या देवतेच्या तसबिरीपुढे रात्रीच्या निवांत वेळी एक मेणबत्ती लावून ठेवावी; आणि त्या मेणबत्तीच्या ज्योतीवर अंथरूणावर बसल्या जागेवरूनच त्राटक करावे. मात्र असे करताना दृष्य आणि द्रष्टा, म्हणजे मेणबत्ती व साधक, यांमधील अंतर तीन फूटांपेक्षा जास्त राहणार नाही, तसेच मेणबत्तीची ज्योत आणि आपले डोळे समपातळीत राहतील याची दक्षता घ्यावी. खोलीची दारे-खिडक्या रात्रीच्या वेळी अर्थातच बंद असणार, त्यामुळे बाहेरून उजेड अथवा वारा येणार नाही. मात्र साधना-काळात तुम्हाला खोलीत पंखाही सुरू ठेवता येणार नाही, कारण पंख्याच्या हवेमुळे ज्योती फडफडू लागेल, स्थिर राहणार नाही आणि मग मनाची एकाग्रता साधण्याची जी मुख्य क्रिया आपल्याला साधायची आहे ती आपल्याला साधता येणार नाही. म्हणून समोरचे 'ऑब्जेक्ट' स्थिरच असले पाहिजे, हे कृपया लक्षात ठेवा. इथे मेणबत्तीऐवजी मधोमध एकच उभी वात लावता येईल असे निरांजन हल्ली बाजारात मिळते त्याचा उपयोग साधकांनी केल्यास अतिउत्तम. मेणबत्तीपेक्षाही निरांजनाची ज्योत प्रभावी ठरते. तसेच प्रसंगी मेणबत्ती एखादवेळी तिरकी जळत जाऊन ज्योत तिरकी झाल्यासारखी वाटते; ती भीतीही येथे उरत नाही.

## प्रतिबिंब त्राटक

या त्राटकाला त्राटक साधनेत अतिशय वरच्या दर्जाचे महत्त्व देण्यात आलेले आहे. इथे दृष्य म्हणून आपले स्वत:चेच प्रतिबिंब आपण उपयोगात आणणार आहोत. आरशात दिसणाऱ्या आपल्या प्रतिबिंबातील डोळ्यांवर आपण आपलीच दृष्टी एकवटायची आहे. म्हणजेच मनाची एकाग्रता साधून एकवटलेली दृष्टी आपण आपल्याच छायेवर सोडून परत दुप्पट ताकदीने ती जमा करावयाची आहे, हे कृपया लक्षात घ्या.

या साधनेसाठीही नेहमीप्रमाणे अर्थातच एकांताची आवश्यकता आहे. रात्रीची वेळ या साधनेसाठी उत्तम. कारण त्यावेळी सर्वत्र शांतता असते.

एक आठ-बाय-सहाचा किंवा फारतर दहा-बाय-आठचा उत्तम बेल्जियम आरसा साधनेसाठी आवश्यक आहे. एखाद्या रिकाम्या खोलीत चौरंगावर अथवा भिंतीला टांगून आपल्या नजरेच्या समपातळीत राहील असा हा आरसा ठेवावा. आरशासमोर आपण ताठ मांडी घालून बसल्यानंतर आपल्या चेहऱ्याचे प्रतिबिंब त्यात पूर्णपणे उमटले पाहिजे, हे लक्षात घ्या. खोलीत इतर कोणतेही चित्र अथवा तसबीर असू नये. आरशात फक्त आपलेच प्रतिबिंब दिसले पाहिजे. आरशात प्रतिबिंब दिसण्यासाठी जरुरीपुरताच मंद प्रकाश खोलीत ठेवा. अशाप्रकारे सर्व तयारी पूर्ण झाल्यावर आरसा आणि तुम्ही यामध्ये तीन फूटाचे अंतर राखून साधनेसाठी बसा. आरशात पडलेल्या आपल्या प्रतिबिंबातील डोळ्यांवर आपले डोळे रोखून धरा. काही वेळाने डोळ्यांवर ताण जाणवू लागेल. त्यावेळी डोळ्यांची क्षणभर उघडझाप करा आणि पुन्हा दृष्टी स्थिर करा. दोन-तीन दिवसांच्या अभ्यासानंतर तुमच्या लक्षात येईल की हळूहळू समोरचे प्रतिबिंब अस्पष्ट होत होत नष्ट होते. आणि केवळ आरसाच समोर दिसू लागतो. आरशात दृष्टी रोखून धरूनसुद्धा आपले प्रतिबिंब आपणास आरशात दिसत नाही. अशी स्थिती प्राप्त झाली म्हणजे या अवस्थेत जास्तीत जास्त काळ राहण्याचा प्रयत्न करा. श्वासोच्छ्वास जितका मंद आणि कमी प्रमाणात होईल

तितक्या जास्त प्रमाणात ही अवस्था साधण्यास तुम्हाला मदत होईल.

ही स्थिती मात्र प्राथमिक स्वरूपात कायम टिकत नाही. पुन्हा काही क्षणातच तुमचे प्रतिबिंब तुम्हाला आरशात दिसू लागेल. असे झाले तरी निराश होऊ नका, पुन्हा चिकाटीने मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करा. म्हणजे पुन्हा तुम्हास ती स्थिती प्राप्त होईल. एकदा जरी ही स्थिती प्रत्ययास आली तरी खुशाल समजा की आपली साधना योग्य दिशेने सुरू असून यश आपल्या टप्प्यात आहे. मन निश्चितच एकाग्र होत आहे. कारण मनाची एकाग्रता झाल्याशिवाय ही स्थिती प्राप्त होणे शक्यच नाही. मनाची होत असलेली एकाग्रता ओळखण्याचा तो एक निकष आहे. पुन्हा प्रतिबिंब दिसू लागल्यावर आता हे असं का झालं ? पुन्हा प्रतिबिंब कसे दिसू लागले ? आपली सर्व साधना फुकट गेली की काय ? असे प्रश्नही साधकाच्या मनात निर्माण होणे शक्य आहे. मात्र तसं काहीही झालेलं नसतं, हे लक्षात घ्या. फक्त आपलं जागृत मन (बहिर्मन), जे क्षणभर आपण या साधनेत गुंतवून टाकलेलं असतं, ते जागं होतं आणि चाळवाचाळव करू लागतं. म्हणून पुन्हा प्रतिबिंब दिसू लागतं. एखाद्या शांत, निश्चल तलावात कुणीतरी हळूच एखादा खडा मारल्यावर जसे पाण्यावर तरंग उठतात आणि त्या पाण्याचे निश्चलत्व भंग पावते, तद्वत् मनाने हालचाल केल्याने एकाग्रता भंग पावते, जोडलेल्या अनुसंधानाचा लय तुटून जातो आणि साधक पुन्हा पूर्वस्थितीवर येतो. याप्रमाणे सतत एक महिना रोज नियमितपणे साधना करीत गेल्यास साधकाला आरशात आपल्या प्रतिबिंबाऐवजी निरनिराळी दृष्ये दिसू लागतात. ही दृष्ये पिंगट अंगकांतीच्या रंगाची असतात. ही दृष्ये दिसणे म्हणजे अंतर्मनात असलेले विचार, देखावे बाहेर येणे असे समजावे. याचाच अर्थ आपलं अंतर्मन आता जागं झालं आहे, हे निश्चित. या साधनेद्वारे आपणास मुख्यत: अंतर्मनाला जागं करण्याचं काम करायचं होतं. कारण या अंतर्मनाची शक्ती फार अफाट आहे. आपल्याला त्याच शक्तीची आवश्यकता आहे. काही दिवसांनंतर ही दृष्यंही दिसेनाशी होतात आणि साधकाला साधना-काळात एका आगळ्याच तृप्तीचा अनुभव येऊ लागतो. संसारात राहून संसारातील ऐहिक सुख मिळावे या हेतूने साधना करणाऱ्या साधकाने इथेच थांबणे इष्ट. कारण यापुढील अवस्था योगी लोकांसाठी आहेत. आपण त्या वाटेला जावू नये. गंमत म्हणून ही साधना सतत करीत राहिलात तर संसारात अरूची निर्माण होईल, हे लक्षात ठेवा.

ही साधना दररोज २० मिनिटे याप्रमाणे सतत जास्तीत जास्त सहा महिनेपर्यंत करावी आणि नंतर बंद करावी. दररोज साधना संपल्यानंतर आरसा स्वच्छ पुसून निळ्या रेशमी वस्त्रात गुंडाळून चांगल्या ठिकाणी ठेवून द्यावा. आरशाला कसलाही डाग पडणार नाही याची सतत दक्षता घ्यावी. आवश्यकतेनुसार पुन्हा ही साधना उपयोगात आणायला हरकत नाही.

या साधनेमुळे दुसऱ्याला मोहित करण्याची जबरदस्त शक्ती डोळ्यांत जमा होते. दैवी तेज नेत्रांना प्राप्त होऊन सर्वजण पशु, पक्षी आपल्याला वश होऊन जातात. कुणाही व्यक्तीच्या नजरेला नजर भिडवून त्याला एखादं काम सांगितलंत तर तो ते बिनबोभाट करून टाकतो. तुमची आज्ञा सहसा कुणी मोडत नाही. सरकारी नोकरी पेशातले लोक, कंत्राटदार, फिरस्ते व्यापारी इत्यादी लोकांना ही साधना जबरदस्त उपयोगी पडणारी आहे. या साधनेने प्राप्त झालेल्या शक्तीने आपण घवघवीत यश प्राप्त करून घेऊ शकतो. ही साधना करणाऱ्या साधकाच्या मनाविरुद्ध सहसा कुणी जात नाही. थोडक्यात म्हणजे अपयशरूपी संकटाचे अडथळे आपोआप दूर होऊन या साधनेद्वारा तो यशाचा मानकरी ठरू शकतो.

या त्राटकाव्यतिरिक्त तारा त्राटक, सूर्य त्राटक, अग्नि त्राटक असे त्राटकाचे आणखीही बरेच प्रकार आणि साधना आहेत. अग्नि त्राटक फक्त योगी लोकांच्याच उपयोगाचे आहे. कारण या साधनामार्गाने जाणारा साधक पूर्ण वैराग्य अंगी असलेला ब्रह्मचारी संन्यासी असला पाहिजे. विषयवासनेचा जराही संबंध इथे उपयोगाचा नाही. म्हणूनच आपल्याला त्याबाबत विचार करण्याची जरूरी नाही. वरीलप्रमाणे साधना योग्यप्रकारे करा आणि सुखी व्हा. एक मात्र लक्षात ठेवा, साधना करीत असताना मनात कोणताही जप, नामस्मरण करू नका. मन शांत ठेवा, त्याला निर्विकल्प अवस्थेत नेण्याचा प्रयत्न करा. यश अवश्य प्राप्त होईल.

---

(पृष्ठ क्र. ३५ वरून)

अवधान हेच जीवनसत्याला दृष्टिगोचर करील. जीवनातील गोंधळ, विसंगती यांची समज आली की आपोआप जीवन प्रकाशित होते. प्रचंड, उत्तुंग गिरिशिखरे, विशाल आकाश व गंगेचे विस्तीर्ण पात्र बघता बघता मन नि:स्तब्ध, शांत होते. मेंदू किंवा जाणीव सहजपणे आपल्या अत्युच्च संवेदनबिंदूपर्यंत जाणे म्हणजेच खरे ध्यान. मेंदूत भूतकाळाच्या स्मृती संचित झालेल्या असल्याने रात्रौ त्यांची प्रतवारी करण्यात जाणीव गुंतलेली असते. भूतकाळ व भविष्याचे धागे तोडल्याशिवाय अक्षय, मंगल, शाश्वत, अमर जीवन उदीत होणार नाही. यासाठी ध्याता व ध्यान या दोन्ही गोष्टी एकरूप व्हाव्या लागतील.

---

(पृष्ठ क्र. ३८ वरून)

मिळते. गोड भजनांमुळे अभंग अंतर्मनात ठसतो. अभंग हे मार्गदर्शनाचे प्रभावी माध्यम आहे. म्हणून स्वामींनी अभंगरूपाने संजीवनी गाथेत सद्भक्तांना निरंतर उपदेश केला आहे. संसारात कसे वागावे, चित्तवृत्ती कशा ठेवाव्यात, हरिभक्ती कशी वाढवावी, साधनेत शत्रू कोण, त्यांना कसे आवरावे, साधनेत काय करावे व काय करू नये याचे यथार्थ मार्गदर्शन स्वामींनी संजीवनी गाथेत केले आहे. म्हणून स्वामींचा एकतरी अभंग रोज म्हणावा किंवा वाचावा व त्यावर विवेचन करावे. सुरेल आवाजात गाणाऱ्यांना त्या अभंगाची आणखीच गोडी वाटेल, हे निश्चित.

---

# अकरा हनुमान

– पंडित ग. रा. सावंत

## अनासक्ति योग

हे हनुमंता ! या जडमनाचा जड विषयाशीं जो प्रेमसंयोग, त्यासच आसक्ति म्हणतात. तेंच या दुःखमय संसाराचें स्वरूप आहे. या जडमनाचा तुज जीवचेतनांशीं जो प्रेमसंयोग तीच माझी साधना आहे आणि तुज जीव-चैतन्याचा शिव-चैतन्याशीं जो प्रेमसंयोग तेंच आनंदरूप साध्य आहे. यास्तव तुझ्या साह्यानें या विषयासक्त मनास जिंकणें हेंच सुखाचें साधन होय. कबीरसाहेब म्हणतात : ''कहे कबीरा वो ही नर सुखीया ! जो यह मन को जीता है ॥''

हे मारुते ! तूं एक वैराग्यमूर्ति आहेस. एका त्यागानें मात्र अमृतत्वाची प्राप्ति होते असें शास्त्रांत सांगितलें आहे. नामरूपात्मक साऱ्या अशाश्वताचा मनानें निःशेष त्याग केल्यावर जें उरेल तें शाश्वतच असेल, हें उघड आहे. दृश्य सारें अदृश्य होईल, राहिल वस्तु सार । असें संतकवि म्हणतात. आत्माराम या सारभूत ग्रंथांत रामदासांनी हेंच तत्त्व शिष्याच्या मनावर बिंबवलें आहे.

निष्काम कर्मयोग हेंहि याच वैराग्यवृत्तीच्या पोटांतील एक तत्त्व आहे. पशूपासून देवतांपर्यंत, वृक्षपाषाणांपासून रत्नांपर्यंत तुझा योग होता. तो अपरिहार्यच होता. त्यांत अनासक्ति हेंच तुझें वैशिष्ट्य होय. हे विरक्त पुरुषा ! तुझ्या ठिकाणीं त्याग आणि निष्कामता हीं फारच ठळक रीतीनें दिसून येतात. तुझें ऐश्वर्य म्हणजे तुझी अमोघ पराक्रमी गदा. तोच तुझा अलंकार. पण या गदेच्या जोरावर तूं दुसऱ्या कोणत्याहि ऐश्वर्याची इच्छा केली नाहींस. समस्त आसुरी संपदेवरच ही तुझी गदा होती ! तूं कपीन्द्र होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली नाहींस. नम्र रामसेवक होऊन राहण्यांतच संतोष मानलास ! पण तुझ्या रामनिष्ठेमुळें तृष्णात्याग किंवा तृष्णात्यागामुळें रामनिष्ठा हें आम्हीं कसें ठरवावें ! आम्हां विषयी जीवांना तुजसारखा दिव्य विषय साक्षात्कृत होण्यापूर्वी आम्हांकडून विषयत्यागाची अपेक्षा करणें हें दुष्करच वाटतें.

हे महावीरा ! समस्त इंद्रियार्थांचा व सर्व शुभाशुभ वासनांचा अत्यंत त्याग ही गोष्ट सामान्यत: अव्यवहार्य आहे. म्हणून त्याग आणि निष्कामता यांच्या व्यवहार्य स्वरूपाला मी अनासक्ति हें नांव पसंत करतों. कारण आत्मघातच केल्यावांचून किंवा विदेह मुक्तांवांचून देहगेहादिकांचा अथवा तत्संबंधीं कर्मांचा व वासनांचा स्वरूपत: त्याग कसा शक्य होईल ? तसेंच कर्मत्याग जोंवर शक्य नाहीं, तोंवर त्या कर्मास हेतुभूत असलेला कामहि सोडतां येणार नाहीं. हेतुवांचून कर्मप्रवृत्तीच अशक्य दिसते, तेव्हां जें कांहीं शक्य दिसतें. तें इंद्रियार्थासंबंधीं व कर्तृत्व-भोक्तृत्वासंबंधीं अनासक्ति अथवा नि:संगता असणें एवढेंच. पण या नि:संगतेतहि तरतमभाव संभवतात, व तदनुरूप क्रममुक्तीचा अनुक्रम आढळतो. त्याचप्रमाणें लोकव्यवहार पाळणारे जीवन्मुक्त व आत्मभावयुक्त कल्पिलेल्या पाषाणाप्रमाणें निश्चेष्ट स्थितींत राहाणारे विदेहमुक्त, असें मुक्तांचे प्रकार दिसतात.

हे हनुमंता ! भक्तीला विरक्तीची गरज नाहीं, असें कोणी म्हणतात. पण भक्तालाहि, ज्यानें विठ्ठल मात्रा घ्यावी। त्यानें पथ्यें सांभाळावीं ॥ असें विविध प्रकारचें धर्मपालन असतें आणि भक्तांच्या संयमांत विरक्तीचा अभ्यास सहज घडतो. शिवाय विभक्त नव्हे तो भक्त, अशी भक्ताची व्याख्या पाहिली, म्हणजे त्याच्या इष्टदेवावरील परमसक्तींत अन्यपदार्थासंबंधीं निदान अनासक्ति तरी सहजच सिद्ध होते. तसेंच, ज्ञान्यास विरक्तीची पर्वा नाहीं. तो कसाहि वागेल, असें कोणी मानतात. पण विवेक वैराग्यादि साधनच तुष्टमयसंपन्न झाल्यावांचून ज्ञानमार्गास साधक अधिकारीच सिद्ध होत नाहीं. ज्ञानाचा परिपाक कर्तृत्त्व, भोक्तृत्व या भावांच्या पूर्ण निरासांतच होत असतो. अर्थात व्यक्तिचे कर्तृत्व व भोक्तृत्व मावळल्यावर व्यक्तिचें जीवन ईश्वराच्या समष्टिभावापर्यंत उरतें.

हे भक्तपुरुषा ! राम-रावणयुद्धानंतरचें तुझें चरित्र फारसें उपलब्ध नाहीं. कौरव-पांडवांच्या भारतीय युद्धांत तूं पार्थाच्या रथावर होतास. तसेंच कृष्णावतारीं तूं भीम, गरुड, सत्यभामा, यांचें निरनिराळ्या प्रसंगीं गर्वहरण केलेंस, अशा कथा प्रसिद्ध आहेत. तसेंच त्यानंतर कलियुगांत तूं आपल्या भक्तांस दर्शन देऊन कृतार्थ केलें आहेस. पण अशाप्रकारच्या कलियुगांतील तुझ्या गोष्टींत तुझी कर्मप्रवृत्ति फारशी दिसत नाहीं. मग तुलसीदास, रामदास व त्यानंतर अनेक सत्पुरुष यांच्या रूपानें अवतीर्ण होऊन तूं सतत लोकसंग्रहाचें अथवा जगदुद्धाराचें काम करीतच असलास, तर कांहीं सांगवत नाहीं. पुराणांतून असे क्वचित् कोठें उल्लेख आढळतात.

हे हनुमंता ! मन हें वासनात्मक आहे, बुद्धि ही भावनात्मक आहे. मन हें चंद्र आहे, बुद्धि ही सूर्य आहे. मनानें बुद्धीच्या, म्हणजे विवेकाच्या ताब्यांत राहाणें, हाच बुद्धियोग आहे. निष्काम कर्मयोगाचें अथवा अनासक्तीचें वर्म विवेकाच्या प्राधान्यांतच दिसतें. बुद्धिमंतात वरिष्ठ अशी तुझी ख्याती आहे. यामुळें तूं कर्म करीत असलास अगर नसलास तरी तुझा अनासक्तियोग अबाधित दिसतो. कारण, रामसेवारूप अथवा आत्मानुग्राहक ऋतु म्हणजे अनासक्तियोगच होय.

हे हनुमंता ! प्रभु रामचंद्राच्या राज्याभिषेकानंतर एका सभेंत तूं प्रश्न विचारलास कीं, सिद्धि कोणती व त्याचें प्रयोजन काय ? या तुझ्या प्रश्नांतील गर्भितार्थ त्याग, निष्कामता, नि:संगता,

अनासक्ति व मुक्ति एतद्रूप सिद्धि असाच असावा, असें मला वाटतें. कारण प्रभु रामचंद्रानें तुला त्यावर जें सविस्तर उत्तर दिलें आहे, त्यांत निरनिराळ्या मुक्तींचा विवेक सांगितला आहे.

हे हनुमंता ! प्रभु रामचंद्रानीं त्यावेळीं तुला जे साधन सांगितलें, तेंच पुढें तुझें लक्षण झालें. प्रभु रामचंद्रांनीं त्यावेळीं तुला सांगितलें कीं, "मनुष्याचें कर्तृत्व, भोक्तृत्व व सुखदु:खादि चित्तधर्मक्लेशरूप असल्यामुळें त्याला बंध प्राप्त होतो. त्या चित्तधर्माचें निरोधन करणें, याला जीवन्मुक्ति म्हणतात. उपाधिरहित घटाकाशाप्रमाणें प्रारब्धक्षयानें विदेहमुक्ति प्राप्त होते. कर्तृत्वादि दु:खनिवृत्तिद्वारां नित्यानंदप्राप्ति हे मुख्य प्रयोजन आहे. वेदान्तश्रवणादिकांनीं उत्पन्न होणाऱ्या समाधीनें जीवन्मुक्तीचा लाभ होतो. सर्व वासनांचा क्षय झाल्यानंतर त्याचा लाभ आहे."

"लोकवासना, शास्त्रवासना व देहवासना यामुळें यथाशास्त्र ज्ञान होत नाहीं. अभ्यासाच्या योगानें शुभवासना उत्पन्न झाली असतां अभ्यासाचें साफल्य झालें, असें समजावें. वासनाक्षय विज्ञान आणि मनोनाश यांचा एकसमयावच्छेदें-करून चिरकाल अभ्यास करावा, वासनेचा त्याग करून चैतन्यरूप असणारा जो मी त्या माझ्या ठिकाणीं जो राहातो, तो सच्चित्-सुखरूप मीच आहे म्हणून समजावें. मग तो समाधीमध्यें असो, अथवा कार्य करो न करो. सर्व इच्छा ज्यानें ताब्यांत घेतल्या आहेत, तो मुक्त म्हणून समजावा. वासनात्याग आणि मौन ह्याच्यासारखें दुसरें कांहीं नाहीं. प्राणस्पंदन व वासना यापैकीं एकाचा क्षय झाला असतां दुसऱ्याचाहि होतो. असंग व्यवहार, संसाराची भावना नाहींशी करणें, व शरीर नाशिवंत आहे असें जाणणें याच्या योगानें वासनेची प्रवृत्ति नाहींशी होते. वासनेचा त्याग केला असतां चित्ताचें चित्तत्व राहात नाहीं. वासना नसली म्हणजे मन कांहीं जाणत नाहीं. तेव्हां ते मन असून अमन होतें. म्हणजे परम उपशमस्थिति प्राप्त होते."

अनासक्ति व मुक्ति एतद्रूप सिद्धि अस
असावा, असें मला वाटतें. कारण
रामचंद्रानें तुला त्यावर जें सविस्तर
दिलें आहे, त्यांत निरनिराळ्या मुक्ति
विवेक सांगितला आहे.

हे हनुमंता ! प्रभु रामचंद्रानीं त्या
तुला जे साधन सांगितलें, तेंच पुढें
लक्षण झालें. प्रभु रामचंद्रांनीं त्यावेळीं तुल
सांगितलें कीं, ''मनुष्याचें कर्तृत्व, भोक्तृ
व सुखदु:खादि चित्तधर्मक्लेश
असल्यामुळें त्याला बंध प्राप्त होतो. त्या
चित्तधर्मांचें निरोधन करणें, याल
जीवन्मुक्ति म्हणतात. उपाधिरहित
घटाकाशाप्रमाणें प्रारब्धक्षयानें विदेहमुक्ति
प्राप्त होते. कर्तृत्वादि दु:खनिवृत्तिद्वार
नित्यानंदप्राप्ति हे मुख्य प्रयोजन आहे
वेदान्तश्रवणादिकांनीं उत्पन्न होणाऱ्य
समाधीनें जीवन्मुक्तीचा लाभ होतो.
वासनांचा क्षय झाल्यानंतर त्याचा लाभ
आहे.''

''लोकवासना, शास्त्रवासना व
देहवासना यामुळें यथाशास्त्र ज्ञान होत
नाहीं. अभ्यासाच्या योगानें शुभवासना
उत्पन्न झाली असतां अभ्यासाचें साफल्य
झालें, असें समजावे. वासनाक्षय विज्ञान
आणि मनोनाश यांचा एकसमयावच्छेदें-
करून चिरकाल अभ्यास करावा, वासनेचा
त्याग करून चैतन्यरूप असणारा जो मी त्या
माझ्या ठिकाणीं जो राहातो, तो सच्चित्-
सुखरूप मीच आहे म्हणून समजावें. मग तो
समाधीमध्यें असो, अथवा कार्य करो न
करो. सर्व इच्छा ज्यानें ताब्यांत घेतल्या
आहेत, तो मुक्त म्हणून समजावा.
वासनात्याग आणि मौन ह्याच्यासारखें दुसरें
कांहीं नाहीं. प्राणस्पंदन व वासना यापैकी
एकाचा क्षय झाला असतां दुसऱ्याचाहि
होतो. असंग व्यवहार, संसाराची भावना
नाहींशी करणें, व शरीर नाशिवंत आहे असें
जाणणें याच्या योगानें वासनेची प्रवृत्ति
नाहींशी होते. वासनेचा त्याग केला असतां
चित्ताचें चित्तत्त्व राहात नाहीं. वासना
नसली म्हणजे मन कांहीं जाणत नाहीं.
तेव्हां ते मन असून अमन होतें. म्हणजे परम
उपशमस्थिति प्राप्त होते.''

अनासक्ति व मुक्ति एतद्रूप सिद्धि असाच असावा, असें मला वाटतें. कारण प्रभु रामचंद्रानें तुला त्यावर जें सविस्तर उत्तर दिलें आहे, त्यांत निरनिराळ्या मुक्तींचा विवेक सांगितला आहे.

हे हनुमंता ! प्रभु रामचंद्रानीं त्यावेळीं तुला जे साधन सांगितलें, तेंच पुढें तुझें लक्षण झालें. प्रभु रामचंद्रांनीं त्यावेळीं तुला सांगितलें कीं, ''मनुष्याचें कर्तृत्व, भोक्तृत्व व सुखदु:खादि चित्तधर्मक्लेशरूप असल्यामुळें त्याला बंध प्राप्त होतो. त्या चित्तधर्माचें निरोधन करणें, याला जीवन्मुक्ति म्हणतात. उपाधिरहित घटाकाशाप्रमाणें प्रारब्धक्षयानें विदेहमुक्ति प्राप्त होते. कर्तृत्वादि दु:खनिवृत्तिद्वारां नित्यानंदप्राप्ति हे मुख्य प्रयोजन आहे. वेदान्तश्रवणादिकांनीं उत्पन्न होणाऱ्या समाधीनें जीवन्मुक्तीचा लाभ होतो. सर्व वासनांचा क्षय झाल्यानंतर त्याचा लाभ आहे.''

''लोकवासना, शास्त्रवासना व देहवासना यामुळें यथाशास्त्र ज्ञान होत नाहीं. अभ्यासाच्या योगानें शुभवासना उत्पन्न झाली असतां अभ्यासाचें साफल्य झालें, असें समजावे. वासनाक्षय विज्ञान आणि मनोनाश यांचा एकसमयावच्छेदें-करून चिरकाल अभ्यास करावा, वासनेचा त्याग करून चैतन्यरूप असणारा जो मी त्या माझ्या ठिकाणीं जो राहातो, तो सच्चित्-सुखरूप मीच आहे म्हणून समजावें. मग तो समाधीमध्यें असो, अथवा कार्य करो न करो. सर्व इच्छा ज्यानें ताब्यांत घेतल्या आहेत, तो मुक्त म्हणून समजावा. वासनात्याग आणि मौन ह्याच्यासारखें दुसरें कांहीं नाहीं. प्राणस्पंदन व वासना यापैकीं एकाचा क्षय झाला असतां दुसऱ्याचाहि होतो. असंग व्यवहार, संसाराची भावना नाहींशी करणें, व शरीर नाशिवंत आहे असें जाणणें याच्या योगानें वासनेची प्रवृत्ति नाहींशी होते. वासनेचा त्याग केला असतां चित्ताचें चित्तत्त्व राहात नाहीं. वासना नसली म्हणजे मन कांहीं जाणत नाहीं. तेव्हां ते मन असून अमन होतें. म्हणजे परम उपशमस्थिति प्राप्त होते.''

''मनुष्याचें मन व्युत्पन्न नसलें म्हणजे ब्रह्मज्ञान होत नाहीं. तेव्हां गुरू आणि शास्त्र या प्रमाणांनी जो निर्णय दिला असेल, त्याचें आचरण करावें. नंतर दोष पक्व झालें असतां खात्रीनें आत्मवस्तूचें ज्ञान होतें. मग शुभ असाहि वासनांचा ओघ याचा तूं त्याग करावा. चित्तनाश करावा असें मनांत आलें असतांना मैत्र्यादि गुणांनीं नि:संशय चित्त शांत होतें. मग त्या जीवन्मुक्ताचें मन पुनर्जन्मरहित असें होतें. हा सरूप मनोनाश होय. अरूप मनोनाश विदेहमुक्तीनें प्राप्त होतो.''

''जोपर्यंत हें मन एकतत्त्वाचा दृढाभ्यास करून जिंकलें नाहीं, तोपर्यंत वासनारूपी वेताळ वल्गना करीत असतात. पहिल्यानें मन जिंकावें, वासनात्याग, प्राणस्पंदनिरोध, अध्यात्मविद्याप्राप्ति व साधुसंगति यांनींच मन जिंकतां येतें. चित्त जिंकायला साधन ध्यान हें होय. चिन्मात्र चिदानंद याचें चिंतन करावें.''

''ब्रह्माकार मनोवृत्तीचा अहंकृतीवांचून जो प्रवाह याला संप्रज्ञात समाधि म्हणतात. हा एकसारखा ध्यानाभ्यासाच्या योगानें प्राप्त होतो. चित्ताची वृत्ति शांत होऊन चित्त परमानंदरूप झालें असतां असंप्रज्ञात समाधि होते. ही योग्यांना अत्यंत प्रिय आहे. मलीन वासना जन्माला कारण आहे. शुद्ध वासना जन्माचा नाश करणारी आहे.''

''पुष्कळ शास्त्राचें अध्ययन करून काय उपयोग ? प्रयत्नानें हृदयांतील आत्मज्योतीचा शोध करावा. वासनाबद्ध तो बद्ध. वासनेचा क्षय म्हणजे मोक्ष. वासनेचा त्याग करून मोक्षाच्या इच्छेचाहि त्याग करावा. पहिल्यानें मानसिक वासना टाकाव्या, नंतर विषयवासनेचा त्याग करावा, आणि निर्मल अशाप्रकारच्या मैत्र्यादि वासनांचें ग्रहण करावें. पुढें त्याहि आंतूनच टाळून त्या वासनांनीं व्यवहार करीत असतांहि अंत:शांत समस्नेह आणि चिन्मात्रवासन असा हो. त्याहि वासनेचा त्याग करून मन-बुद्धि यांनी स्थिर, समाधानी असा माझ्या ठिकाणीं रहा. कारण-कार्यरहित निर्मल व सदा तृप्त असा मी आहें.''

हे मुक्तपुरुषा ! सिद्धांचे जें लक्षण तें साधकांचे साधन असतें, त्या अर्थी अनासक्तियोग हेंच तुझें रूपलक्षण आहे. साधन अंगीं बाणलें कीं तेंच लक्षण होतें. अनासक्तियोगाची ही चरम सीमा होय व तीच परमार्थ-साधकानें अंतिमध्येयरूप मानणें योग्य आहे.

## नामजप

**चहूं वर्णास नामाधिकार।**
**नामीं नाहीं लहानथोर।**
**जडमूढ पैलपार।**
**पावती नामें ॥४/३/२४**

हे हनुमंता ! आज तूं कोठे, काय करीत असशील ? असा विचार जेव्हां मनांत येतो, तेव्हां तूं एकांतांत रामनाम जपीत बसला असशील, हेंच उत्तर मनांत येतें. याशिवाय कांहींच मनांत येत नाहीं.

हे रामभक्ता ! यज्ञांत जपयज्ञ तो मी असें भगवंताने अर्जुनास सांगितलें. त्याहि पूर्वींचा रामनामजपरूप तूं आहेस. तुझ्याहि पूर्वीपासूनचे रामनामजप करणारे तापसी चंद्रमौळी शंकर होत. त्यांचाच तूं अंश असल्यामुळें, त्यांचें हें व्रत तूं एकनिष्ठपणें धारण केलें आहेस.

जपाचे वाचिक, म्हणजे वैखरी वाणीनें दुसऱ्यास ऐकूं जाईल असा, उपांशु म्हणजे कंठगत, व मानसिक म्हणजे मनोमय असें तीन प्रकार उत्तरोत्तर श्रेष्ठ दर्जाचे आहेत. मानसजपाबरोबर आराध्य देवतेचें भावनेनुसार ध्यान करावें, असें शास्त्र सांगतें, याप्रमाणें उद्यन्मार्तंडकोटि इ. हे तुझें ध्यान शास्त्रोक्त आहे. तुझ्या नामाच्या निष्काम जपानें प्रभु रामचंद्रासह तूं प्रसन्न होऊन दर्शन देतोस, असें अनुभवी शास्त्रज्ञ सांगतात.

हे हनुमंता ! आजकाल शिक्षित लोकहि नामधारकास 'टाळकुट्या' म्हणून त्याचा तिरस्कार करतात व समर्थ रामदास वारकरी संतांसारखे टाळकुटे नव्हते म्हणून मोठ्या अट्टाहासानें प्रतिपादीत असतात ! पण खुद्द समर्थ रामदासच असें स्पष्ट

सांगतात कीं, ह्यांच्यासारखा अर्धवट ज्ञानीच काय, पण मुक्त पुरुषहि नामाचा अव्हेर करील, तर तो मुक्त नव्हे. तो गव्हार होय ! ते म्हणतात : मुक्तपणें रामनामाचा अव्हेरू। करी तो गव्हारू मुक्त नव्हे ॥१॥ मुक्त नव्हे काय स्वयें शूलपाणी। रामनाम वाणी उच्चारितो ॥२॥ उच्चारितो शिव तेथें किती जीव। बापुडे मानव देहधारी ॥३॥

हे हनुमंता ! सनकादिक अनेक ऋषि आणि प्रल्हादादिक अनेक भक्त ह्यांनीं एकदां तुला ब्रह्मवेत्याचें तत्त्व कोणतें ? असें विचारलें. तें म्हणालें कीं, अठरा पुराणें, अठरा स्मृति, चार वेदशास्त्रें, आध्यात्मिक विद्या, अनेक देवता व शक्ति या सर्वांत तत्त्व कोणतें तें सांगा. तेव्हां तूं असें सांगितलेंस कीं, 'राम' हेंच परम तप आहे. प्रणवासह सर्व देवतांचे जे मंत्र आहेत ते सर्व याचे अंगभूत आहेत. अ. उ. म. अर्धमात्रा, रा आणि म हा षडक्षरांचा महामंत्र आहे.

हे मारुते ! कोणी कोणी असें म्हणतात कीं, प्रणवापेक्षांहि राममंत्राचा महिमा अधिक आहे. प्रणवानेंहि तो मंत्र आपल्या शिरीं धारण केला आहे. कारण अर्धचंद्र हाच रफार असून अनुस्वार हाच 'म'कार आहे. शिवाय रामनामजपाचा अधिकार सर्वांस आहे. 'रमन्ते योगिनो यस्मिन्'', म्हणजे योगी लोकहि ज्यांत रमतात अशा योग्यतेचा राममंत्र आहे.

संत म्हणतात कीं, ''नामाचा महिमा। तुज न कळे पुरुषोत्तमा''. रामाला सेतु बांधतां आला नाहीं, तो त्याच्या नामबलावर वानरांनीं बांधला. रामानें एका अयोध्येचाच उद्धार केला, पण रामनामानें त्रिभुवनाचा उद्धार केला. ''मुखीं नाम हातीं मोक्ष। ऐशी साक्ष बहुतांसी ॥'' ''रामनामें उपेक्षिला। ऐसा देखिला न ऐकिला ॥'' ''नामें तरला नाहीं कोण। ऐसा द्यावा निवडून ॥''

श्री समर्थ रामदास असा निर्वाळा देतात कीं, ''नामें संकटें नासती। नामें विघ्नें निवारती॥ नामस्मरणें पाविजेती। उत्तम पदें ॥'' (दासबोध) तुकोबाराय म्हणतात कीं, ''जोडे नारायण नामासाठीं ॥'' एकनाथ म्हणतात - ''नामब्रह्म नामब्रह्म। येणेंपुरती सकळ काम।'' वामन पंडित म्हणतात - ''अजित नाम वदो भलत्या मिसें। सकल पातक भस्म करीतसे ॥'' (नामसुधा) ''नामें अज्ञान नासे। नामें आत्मप्रकाशे। पावले जीवन्मुक्तदशे। नामेंचि करूनि ॥'' (यथार्थ दीपिका, अ. ९)

हे मारूते ! या चिकित्सक बुद्धीच्या कलियुगांत परमार्थसाधनांत नाम हेंच सार आहे, असें सारे संत सत्पुरुष एकमुखानें सांगून चिकित्सक बुद्धीची पुंगी बंद करतात.

नामदेव सडेतोडपणें सांगतात :

नामा म्हणे अवघीं चोरें। एक हरिनाम सोईरें ॥

भगवान अर्जुनाला खूणगांठ सांगतात कीं,

परी तयापाशीं पांडवा। मी हारपला गिंवसावा॥ जेथ नामघोषु बरवा। करिती माझा ॥ ज्ञा., अ. ९/२०८

हे भक्तसख्या ! भक्तिच्या वाटा दाखवीत असतां ''नामस्मरण'' हा एक सर्वांना सुलभ मार्ग तूं दाखविला आहेस, आणि साऱ्या संतांनीं तोच मार्ग आक्रमिला आहे. ''ज्ञानदेवीं अभ्यास मोठा। नामस्मरण मुखावाटा। कुळ गेलें वैकुंठा। हरि हरि स्मरतां ॥'' असें ज्ञानेश्वरच सांगतात. तेथपासून तों अलीकडील तुझे भक्त जे देव - नाथ ह्यांच्यापर्यंत, किंबहुना त्याहीनंतर आजपर्यंत संतांच्या संप्रदायांत नामजपाची प्रथा अव्याहत चालूच आहे. देवनाथांनीं तुजजवळ मागणें मागितलें, त्यांत ते म्हणतात :

प्रेमें गाईन नाम वाणीं। नाचेन कीर्तनीं आनंदें ॥४॥ देवनाथ याचक द्वारीं। प्रेमवारी घालावी ॥५॥

रामनामाचा जिव्हेस कधींहि विसर न पडावा, हीच देवनाथांनीं तुजजवळ वरयाचना केली, तेव्हां तूं त्यांचे जिव्हेवर ''श्रीराम'' हीं अक्षरें कायमचींच कोरलींस, अशी दंतकथा प्रसिद्ध आहे. त्यापूर्वीचे तुझेंच अंशावतार रामदास ह्यांनी तेरा कोटि रामनाम जप करून ते सामान्य नारोबाचे समर्थ रामदास बनले, हेंहि प्रसिद्ध आहे. पण आज भजन करणारांस 'टाळकुटे' म्हणून नाममहिम्याचा उपहास केला जातो, व या उपहासाचा अप्रत्यक्ष पुरस्कार समर्थ सांप्रदायिक वाङ्मयांतहि अगत्यपूर्वक होतो, हा कालमहिमा आहे !

नामभजन हें साधन वैदिक नव्हे असें म्हणणारे पंडितहि अयथार्थ बोलत असतात. ''कतमस्यामृतांना मनामहे चारू देवस्य नाम'' असें ऋग्वेदांत म्हटलें आहे. ईश्वराच्या नामाचा महिमा यजुर्वेदांतहि वर्णिला आहे. नामाची उपासना केली पाहिजे. नामोपासक नारदाप्रमाणें कामचारी बनतात, असें छांदोग्यांत सांगितलें आहे. प्रवणनाममहिमा गीतेंत भगवंतानीं वर्णिला आहे.

नाममंत्राचा महिमा सांगतांना थोर अनुभवी संत असें म्हणतात कीं, असें एखादें अतिघोर पातक अद्याप कल्पनेंतहि आणतां येत नाहीं कीं जें 'नाममंत्राचे' बळानें भस्म होऊन जाणार नाहीं. वाटेल त्या वर्णोच्चारांच्या ध्वनीनें निद्रिस्त पुरुष कदाचित जागा होईल, पण त्याचें अचूक नांव घेऊनच त्यास हांक मारली तर तो खचित जागा होईल. नामासरशीं नामीनें 'ओ' द्यावी, इतकें अनुसंधान सुषुप्तींतहि राहातें. यांतच हरिनामाच्या गजराचें रहस्य दिसतें.

हे हनुमंता ! गणितांत काळ, गति आणि काम यांच्या उदाहरणांत काळ आणि गति यांचें व्यस्त प्रमाण असतें. त्याचप्रमाणें साधन जितकें सुलभ दिसतें, तितकें तें अन्य तऱ्हेनें अधिकच दुर्घट व दीर्घ कालावधि घेणारें असतें. अगोदर नामस्मरण या साधनाच्या साध्या, सोप्या व उघड स्वरूपामुळें त्यासंबंधीं सहसा अगत्यच वाटत नाहीं. पूर्वप्रारब्धबलावांचून अथवा देव-गुरुंच्या कृपेवांचून हरिनाम स्मरणांत राहात नाहीं व तोंडात येत नाहीं. आणि तें भजनाचें दंभानें अथवा बलात्कारानें घेऊं म्हटलें, तरी तो नुसता ओंठाबाहेरील खेळच होतो. श्री एकनाथ म्हणतात -

नाम घेतां हे वैखरी। चित्त धांवे विषयांवरी ॥ कैसे होता हे स्मरण। स्मरणामाजीं विस्मरण ॥ नाम-रूपा नव्हतां मेळ। नुसतां वाचेचा गोंधळ ॥

तसेंच आणखी संत बजावतात कीं,

जेणें विठ्ठल मात्रा घ्यावी। तेणें पथ्ये संभाळावीं ॥ कामक्रोध तिखट मिर्ची। यांची घेऊं नये रुचि ॥

पद्मपुराणांत सनत्कुमारांनीं नारदमुनीला नामस्मरणांत होणारे दहा अपराध टाळण्याविषयीं सांगितलें आहे, ते असें - (१) साधुनिंदा, (२) हरिहरांत भेद, (३) गुरुजनांची अवज्ञा, (४) वेद-शास्त्रादिकांची निंदा, (५) नाम-माहात्म्याला अर्थवाद मानणें, (६) नामाचे बळावर पापाचरण करणें, (७) व्रतदान, यज्ञादि शुभकर्मांच्या समान नामास लेखणें, (८) भाव, श्रद्धा व श्रवणाची अभिरुचि नसलेल्यास दाटून उपदेश करणें, (९) श्रद्धेचा अभाव, (१०) व अहंताममतादि मोहपाश. यांशिवाय असत्य भाषण व परधनपरदाराभिलाष, असे आणखीहि अपराध वर्ज्य केले पाहिजेत.

तरी हे हनुमंता ! असे कोणतेहि अपराध मजकडून न होतां नामामृतगोडी मला लागेल व तेणेंकरून माझे देहकुंडलींतील द्वादशभाव शुद्ध होतील असें तूं सामर्थ्य दे. कारण नामामृतगोडीरूपच तूं आहेस.

## ब्रह्मचर्य

हे प्राणेश्वरा ! प्राण हें असंगतत्त्व आहे. तें मैथुनी सृष्टीचें कारण होऊंच शकत नाहीं. रतीचे विषय दोनच मानलें आहेत. एक स्त्री व दुसरा ईश्वर. तूं ऊर्ध्वरेता आत्मकाम आहेस. तुझा रतीचा विषय परमात्मा हाच आहे.

हे हनुमंता ! बहुधा सारे देव सशक्तिक असून तूं मात्र त्यांत अपवादभूत असा नैष्ठिक ब्रह्मचारी दिसतोस. जन्मसिद्ध ब्रह्मचर्य हेंच तुझें लक्षण आहे, व तें लक्षण जो ओळखील, तोच तुझा स्वामी असें तुझ्या आईनें तुला सांगितलें होतें.

प्राचीन काळी प्रसिद्ध असलेले सारे देव आणि ऋषि हे सपत्निक असतां, तूं मात्र अविवाहित राहावेंस हें विशेष आहे. त्यांतहि ज्या जातींत अनेक माद्यांस एक हुप्या असतो, अशा बहुपत्निक वानर जातींतील तुझें नैष्ठिकी ब्रह्मचर्य अधिकच आश्चर्यवत् आहे.

हे मारुते ! परमार्थमार्गात ब्रह्मचर्याचें महत्त्व फारच मानलें आहे. शुक्रधातूचेंच ओज बनतें व त्या ओजाचेंच मन बनतें, असें असल्यामुळें मनाचे सामर्थ्य ब्रह्मचर्यानें अपरिमित वाढत असलें पाहिजे, हें उघड आहे. इंद्रिय-विज्ञान-शास्त्रीहि असें सांगतात कीं, ब्रह्मचर्यानें शरीरांतील एक गूढ नाडी सिद्धिसंपन्न होते.

हे ब्रह्मवेत्त्या ! अज्ञानकार्य अशा मन-बुद्धीनें आत्मज्ञानाची जिज्ञासा बाळगणें हें साहसच आहे. पण तें ब्रह्मचर्यव्रतानें सिद्धीस जातें.

साऱ्या इंद्रियार्थांत कनक आणि कांता या अत्यंत मोहक वस्तु आहेत. त्यांत कनकापेक्षांहि कांतेचा मोहकपणा जिवंत व जागृत असतो, व तो सार्वत्रिक असतो. कनकाचा तितका नाहीं. वाली आणि सुग्रीव, राम आणि रावण, यांच्यामधील संग्रामाचे निमित्तकारण स्त्रीच झाली. ह्या स्त्रीविषयासाठीं आजपर्यंत कामीजनांचा पैसा पाण्याप्रमाणें खर्च झाला आहे, व कामांध वीरांनी तर रक्ताचे पाट वाहविले आहेत ! काम, क्रोध आणि लोभ हीं नरकाची द्वारें म्हटलीं आहेत. त्यांतहि काम हाच क्रोधास व लोभास कारण होतो. या कामांत स्त्रीकाम हा दुर्दमनीय आहे. असें असल्यामुळें ब्रह्मचर्यांतील लैंगिक संयमास सर्वांत अधिक महत्त्व दिलें जातें.

हे मारुते ! ब्रह्मचर्यपालनांत तर-तम भाव आहेत. गृहस्थांनीं फक्त ऋतुकाळीं भार्यागमन करण्यानें ब्रह्मचर्याची हानि झाली असें मानीत नाहींत. शाक्तधर्मांतील पंचमकारात मैथुन हा एक यज्ञ गणला जातो. पण शाक्तांच्या धर्मांतहि पशु, वीर आणि दिव्य असे जे साधकांचे तीन वर्ग सांगितले आहेत, त्यापैकीं पशुवर्गास पंचमकार प्रत्यक्ष रूपांत वर्ज्य आहेत. त्यांस अनुकल्पतत्त्वें सांगितलीं आहेत. तसेंच दिव्य वर्गास आध्यात्मिक दिव्य तत्त्वें सांगितली आहेत. फक्त वीरवर्गानें मात्र कांहीं एका यज्ञासारख्या श्रेष्ठ धारणेनें मैथुनाचा अंगिकार केला असतां ते कृत्य शास्त्रीयच ठरतें. पण ही शुद्ध धारणा ब्रह्मचर्यापेक्षांहि दुर्घट वाटते. उलटपक्षीं ब्रह्मचर्य याची व्याख्या अष्टविध मैथुनापुरतीच संकुचित न करतां सर्व इंद्रियांचा इंद्रियार्थापासून निग्रह व ब्रह्मभावांत मनाचा संचार यास कोणी ब्रह्मचर्य म्हणतात.

हे मारुते ! ह्या श्रेष्ठ प्रकारच्या ब्रह्मचर्यसाधनाचाहि तूं आदर्श आहेस. हेंच तुझें छांदोग्यांतील स्कंदोक्त सार आहे. या जगांत आजवर ब्रह्मचारी अनेक होऊन गेले. पण 'जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी।' असें समर्थ म्हणतात, त्याअर्थी तुझें ब्रह्मचर्य आत्मानुसंधानरूप श्रेष्ठ दर्जाचेंच असलें पाहिजे. शिवाय ज्यानें एक काम जिंकला त्यानें क्रोधादि सारे शत्रू जिंकल्याप्रमाणेंच आहेत. म्हणूनच नामदेव खेळियांची स्तुति करितांना म्हणतात खेळियामाजी हनुम्या शहाणा। न पडे कामव्यसनीं रे ॥ कामचि नाहीं तेथें क्रोधचि कैंचा तेथें कैचें भांडण रे। रामगड्याची आवडि मोठी म्हणून लंके पेणें रे ॥

## दास मारुती

**यदृच्छया लब्धमपि**
**विष्णोर्दाशरथेस्तु यः।**
**नैच्छन्मोक्षं विनादास्यं**
**तस्मै हनुमते नमः ॥**

हे हनुमंता ! तुझ्या पराक्रमाला त्रिविक्रमाची उपमा कवींनीं अनेक ठिकाणीं दिली आहे. हे तुझे त्रिविक्रम म्हणजे कर्म-उपासना-ज्ञान हेच असावेत. कर्मावांचून चित्तशुद्धि होत नाहीं व चित्तशुद्धि झाल्यावांचून ज्ञान नाहीं. निष्काम कर्मयोगांत अनासक्ति आणि ईश्वरानुसंधान ह्या दोन्ही गोष्टी साधतात. वैराग्य आणि विवेक यांचाच तो अप्रत्यक्ष अभ्यास होतो. हे हनुमंता ! सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांपैकीं सत्त्व हा ज्ञानाला उपकारक आहे. रज, तम हे प्रत्यवायभूत आहेत. यास्तव

त्या रज-तमांची रग सेवाधर्मांत जिरवून त्यांस सौम्य करणें, हाच चित्तशुद्धीचा उपाय दिसतो.

हे कपिश्रेष्ठा ! श्रीसमर्थांनी रज-तमांचे वर्णन असें केलें आहे : जें जें दृष्टी पडिलें। तें तें मनें मागितलें। लभ्य नसतां दु:ख जालें। तो रजोगुण ॥२३॥ टवाळी ढवाळी निंदा। सांगणेंघडे वेवादा। हास्य विनोद करी सर्वदा। तो रजोगुण ॥२५॥ (दा.बो., २/५) युद्ध देखावें ऐकावें। स्वयें युद्धचि करावें। मरावें कीं मारावें। तो तमोगुण ॥ २/६/१५ (दा.बो.) हे हनुमंता ! तुझी पाशवी प्रकृति अशीच दिसते. तिला तूं रामसेवेंत राबवून आपली सत्त्वसंशुद्धि करून घेतलीस. स्वभावत: गहन असें सेवाकर्म प्रेममय करून सोडलेंस. तूं व्यक्तिश: कामसंकल्पवर्जित होऊन तुझें ईशसेवाधर्मानें होणारें सर्वकर्म-नैष्कर्म्याप्रमाणें तुला भूषणभूत व आम्हांला आदर्शवत् झालें.

हे हनुमंता ! कुशल चित्रकारांनीं तुझ्या अनेक तसबिरा काढून आम्हांपुढें ठेविल्या. त्या सर्व चाळून व न्याहाळून पाहातां (१) तूं रामलक्ष्मणांना खांद्यावर घेऊन सुग्रीवाकडे जात आहेस, (२) तूं सीताशुद्धीकरितां समुद्र उडून जाण्याचें साहस करीत आहेस, (३) तूं सीतामाईपुढें हात जोडून उभा आहेस, (४) तूं लंका दहन करीत आहेस, (५) तूं सेतु बांधीत आहेस, (६) तूं रामाच्या खांद्याला खांदा भिडवून राक्षसांशीं लढत आहेस, (७) तूं द्रोणागिरी आणीत आहेस, (८) तूं भरतभेटीस चालला आहेस, (९) तूं अहिरावण-महीरावणांचा वध करीत आहेस, (१०) तूं सिंहासनाधिष्ठ प्रभुरामचंद्राचे पाय चुरीत आहेस, (११) किंवा एकान्तांत रामभजनांत दंग होऊन नृत्य करीत आहेस, अशीं तुझी एकादश दर्शनें पाहतां ''देहदृष्ट्या तू दासोऽहम्'' याच तुझ्या वचनाची साक्ष पटते. सर्वेंद्रियांसहित शरीराला देवकार्य, रामदास्य, हा एकच अखंड विषय असणें, हेंच तुझें महाव्रत दिसतें. नवविद्या भक्तिंतील दास्यभक्तिचा आदर्श म्हणून तूंच प्रसिद्ध आहेस. मित्रपणें परहितकारी वाङ्माधुर्यें परशोकहारी। सामर्थ्यपणे वेत्रधारी। पुरुषार्थ जगमित्र ॥२१॥ दा.बो., २/८ असा तूं आहेस.

हे रामदूता ! तूं प्रकृतीचा अभिमानी, सीतेचा शोध लावणारा, बल, शौर्य, वीर्य, इत्यादि गुणांचा स्वामी, कामक्रोधादि शत्रूंवर आपली हुकमत चालविणारा, असें जें तुझें दुर्दमनीय पराक्रमी स्वरूप, तें रामपदीं लीन झालेलें दिसतें. शिपायाची हालचाल त्याच्या इच्छेवर अवलंबून नसून सेनापतीच्या इच्छेवर अवलंबून असते, नटाचे अभिनय सूत्रधाराचे संकेताप्रमाणें होत राहातात, सरकारच्या तिजोरीचे हिशेब सरकारचे हुकूमाप्रमाणें होतात, त्याप्रमाणें तुझे सारे व्यापार ईश्वरार्पणबुद्धीनें, म्हणजे ईशप्रेरणेनें होण्यांतच तुझें स्थूल, पराक्रमी हनुमद्रूप अधिकच आदर्शवत् वाटतें.

हे हनुमंता ! स्वामीचें जें मनोगत। तेंचि आपुलें उचित। हेंच तुझें व्रत. तुझा असा निराळा प्रपंचच नाहीं. तूं लग्न केलें नाहींस, व पुढें आईबापांच्या सेवेंतहि फारसा गुंतून राहिलेला दिसत नाहींस. तूं सुग्रीवाचा मंत्रि खरा. पण तें एक रामसेवेला निमित्त झालें, इतकेंच. तूं रावणापाशीं शिष्टाई करण्यास गेलास, तेव्हां मी सुग्रीवराजाचा सचिव आहें, असें न सांगता वनवासी रामाचा एक दास आहे असेंच तूं सांगितलेंस.

हे रामसख्या! तुझ्या देहदृष्टीस रामकार्यावांचून दुसरा कांहीं विषयच राहिला नाहीं. ''म्हणोनि आम्ही रामदास। रामचरणीं अमुचा विश्वास। कोसळोनी पडो हें आकाश। परी आणिकाची वास न पाहों ॥ अशीं तुझी एकनिष्ठा असल्यामुळें दास्यभक्तिची पराकाष्ठा तुझ्या रूपांत आढळते.

हे हनुमंता ! तूं एक महाभागवत आहेस. भागवतभक्तीत दास्यासक्ति ही सर्व आसक्तिंत पहिली आहे. भागवतधर्मानुयायी संतांनीं बहुधा दास्यभक्तिंचाच अंगिकार केलेला दिसतो. दास्य दोन प्रकारचें मानतात. (१) ईश्वराच्या सुखानें सुखी व (२) आपल्या सुखानें सुखी. ह्यापैकीं ईश्वराच्या सुखानें सुखी हाच तुझा श्रेष्ठ वर्ग आहे. हरिदास अपकाऱ्यावरहि उपकारच करतात. हरिदासांचें शुभाचरण कोणाच्या भयामुळें होत नसून तें स्वकृपेनेंच होतें. ते दुर्जय मायेनाहि जिंकतात. भगवदासांना कामादिक हानिकारक न होतां उपकारकच होतात. प्रल्हादादि महाभागवत स्वातंत्र्य न मागतां भगवद्दास्यच मागतात. असें, 'तूं स्वतंत्र आहेस' हें भाषण कुलीन स्त्रीला आनंदवीत नसून व्यभिचारिणी स्त्रीलाच मोदप्रत होतें.

हे हनुमंता ! ''वक्ता आणि वैराग्यता। सर्वज्ञ आणि सादरता। श्रेष्ठ आणि नम्रता। सर्वत्रांसी ॥'' अशी विद्याविनयाची जणूं मूर्तीच असाच तूं प्रभु रामचंद्रांना दिसला असशील.

हे कपिश्रेष्ठा ! तूं जातीचा वानर हें तुझें निकृष्ट रूप पालटतां येणे कोणाच्याच हातीं नव्हतें. पण श्रीसमर्थांनीं सांगितल्याप्रमाणें तूं आपल्या ठिकाणी आगंतुक गुण इतके बाणवून घेतलेंस कीं, त्यामुळें ''जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।'' असें तूं सर्वांकडून म्हणवून घेतलेंस. श्रीसमर्थ म्हणतात : रूपलावण्य अभ्यासितां न ये। सहजगुणासी न चले उपाये। कांहींतरी धरावी सोये। आगांतुक गुणाची ॥१॥ तनें मनेंसी झिजावें। तेणें भलें म्हणोन घ्यावें। उगेंचि कल्पितां शिणावें। लागेल पुढें ॥२१॥ लोकीं कार्यभाग आडे। तो कार्यभाग जेथें घडे। लोक सहजचि वोढे। कामासाठीं ॥२२॥ समजलें आणि वर्तलें। तेचि भाग्यपुरूष जाले। यावे-गळे उरले। ते करंटेपुरूष ॥२५॥ बहुतांचे मुखी उरावें। बहुतांचे अंतरी भरावें। उत्तम गुणीं विवरावें। प्राणिमात्रासी ॥३२॥ शहाणे करावे जन॥ पतित करावे पावन। सृष्टीमध्यें भगवद्भजन। वाढवावें ॥३३॥. दा.बो., १४/६ हें समर्थांनीं वर्णन केलेलें महंताचें चातुर्यलक्षण तुझेंच नव्हे काय ?

## श्रद्धा आणि सबुरीचे तीर्थस्थान

# श्री दादाजी धुनीवाले दरबार, खण्डवा (मध्यप्रदेश)

- डॉ. ए. आर. आखरे
छिंदवाडा, म.प्र.

यदा यदा हि धर्मस्य
ग्लानिर्भवति भारत:,
अभ्युत्थान धर्मस्य
तदात्मानं सृजाम्यहम्,
परित्राणाय साधुनां
विनाशाय च दुष्कृताम्,
धर्म संस्थापनार्थाय
संभवामि युगे-युगे ॥

अनेक युगांपासून भारत संत-महात्म्यांचा आणि धर्मावतारांचा जनक राहिलेला आहे. जेव्हा-जेव्हा अनाचार, अत्याचार, दुष्कृत्य वाढले, तेव्हा-तेव्हा ईश्वराने कोणत्या ना कोणत्या रूपांत अवतार धारण केले. सामान्य जनतेला सुख, शांती दिली. ह्या अवतारी पुरुषांपैकी एक म्हणजे खंडवा येथील श्री धुनीवाले दादाजी महाराज होय ! असा विश्वास व्यक्त केला जातो की, ब्रह्मलीन श्री धुनीवाले दादाजी महाराज आजही या भारत-भूमीत आहेत; परन्तु त्यांना पाहण्यासाठी दिव्य ज्योतीची आवश्यकता आहे.

हे स्थान शेगाव, शिरडीप्रमाणेच एक पवित्र व धार्मिक स्थान म्हणून मान्यता पावत आहे. दरवर्षी गुरूपौर्णिमेच्या दिवशी हजारो भक्तगण येथे येतात व आपली मनोकामना महाराजांना सांगतात. हे स्थान शिरडीप्रमाणेच श्रद्धा व सबुरीचे दर्शन घडविते.

श्री दादाजी महाराजांचे गुरु श्री गौरीशंकर महाराज हे होते. श्री गौरीशंकर महाराज नर्मदामाईचे उपासक होते. त्यांची सन १८५७ पासून जमात चालत होती. ही जमात नर्मदा नदीच्या काठावरच नेहमी राहात असे. या जमातीचा राजेशाही थाट पाहून इंग्रज अधिकारी नेहमीच शंका करीत की, या जमातीचा इतका खर्च कुठून पूर्ण होत असेल. हे लोक रात्रीच्या वेळी दरोडे, चोऱ्या वगैरे करीत असावेत. या चौकशीसाठी एक दिवस इंग्रज अधिकारी गौरीशंकर महाराजांकडे गेले. तेव्हा श्री गौरीशंकर महाराजांनी उत्तर दिले, "सब नर्मदा मैया की कृपा है।" या गोष्टीचा अनुभव इंग्रज अधिकाऱ्याला महाराजांनी करवून दिला. अधिकाऱ्याला ते नदीकाठी घेऊन गेले आणि नर्मदा नदीच्या पात्रातून एक रुपयांची थैली त्यांनी त्या इंग्रज अधिकाऱ्याला काढून दिली. ही चमत्कारिक घटना पाहून अधिकारी महाराजांसमोर नतमस्तक झाला. असे हे चमत्कारिक महात्मा श्री दादाजी महाराजांचे गुरु होते.

बालअवस्थेत श्री दादाजी महाराज नर्मदा नदीकाठी फिरत असता त्यांना "मातृ नर्मदे हर्-हर्" असा आवाज ऐकू आला. मातृ नर्मदे कोण आहे, हे पाहण्याचे कुतूहल त्यांना निर्माण झाले आणि हा अनुपम दिव्य बालक जमातीजवळ गेला. त्यावेळी श्री गौरीशंकर महाराज आणि त्या दिव्य बालकाचे प्रेमाश्रूंनी मीलन झाले. महाराज प्रसन्न झाले. या दिव्य बालकाला महाराजांनी आपल्या जमातीमध्ये सामील केले. त्याची शिक्षा-दीक्षा इत्यादी झाले. विविध शास्त्र, वेद इत्यादींचा त्यांनी खूप अभ्यास केला. श्री दादाजी महाराजांच्या जन्मासम्बन्धी काहीही निश्चित माहिती उपलब्ध नाही. दादाजी सर्व भाषा बोलत असत. असे महान अवतारी पुरुष अयोनीसंभव मानले जातात. श्री दादाजी शिवशंकराचे अवतार होते.

श्री गौरीशंकर महाराजांनी ११ डिसेम्बर, १८८८ मध्ये होशंगाबादजवळ कोकसर या गावी समाधी घेतली. समाधीपूर्वी श्री दादाजी महाराज जमातीचे महंत होते. परंतु गुरूच्या समाधीनंतर जमातीमध्ये गडबडी सुरू झाल्या. यामुळे दादाजी महाराजांचे मन तेथे रमत नव्हते. म्हणूनच एक दिवस जमात सोडून श्री दादाजी खांडोन गावच्या घनदाट जंगलात निघून गेले. या जंगलात ते एका पिंपळ वृक्षाच्या खाली ध्यान लावून कित्येक दिवस बसून राहिले. या अवस्थेत असताना एकदा त्यांना एका अजगराने गिळले. हे दृश्य जंगलात आलेल्या एका महिलेने बघितले. ही महिला ओरडत-ओरडत गावात गेली. लोकांना घटनेची सम्पूर्ण माहिती दिली. लोक गोळा झाले. लोकांनी आरडा-ओरडा केल्याने दादाजी महाराजांचे ध्यान भंग पावले. लोकांनी सापाला मारले. दादाजी महाराजांना मेलेल्या सापाबद्दल दया आली. दादाजींचा जमातीच्या साधूंना पत्ता लागल्याने जमातीच्या साधूंनी त्यांना पुन्हा परत नेले.

पुन्हा एके दिवशी श्री दादाजी जमात सोडून निघून गेले. यानंतर ते कधीही जमातीमध्ये परतले नाही. घनदाट जंगलात निघून गेल्यावर सर्पदंशामुळे त्यांचे निधन झाले, ही दादाजींची स्वत:ची लीला होती, ज्यामुळे दादाजींना पुन्हा जमातीमध्ये परत जावे लागणार नव्हते. त्यांच्या मृत्यूचे वृत्त कानी पडताच जमातीमधील साधू एकत्रित झाले. शेवटी दादाजींचे शरीर नर्मदेच्या जलामध्ये विसर्जित करण्यात आले.

पुन्हा सन १८९२ मध्ये होशंगाबाद (मध्यप्रदेश) या शहरात 'रामफल' या नावाने ते प्रगट झाले. लहान मुले त्यांना दादाजी म्हणून सम्बोधित. श्री दादाजी विवस्त्रावस्थेत वेड्यासारखे राहू लागले. नर्मदा नदीत पोहणे, कुणाला शिव्या देणे, जोर-जोराने हसणे, काहीही बोलणे इत्यादी त्यांच्या क्रिया होशंगाबादचे लोक नेहमीच

पाहत असत. श्री दादाजी महाराजांनी अनेक चमत्कारही करून दाखविले. काही चमत्कारिक प्रसंग येथे देत आहे.



एके दिवशीचा असाच एक प्रसंग आहे. सकाळच्या वेळी दादाजी महाराज एका पुलावर बसले होते. त्यावेळी तिथून काही गवळणी दूध विकण्यास शहरात जात असत. दादाजी त्यांच्याकडे दही, दूध मागत असत. परंतु एके दिवशी एका गवळणीने त्यांना दूध देण्यास नकार दिला. गवळण काही दूर गेली असता, दादाजींनी आपला हात वीस हात लांब करून तिच्या डोक्यावरचे मडके उचलून घेतले. एवढा लांब हात बघून गवळण घाबरून ओरडत-ओरडत घाईघाईने निघून गेली.

हा दादाजींचा चमत्कार होता. योगीपुरुषच ही क्रिया करू शकतो. म्हणून हे महान योगीपुरुष होते. या घटनेद्वारे दादाजींना सर्वांस दाखवायचे होते की, मी वेडा नाही.

श्री दादाजी महाराज दिगंबर अवस्थेत राहात होते. या महान पुरूषाला ना शरीराची चिंता, ना भोजनाची. जेथे जे काही मिळेल तेच खात होते, कोठेही पडून राहात होते. परंतु काही लोकांनी महाराजांच्या नग्नतेसंबंधी जिलाध्यक्षांकडे तक्रार केली. तक्रारीच्या आधारावर महाराजांना बंद केले. दादाजींनी म्हटले की सकाळपर्यंत कोणीही राहणार नाही. दुसऱ्या दिवशी सर्वांची तारेने बदली झाली. हा चमत्कार पाहून दादाजींना सोडून दिले. या प्रसंगावरून असे वाटते की दादाजींचे मोठ्या अधिकाऱ्याप्रमाणे तोंडी आदेशही खरे होत होते. त्यांच्या वाणीमध्ये किती प्रभाव होता, हे यावरून सिद्ध होते.

सन १८९५ ची अशीच एक घटना आहे. श्री दादाजी महाराजांनी होशंगाबादच्या एका विहिरीत उडी घेतली. त्यांना मृत अवस्थेतच विहिरीतून बाहेर काढले. पोलिसांनी शवाचा पंचनामा करून त्याचे दफन केले. या घटनेनंतर सोहागपूरच्या एका जंगलात ते पुन्हा प्रगट झाले. येथे धुनी लावून राहू लागले. शरीरावर वस्त्र नव्हते. या गोष्टीची लोकांना माहिती कळताच दर्शनासाठी लोकांची गर्दी होऊ लागली. लोकांच्या विनंतीवरून ते नरसिंगपूरला आले. नरसिंगपूरच्या नर्मदा नदीच्या काठी ब्राह्मणघाटावर ते पोहचले व तेथेच राहू लागले, आणि त्यांच्याकडून तेथे चमत्कार होऊ लागले. जसा गुरू गौरीशंकर महाराजांचा नर्मदा मातेवर अधिकार होता, तसाच अधिकार दादाजींनापण होता. एके दिवशी दादाजींनी नर्मदा नदीमधून एक सुप रेती बोलाविली. काही गुन-गुन करून या रेतीचे सोन्याचे शिक्के झाले. सर्वांना आश्चर्य वाटले.

एके दिवशी दादाजी महाराज भक्तांना म्हणाले, ''हम जलसमाधि लेंगे।'' नदीमध्ये आंघोळ करीत असता दहा लीटरपेक्षा अधिक पाणी त्यांनी पिवून घेतले. त्यानंतर त्यांनी ओकाऱ्या केल्या, आणि आपला प्राण सोडला. महाराजांचा मृत देह तीन दिवसपर्यंत एकाच ठिकाणी पडून राहिला होता; कारण पोलिसांना ही भीती होती की दादाजी पुन्हा जिवंत होतील. पूर्ण खात्री झाल्यानंतरच शवाचा पंचनामा करून अंतिम क्रियेची स्वीकृती दिली, आणि त्यांचे शव नर्मदा नदीमध्ये विसर्जित केले. श्री दादाजींचा मृत्यू व प्रगट होण्यामुळे पोलिस त्रासून गेले होते.

घटना सन १८९५ ते १९०० मधली आहे. श्री दादाजी महाराज खांडोन नावाच्या गावातील घनदाट जंगलात पुन्हा प्रगट झाले. तेथे ते धुनी लावून बसले होते. लोकांना दादाजींच्या प्रगट होण्याची माहिती मिळाल्यामुळे लोकांची पुन्हा गर्दी जमू लागली. खांडोन गाव सोडून सीरसीरी सन्दूक नावाच्या गावामध्ये ते एका मालगुजाराकडे राहू लागले.

सन १९०१ मध्ये साईखेडा, जिल्हा नरसिंगपूरमध्ये एका भीषण रोगाचा प्रकोप झाला. काही इलाज करूनही तो रोग ठीक होत नव्हता. तेव्हा साईखेड्याच्या लोकांनी सीरसीरी सन्दूक गावात जावून श्री दादाजींना विनंती केली की साईखेडा येथे येवून या रोगाला दूर करावे. सन १९०१ मध्ये श्री दादाजी महाराजांचे साईखेडा येथे आगमन झाले. त्यांनी रोगाला दूर केले. दादाजी महाराज दरदिवशी अनेक चमत्कारिक लीला साईखेडा येथे दाखवू लागले आणि साईखेडा दरबारामध्ये दरदिवशी असंख्य भक्तांची गर्दी होऊ लागली.

श्री दादाजी महाराज एक अवतारी पुरूष होते. त्यांचा चार वेळा मृत्यू आणि पुन्हा पुन्हा प्रगट होणे हे असाधारण, महान योगी, तपस्वी पुरूषच करू शकतो. हा एक महान चमत्कार मानावा लागेल.

## श्री हरिहर भोले भगवान (लहान दादाजी) यांचे आगमन



लहान दादाजींचे नाव हरिहर भोले भगवान. यांनी श्री दादाजींचे नाव ऐकले होते, आणि म्हणूनच योग्य गुरूच्या शोधात ते साईखेडा येथे सन १९१६-१७ मध्ये आले. ते १८ वर्षांचे होते. श्री दादाजी महाराज धुनीजवळ बसले होते. ब्रह्मचारी दादाजींच्या दर्शनासाठी जवळ गेले. दादाजींनी त्यांना एक शिळी डाळवाटी दिली, आणि म्हटले, ''यह खा जाओ और एक झण्डे के निचे बैठ जाओ !'' काहीही न खाता-पिता ब्रह्मचारी एकाच जागी तीन दिवसपर्यंत बसून राहिले. त्यांची ही स्थिती